म. ग्रं. सं. ठाणे
विषय शृंगार
सं. क्र. ६५४

RFFBK-0024401

20 SEP 1987

12 SEP 1992

23 SEP 1992

30 SEP 1992

17 OCT 1992

28 OCT 1992

28 OCT 1992

4 MAY

17 SEP 1994

2 JAN 19[illegible]
6 JAN 1985
2 JAN 1986
20 FEB 1985
1[illegible] MAY 1987
27 FEB 1985
13 MAY 1987
[illegible]0 APR 1985
19 JUN 1985
27 OC[illegible] 1985
3 NOV 1985
1[illegible] JAN 198[illegible]

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८५८
दा. क्र.
नव. शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ
भूप्रवास
६५८
२४४०१
२०/११/८४

# मला निसटलंच पाहिजे !

निवेदन : स्ला व्होमिर राविझ
शब्दांकन रोनाल्ड डाऊनिंग
अनुवाद : श्रीकांत लागू

REFBK-0024401

राजहंस प्रकाशन

प्रकाशक

**दिलीप माजगावकर**
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

मुद्रक

**सुरेश स. जगताप**
जनसेवा मुद्रणालय
१९२ शुक्रवार पेठ
पुणे ४११ ००२

प्रथमावृत्ती

२६ जानेवारी १९८४

© **सौ. विनता श्रीकांत लागू**

मुखपृष्ठ

**संजय पवार**
आमची पंधरावी कला

मूल्य

**वीस रुपये**


स्टॅलिनच्या अत्यत जुलमी राजवटीत नागरिकावर अनन्वित अत्याचार' झाले. त्यातून काम-धद्यानिमित्त रशियात राहिलेले परदेशी नागरिकही सुटले नाहीत अनेकाना खऱ्या-खोट्या गुन्ह्यासाठी आर्क्टिक भागातल्या गुलामाच्या कामगार-कॅम्पात पाठविण्यात आल तिथून निसटून जाण्याचा प्रयत्न जिवावर उदार होणाऱ्या एका छोट्या गटान केला त्यानी चार हजार मैलाच्यापेक्षा जास्त अत्यत खडतर प्रवास पायी केला आणि आपल अतिम ध्येय गाठल-भारत. त्यांच्यापैकी जे सर्वात कणखर होते त्याचाच फक्त निभाव लागला

स्ला व्होमिर राविझ हा असाच एक तरुण फक्त २४ वर्षांचा. पोलडच्या लष्करात लफ्टनटच्या हुद्द्यावर होता १९३९ साली रशियन गुप्तहेरानी त्याला हेरगिरीच्या आरोपावरून पकडल त्यान आपण निरपराध असल्याचा बचाव कितीही केला तरी त्याचा मानसिक आणि शारीरिक छळ करून गुन्हा सिद्ध करून दाखवलाच गेला त्याला २५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली उत्तर सैबेरियातल्या एका तुरुग-तळावर त्याची रवानगी झाली

राक्षसी थडी असलेल्या त्या बर्फाळ प्रातातील या भयकर कॅम्पमधून त्यान आणि त्याच्या साथीदारानी केलेल्या चित्तथरारक पलायनाची ही कथा —

मूळ पुस्तकाच नाव Long Walk

रोनाल्ड डाऊनिग या वार्ताहराने प्रथम या अद्भुत प्रवासाचा शोध लावला व स्ला व्होमिर राविझने सागितलेल्या या प्रवास-कथेच शब्दाकन केल.




राविझच्या पलायनाचा मार्ग

तीर्थरूप

सौ आई, बाबाना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ... ...
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

•

सकाळचं धुकं थोडं वितळलं, विरघळलं. थंड, स्वच्छ प्रकाश सगळीकडे पसरला आणि मी चौफेर नजर फिरवली याच ठिकाणी मला २५ वर्षं खितपत पडायचं होतं 'कॅम्प ३०३' हेच माझं यापुढं वसतिगृह राहणार होतं आर्क्टिक सर्कल-पासून फक्त तीनशे ते चारशे मैलावर असलेली ही छावणी, सुमारे ८००।४०० वार लांब-रुंद होती चारही कोपऱ्यात उभ्या केलेल्या लाकडी मनोऱ्यात पहारेकरी डोळ्यात तेल आणि हातात मशीनगन घेऊन सदा सज्ज होते छावणीच्या पश्चिमेकडील अरुंद भागात मुख्य दरवाजा होता त्याच्याच आजूबाजूला सैनिकांच्या बराकी, स्वैपाकगृह, गुदाम आणि प्रशासकीय कचेऱ्या होत्या. या सर्व कोंडाळ्यानंतर साधारण मध्यापर्यंत जागा मोकळी सोडली होती कैद्यापासून उपद्रव होऊ नये म्हणून.

आम्ही आणि बाहेरचं जगल याच्यामध्ये नेहमीसारखीच सुरक्षाव्यवस्था होती म्हणजे या प्रकारच्या तुरुंग–छावण्यातून असते तशी आतून पाहिलं तर स्वातंत्र्याच्या आड सर्वप्रथम काटेरी तारांचं भेंडोळं पसरून ठेवलं होतं त्यानंतर ६ फूट खोल असा प्रचंड चर सभोवार खणून ठेवला होता त्या चराची पलीकडची बाजू सरळ उभी कापलेली होती आणि त्यानंतर लगेच १२ फूट उंचीची लाकडी फळ्यांची

भिंत! कुणाला धावत येऊन भिंतीवर चढायचा मोह होऊ नये म्हणून ही व्यवस्था ही भिंत सरळसोट, गुळगुळीत, आधार नसलेली वाटत होती, परन्तु बाहेरून मात्र भले भक्कम टेकू आधार दिलेले होते आणि त्या भिंतीच्या बाहेरही ताराच कुंपण होतं. त्या दोन्हीच्या मधे चांगला तुडवलेला रस्ता होता या रस्त्यावरून चकरा घालणाऱ्या पहारेकऱ्यांची वर्दळ चालत असे गस्तीकुत्र्याच एक पथक घेऊन रात्रभर पहारा चालत असे

आमचा जवळपास ४५०० कैद्यांचा ताडा जेव्हा 'कॅम्प ३०३' वर पोचला तेव्हा तिथ आधीच असलेले 'फिनलंडचे'-सुमारे हजारभर कैदी आम्हाला सामोरे आले. अत्यत हताश, पराभूत चेहऱ्यान त्यांनी आमच स्वागत केल त्याच्यासाठी पूर्व टोकाला चार प्रचंड बराकी होत्या ८० वार लाब आणि १० वार रुद अशा बराकी छवणीच्या एकूण रचनेशी सुसगत होत्या अरुद बाजूच पश्चिमेकडे तोंड, तिथच दार सुसाट वारा आणि बर्फाचा मारा यापासून बचाव होण्यासाठी दारासमोर एक छपरी आडोसा आणि त्याला उलटच्या बाजूला उघडणारी झडप एक गोष्ट स्पष्ट दिसत होती सध्या तरी तिथ राहायला आम्हाला नवागतांना जागाच शिल्लक नव्हती.

काय करायच, कस करायच, असले विचार करायला त्यानी सधीच दिली नाही भोजनासाठी रागा लावायचा हुकूम सुटला मुख्य दरवाजाच्या डाव्या हाताला असलेल्या भोजनगृहाच्या उघडचा खिडकीजवळ आम्ही ढकलाढकली करत रांग धरली नेहमीचच कॉफीसारख कसल तरी पुळुकपाणी आणि पाव घाईघाईत पहिली फेरी सपवून पुन्हा तो काढा घेण्यासाठी दुसऱ्या खिडकीकडे प्रत्येकजण धडपडत होता त्या गरम पाण्याला तोटा नव्हता टिनाची डबडीच कमी पडत होती.

तेवढचात काही सैनिकानी एक घडीचा मच आणला आणि सचलन मैदानाच्या मध्यावर ठेवला अधिकाऱ्याच्या हुकुमानुसार त्या मचाच्या भोवती त्यानी कडं तयार केल लगेच सर्व कैद्याना घसमुसळेपणान त्या कडचाच्या बाहेर वर्तुळाकार गोळा केल गेल या सगळचातून वाट काढत बरोबर रक्षक घेऊन दोन रशियन कर्नल्स आले आणि मचाजवळ उभे राहिले त्यातला एकजण वर चढला.

कुठल्याही लष्करात असतात तसा खास धदेवाईक रुबाब चेहऱ्यावर धारण केलेला तो अधिकारी होता उच, शिडशिडीत कपाळावरच्या केसांच्या बटा पाढऱ्या होऊ लागलेल्या होत्या ओठावरच्या भुऱ्या मिश्या काळजीपूर्वक कातरल्या होत्या.

ओठापासून निघालेल्या आणि भक्कम हनुवटीत विलीन झालेल्या दोन रेषा त्याच्या रोड चेहऱ्यावर उठून दिसत होत्या रशियन सैनिकाबद्दल अत्यत द्वेष मनात असलेल्या, मानहानीमुळे चिडलेल्या, रागान कोणत्याही क्षणी उफा-

ळेल अशा समुदायापुढे आपण उभे आहोत, हे त्याला सहज जाणवत होत, पण त्याची पुसटशी निशाणीही त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती अत्यंत सहज आरामात तो उभा होता पायांची कसलीही अधीर हालचाल होत नव्हती.

तो रशियन भाषेत स्वच्छ आणि स्पष्टपणे बोलत होता 'माझ नाव कर्नल उषाकॉव्ह मी या छावणीचा सर्वाधिकारी आहे तुम्हाला इथ कामासाठी आणण्यात आल आहे आणि साहजिकच अपार कष्टांची आणि कडक शिस्तीची तुमच्याकडून अपेक्षा आहे गैरवर्तणुकीचे परिणाम काय होतील याची तुम्हाला कल्पना आहेच त्यामुळ शिक्षा या विषयावर मी काही बोलणार नाही

'आमच सर्वांत पहिल काम म्हणजे तुम्हाला निवारा देण अर्थात ते तुम्हालाच कराव लागणार. तुमच्या बराकी तुम्हालाच बाधयाच्या आहेत या असल्या हवेतून ऊबदार छपराखाली किती लवकर जायच हे सर्व तुमच्याच प्रयत्नावर अवलबून आहे

'तुमच्या जर काही तक्रारी असतील तर त्या मला जरूर सागा माझ्या अधिकारात बसतील तेवढ्या सर्व गोष्टी मी करीन इथ डॉक्टर्स नाहीत परन्तु प्राथमिक उपचाराची माहिती असलेले काही सैनिक इथ आहेत तुमच्यापैकी या प्रवासानतर जे अतिशय आजारी आहेत त्याची आणि फक्त त्यांचीच सोय असलेल्या बराकीमध्ये केली जाईल बाकीच्यानी बराकबाधणीच्या कामाला तडक लागाव, एवढच मला सागायच होत '

तो खाली उतरला आणि लगेच दुसरा कर्नल वर चढला चढला कसला झेपावलाच, कशासाठी तरी उतावीळ झाल्यासारखा सहजतेचा लवलेशही त्याच्या हालचालीत नव्हता उषाकॉव्हच्या बाबतीत खऱ्या अधिकाऱ्याचा सयम जाणवत होता तर ह्याच्या बाबतीत अधिकाराचा उन्मत्तपणा चेहऱ्यावर लहरत होता उषाकॉव्हपेक्षा पोशाखही जास्त नेटका होता अगावर मेंढीच्या कातड्याच जाकीट, मऊ कातड्याचे उत्तम शिवणीचे, चकचकीत केलेले, उंच बूट होते. वयान उषाकॉव्हचा मुलगा शोभेल असा तरणाबाड होता.

त्याच नाव जरी त्या वेळी समजल असल तरी आता मात्र ते अजिबात आठवत नाही तो राजकीय अधिकारी होता एवढं खर आणि सर्वसाधारणपणे अशा अधिकाऱ्यांना म्हणतात तेच नाव आम्ही त्याला ठेवल होत–पॉली ट्रक!

पूर्ण मिनिटभर सगळ्या जमावावर नजर फिरवली ओठाच्या कोपऱ्यात किंचित हसू चेहेऱ्यावर आत्मविश्वास, सुखवस्तूपणा आणि उद्धटपणा याच सुरेख मिश्रण दिसत होत सर्व जमाव अस्वस्थपणे जरा चळला आणि स्तब्ध झाला

बोलताना अत्यंत तुच्छपणे खरखरीत दणदणीत आवाजात बोलत, खादे किंचित झुकलेले आणि जाड मोजे घातलेले हात ढुंगणावर, असा तो उभा होता

बघा एकदा आपल्या थोबाडाकडे लडबडलेल्या जनावरासारखे दिसता आहात. तुम्ही म्हणे सुसंस्कृत जगातून आलेले, सगळ्या जगावर अधिकार गाजविणारे. आजवर तुम्हाला जे काही शिक्षण मिळाल त्याचा गर्व आता कुठे गेला ?'

एखादा उत्तम वक्ता आपल भाषण अधिक नाट्यपूर्ण आणि ठाशीव करण्यासाठी मधेमधे पॉज् घेतो तसा त्यान घेतला त्याचा फायदा एका अत्यंत बेडर परन्तु अविचारी तरुणान घेतला त्याच्या आवाजान जखडबद्ध झालेल्या त्या जमावात प्रचंड चलबिचल झाली तो म्हणाला, 'यापेक्षा वेगळे कसे दिसणार आम्ही ? तुम्ही आम्हाला दाढी करू दिली नाही साबण नाही, कपडे नाहीत '

पॉलीट्रुक आवाजाच्या दिशेने रोखून पाहात म्हणाला, 'पुन्हा असा व्यत्यय आला तर तुझा शिधा बंद!'

त्यानतर पुन्हा अडथळा आला नाही

'इथे काही दिवस काढलेत की कॉम्रेड स्टॅलिनच्या मार्गदर्शनाखाली तुम्हाला आम्ही उपयुक्त नागरिक बनवू जे काम करणार नाहीत त्याना जेवणही मिळणार नाही तुम्हाला सुधारण हेच माझ कार्य राहील विचारदुरुस्तीच्या वर्गांना हजर राहाव लागेल आमच्याजवळ अत्यंत सुसज्ज अशी लायब्ररी आहे फावल्या वेळात तिचा फायदा घ्यायला हरकत नाही ' याच थाटात तो आणखीही काही बडबडला नतर एकदम पटकन म्हणाला, 'काही प्रश्न विचारायचेत ?' एका कैद्यान विचारल, 'इथे वसत ऋतु केव्हा येतो ?' तो कडाडला, 'मूर्खासारखे प्रश्न विचारू नका !' सभा सपली

सुरुवातीचे काही दिवस नवीन बराक–बाधणीच काम म्हणजे नुसता गोंधळ होता. प्रत्येकाची काम करण्याची तयारी जरूर होती, पण ज्याच्या त्याच्या पात्रतेनुरूप कामाची वाटणी करण फारच अवघड होत तीन-चार दिवसात मात्र आपोआप गटवार विभागणी होऊन कामाला सुरुवात झाली आर्किटेक्ट गटान रेषा आखून खुट्या मारून, बराकीच्या जागा निश्चित केल्या तरुण कामगारांनी, थिजून दगड झालेला बर्फ फोडून आधारस्तभ उभारण्यासाठी मोठ्या कष्टान खड्डे खणले जगलातून आणलेली झाड निरनिराळ्या कामासाठी वापरता येतील अशी कापून तयार करणारे सुतार होते जगल कामगाराचा गट सर्वांत मोठा होता सकाळी बरोबर ८ वाजता सैनिकांच्या पहाऱ्यात हा गट मुख्य दरवाजातून बाहेर जात असे

मी जगल-कामगारात सामील झालो पहाटे बरोबर ५ वाजता बिगुलाच्या आवाजाने कॅम्प जागा केला जात असे नतर सोनखताच्या खड्ड्याकडे मिरवणूक. पाठोपाठ न्याहारीकरता रांगा लागायच्या नतर अवजारांचे वाटप झाल्यावर अत्यंत काळजीपूर्वक यादीबरहुकूम मुख्य दरवाजातून बाहेर सोडत सध्याकाळी तितक्याच काटेकोरपणे आत घेतल जात असे.

जगल मुख्यत्वेकरून पाइनवृक्षाच होत पण वर्च आणि लार्चची झाडही कमी नव्हती झाडतोड गटात मी काम करायचो दोघानी चालवायची करवत वापरायचो कधीकधी बदल म्हणून कुऱ्हाड चालवून झाडाच्या फाद्या तोडण्याच कामही मिळायच बर वाटायच कारण लहानपणी पिस्कमध्ये असताना कुऱ्हाड चालवण्यात माझा हातखंडा होता माझी ताकद हळूहळू भरून येत असल्याच जाणवत होत या कामाच्या धाऊगर्दीत मी रमू लागलो आपल्या हातांचा काही तरी उपयोग होतो आहे, या कल्पनेन एक प्रकारचा अभिमान आणि समाधान वाटू लागल दुपारी १ वाजता कापून तोडून झालेला माल बांधकामगाराच्या हवाली करण्यासाठी छावणीत परत जायचो तेव्हाच दुपारच भोजन व्हायच, की लगेच पुन्हा जगलात जाऊन सूर्यास्तापर्यंत झाडतोड काम सुरू ! बराकीचा आकार दिवसेदिवस वाढत होता.

पहिल्या पधरवड्यातच आमच्या झोपडीवजा बराकी पूर्ण झाल्या प्रत्येक ओळीत १० बराकी अशा २ ओळी, दोन्ही ओळींमध्ये रुदसर गल्ली असा एकूण आराखडा होता शेवटच्या एका अर्धवट बाधून झालेल्या बराकीत मला बाकड मिळाल होत तुम्हाला सागतो, अनेक रात्री उघड्यावर, चावणाऱ्या थडीत काढल्यावर छपराखाली मिळणाऱ्या उबदार निवाऱ्याचा, सुरक्षिततेचा सुखाचा आनद अवर्णनीय असतो नुकत्याच कापलेल्या पाइनवृक्षाचा ओला वास नुसता घमघमत होता भरभक्कम खाबाच्या भितीला लागून, एकावर एक तीन बाकड्याचे ५० पिंजरेवजा सागाडे होते एकूण दीडशे लोकाची झोपण्याची सोय होती. बराकीच्या मध्ये सारख्या अतरावर तीन लोखडी पत्र्याच्या शेगड्या धगधगत होत्या उबेसाठी त्याला लागणार जळण जगल कामगारानी रोज येताना आणायच असे जुन्या अनुभवी कैद्यानी घालून दिलेल्या धड्याप्रमाणे आम्ही बाकड्यावर घालण्यासाठी खूपस शेवाळ लपवून आणत असू त्यासाठी आमची ताग भरलेल्या पोत्यासारखी जाकिट, फुफैका म्हणतात त्याना, चागली उपयोगी पडत असत धूर बाहेर जाण्यासाठी शेगड्यांना चिमण्या जोडलेल्या नव्हत्या बाहेर निघणारा धूर छताच्या उच्छ्वास-भोकातून (छिद्रातून) वळसे घेत बाहेर जात असे

सध्याकाळी ६ ते सकाळी ५ एवढा वेळ आम्हाला बराकीतच काढावा लागे तशी थोडीशी बराकीच्या आजूबाजूला पाय मोकळे करण्याची परवानगी होती परवानगी होती म्हणजे मडळी जोपर्यंत मोठे घोळके करत नाहीत तोपर्यंत दुर्लक्ष होत असे एवढच तारांच्या भेडोळ्यापर्यंत कोणी जात नाही तोपर्यंत पूर्व मनोऱ्यावरून पहारा करणारे सत्री इतर हालचालीकडे काणाडोळा करीत बराकीत आत करण्यासारख फारस काही नव्हतच वाचायला काही नव्हतच आणि असत तरी पुरेसा उजेडही नव्हता सध्याकाळी ६ च्या नतर अधिकृतरीत्या

परवानगी असलेल्या दोनच गोष्टी करता येत असत त्या म्हणजे, दर बुधवारच पॉलीट्रकच प्रवचन आणि त्याच्याच अखत्यारीत असलेल वाचनालय !

माझ्या जवळच्याच बाकड्यावर एक झेकोस्लोव्हाकी कैदी होता होता तिरसटच तरीही गमतया त्यान मला एका बुधवारी पॉलीट्रकच्या प्रवचनाला जाण्याच्या भरीला घातल हे प्रवचन ड्यूटीवर नसलेल्या सैनिकाना सक्तीच होत आम्ही आल्याचा आनद जराही न लपवता, आपला धडा पुढे चालू करण्याआधी पॉलीट्रकन काही विशेष शेरे मारले रशियाच्या प्रचड ताकदीबद्दल, जगात मिळवत असलेल्या महत्त्वाच्या स्थानाबद्दल तो बोलत होता बोलताना 'भाडवलशाहीच सडलेल भूत' या विषयावरही ताशेरे मारायच त्यान सोडल नाही. सैनिक प्रश्न विचारत आणि पॉलीट्रक त्यांना मार्क्सच्या तत्त्वावर आधारित लेनिन, स्टालिन याच्या भाषणातील आणि लेखातील वचन उत्तर म्हणून देत असे आम्ही निघालो तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर समाधानाच हसू होत मात्र त्याच हे हसू, थोड्या वेळान त्या झेक मित्रान पॉलीट्रकच्या लाल सैन्याच्या शिक्षणाची जी बेफाम थट्टा केली, ती पाहून, केव्हाच पळाल असत सगळे सगे कैदी मात्र धमाल खूष झाले हा झेक म्हणजे अभिजात नट आणि नकलाकार होता यात शकाच नाही

एक महिन्याच्या शेवटी शेवटी छावणीतल्या त्या आयुष्याला एक शिस्तबद्ध ताल सापडला होता आणि सर्वसाधारण असा समज पसरला की, दूरवर, कडाक्याच्या थडीतल एकूण जीवन खडतर असल तरी अगदीच वाईट नव्हत सर्व कैद्याना सकाळच्या कॉफीबरोबर ४०० ग्रॅम पाव दिला जात असे त्यातला थोडा सकाळीच सपायचा, थोडा दुपारी आणि उरलेला सध्याकाळी तोंडी लावायला मात्र तेच गरम पुळूक पाणी असायच

क्वचित केव्हाच्या रविवारी मेजवानी असे म्हणजे सुकवलेले मासे, पण पाव हेच खर पोटभरीच खाद्य आणि तोच आमच्या आयुष्यातला सर्वांत महत्त्वाचा भाग होता तबाखूही तसा महत्त्वाचाच होता आठवड्यातून एकदा त्यामानान बराच वाटा मिळत असे त्याबरोबरच जुन्या वर्तमानपत्राचा तुकडा मिळायचा, सिगारेटी वळायला पाव आणि तबाखू या दोनच वस्तूना मोल होत काही काम करवून घ्यायच असल तर याच दोन वस्तूचा चलन म्हणून उपयोग होत असे

सुरुवातीच्या महिन्यात छावणीत मृत्यून थैमान घातल होत छावणीपर्यंतच्या जीवघेण्या वाटचालीमुळ मनान आणि शरीरान पूर्णपणे खचून गेलेले अनेक कैदी पुन्हा उठून उभे राहू शकले नाहीत ! अस्तित्वात असलेल्या आधीच्या बराकीत त्याना टाकल होत त्याच्याकडून काम होणच अशक्य होत

वैद्यकीय मदतीचा विचारच करता येत नव्हता दिवसचे दिवस पडून राहायच आणि केव्हा तरी गतप्राण व्हायच त्याच्या मित्रांमधूनच स्वयसेवकाच्या तुकडचा खाद्यावर प्रेत घेऊन अत्यत कडक पहाऱ्यात बाहेर जायच्या छावणीपासून अर्ध्या मैलावर जरा मोकळ्या जागेमध्ये कबरी खणायच्या आणि त्यात आपल्या मित्रांना चिरविश्राती द्यायची !

मी एकूण दोन वेळा अशा प्रेतयात्राना गेलो एका फेरीच्या वेळी अचानक एका विमानाचा शोध लागला ते कमाडर उषाकॉव्हच होत आमच्या स्मशान-वाटेवर एका ठिकाणी अर्धीमुर्धी धावपट्टी असल्याच लक्षात आल तिथच झाडाच्या आसऱ्याला ताडपत्रांनी झाकून ठेवलेल टायगर मॉथ जातीच विमानही आढळल एका संद्यानं अशीही माहिती पुरवली की, याकुत्सला लष्कराच्या मुख्य ठाण्याला, सभेला जायला कर्नल उषाकॉव्ह हे विमान वापरत असे तो स्वत च ते विमान चालवत असे

आमच्या कामाचे तास सोडले तर इतर वेळात, कार्यक्रमात रशियन सैनिक फारशी लुडबूड करत नसत छावण्यांच्या पाहणीचा कार्यक्रमही बेतास-बातच व्हायचा झाडतोड–तुकडयांमधील कैद्याना जगलांत एकमेकांमध्ये मिसळा-यला थोडासा वाव मिळत असे नवीन मित्र जोडले जात सुरुवाती–सुरुवातीला आपल्या सोबत्याजवळची जागा बदलून मिळावी म्हणून परवानगी लागत असे नतर मात्र परस्पर सामजस्याने कोणी बराकी बदलत असतील तर परवानगीची जरुरी लागेनाशी झाली अर्थात, एखाद्याला दुसरीकडे जायला सागायच म्हणजे तंबाखूची लाच द्यावीच लागे. तरीही एवढीच अट असल्यामुळ सुरुवातीच्या काही महिन्यांत बऱ्याच जागाची अदलाबदल झाली. मित्रांचे, समविचारी सोब-त्याचे गट आपोआप एकत्र आले

मला फारसे मित्र नव्हते अगदीच नाही म्हणायला माझ्याबरोबर सैबे-रियाच्या प्रवासात असलेला ग्रेचीनन अधूनमधून भेटत असे तसच तो गमत्या झेक होताच त्याच्या गमत्या आणि दिलखुलास स्वभावाच मला कौतुक होत, पण फारशी जवळीक मात्र कधीच निर्माण झाली नाही !

मी माझ्या बाकड्यावर सध्याकाळचे तासन्तास, वरती २० फूट उची-वरच्या छपरातून बाहेर जाणाऱ्या धूरवलयांकडे पाहात पडून राहायचो एक विचार डोक्यात सारखा घणाघात करत रहायचा २५ वर्षं ! इथ, या खुराड्यात काढायचीत अनेक परिचित या काळात सपून जातील नवीन भरती होतील मीही वयोवृद्ध होत जाईन २५ वर्ष, आयुष्यात जेवढी वाटचाल करून आलो तेवढेच दिवस इथ काढायचेत इथून बाहेर जाता येईल ? कस ? समजा, अगदी खोल खड्डा, ताराच कुपण, लाकडी भिंत पार केली तरी पुढ काय ? सैबेरियातून कुणी तरी आपली सुटका करून घेतलीय का ? कुणी प्रयत्न केलाच तर अशा

ह्या दुर्गम, बर्फाळ प्रदेशातून प्रचंड अंतर कापता येईल? या प्रयत्नात साथ द्यायला अत्यंत निग्रहाचे सोबती मिळतील? हे असे अनेक प्रश्न मी स्वत:लाच विचारत असे, पण माझ्याजवळ उत्तर मात्र नव्हती

एका संध्याकाळी संडासाच्या वाटेवर ग्रेचीननला मी गाठलं 'ग्रेची, समजा इथून पळून जायचा बेत ठरवला तर तू माझ्याबरोबर येशील का?' त्याच्या कपाळावर आठ्या चढल्या 'तू खरच असला विचार करतोयस?' मी होकार भरला तो बराच वेळ आपल्या दाढीत बोट फिरवत राहिला शेवटी म्हणाला, 'राबीश्च, मी विचार करतो आणि रात्रीपर्यंत तुला काय ते सांगतो!'

ग्रेचीनन तसा एकूण सावधच दुसऱ्या दिवशी बराकीच्या दोन रांगामधल्या मोकळ्या जागेत मी त्याला गाठलच त्यान नकार दिला तो म्हणाला, 'संधी मिळाली तर यायलाही हरकत नाही, पण आपण फार दूर जाण्याच्या आधीच गोठवणारी थंडी आणि बर्फ आपला केव्हाच बळी घेतील! रशियन सैनिकानी आपल्याला पकडण्याची वेळच येणार नाही. नाही मला इतक्या तरुण वयात मरायच नाहीये!'

हाच प्रश्न मी झेकीला विचारला त्याला तर प्रथम थट्टाच वाटली माझं गांभीर्य कळल्यावर त्यान त्याच्या बाकड्यावर मला शेजारी बसवून घेतलं माझ्या खांद्यावर हात ठेवून अत्यंत सावधपणान कुजबुजत तो म्हणाला, 'तुझ्या-बरोबर यायला माझी हरकत नाही; पण तुला गरज आहे ती सुदृढ, उत्तम तब्बेतीच्या माणसाची! माझ पोट माझा जीव घेणार आहे भयकर आकड्या येतात मी तुझ्याबरोबर आलो तर माझा मृत्यू जवळ येईल आणि मला बरोबर घेतल्याचा तुलाही पश्चात्ताप होईल!' काही काळ आम्ही सुन्न होऊन बसून राहिलो नंतर झेकी पुन्हा म्हणाला, 'मित्रा, संधी मिळालीच तर सोडू नको, इथून मोकळा हो मात्र आपली माणस नीट पारखून घे जा, माझ्या सदिच्छा तुझ्याबरोबर सदैव राहातील!'

आठवड्याचे सहा दिवस अत्यंत कष्टाचे जायचे नंतरचा रविवार मात्र थोडा आरामाचा जायचा त्या दिवशी सर्वाधिकारी सर्व कैद्यांच्यासमोर भाषण ठोकायचा त्यात पुढल्या आठवड्यातील कामाचा मसुदा असायचा, छावणीतील नियमोल्लंघनाचा उल्लेख असायचा आणि दैनंदिन जीवनात बदल घडेल असे काही हुकूमही असायचे

सुमारे एक महिन्यानंतर एका नव्या कामगिरीसाठी त्यांना कामगार हवे होते बर्फावर घसरण्याच्या पट्ट्या—स्की—तयार करण्याच काम होतं कुणाकडूनच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेना पावाचा जादा तुकडा मिळण्याची आणि काम चांगलं झाल्यास त्या शिध्यात वाढ करण्याची लालूच दाखवताच जवळपास साठ लोक

पुढे आले मी त्यात होतो फार पूर्वी केव्हा तरी घसर-पट्ट्याची एक जोडी तयार केली होती स्वतःला तज्ज्ञ म्हणवू शकत नव्हतो, पण तीनचार औंस जादा पावासाठी हा प्रयत्न करायला काहीच हरकत नव्हती

वाचनालयाच्या घरट्याच्या अर्ध्या भागात हा घसरपट्ट्यांचा कारखाना थाटला होता आमच्यापैकी सहाजण खरोखरच कुशल कारागीर होते. एक-मेकाच्या संगनमताने त्यांनी बाकीचे लोक वाटून घेतले बर्चची झाड तोडून आणणारे, योग्य त्या लांबीचे तुकडे कापणारे, त्याचा योग्य त्या वेगान पुरवठा करणारे, शेवटची प्रक्रिया करणारे असे गट पडले एकदा केव्हातरी घसरपट्टी तयार केल्याच्या अनुभवाचा फायदा म्हणून छपराखाली शेवटच्या प्रक्रिया-गटात काम करायची संधी मला मिळाली

कारखान्यात घसरपट्ट्यांवर वाफेची काही प्रक्रिया करण्यासाठी एक प्रचंड शेगडी सतत धगधगत असे तिची सुखद ऊब अर्थातच सर्वांना मिळत असे त्या उबेमुळे माझी ताकद संपूर्णपणे भरुन निघाल्याच मला जाणवू लागल त्यामुळ वास्तविक त्या सुखासीन अवस्थेचा स्वीकार व्हायला हवा होता, पण दिवसें-दिवस पलायनाचे विचार अधिकच बळावू लागले मिळणार अन्न आपल्याला साठवून ठेवता येईल किंवा कस, याचाच विचार करू लागलो माझ्याकडे कसलीच योजना तयार नव्हती आणि त्या वेळेपर्यंत एका अत्यंत अनपेक्षित ठिकाणाहून आपल्याला मदत मिळणार आहे याची सुतराम् कल्पना मला नव्हती

## मुख्याधिकाऱ्याची पत्नी

मी उत्स्फूर्तपणे एक जबाबदारी स्वीकारली होती, तशीच पुन्हा एकदा स्वीकारली मार्चच्या मध्याचा सुमार असेल एका रविवारी साप्ताहिक कवा-यतीचा दिवस होता कसेबसे पाय ओढत कवायत करणाऱ्या कैद्यावर बर्फुलाचा पाऊस पडत होता कवायत थांबवून कर्नल उधाकॉव्हन विचारल, 'माझ्याकडे टेलीफकनचा रेडिओ आहे तो दुरुस्त करण्याची कुणाला माहिती आहे का ?'

मला तो रेडिओ माहीत होता आमच्या घरी तसला एक होता जर्मन कंपनीचा होता तो सर्वजण एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागले कोण पुढे येतो ? जवळपास मिनिटभर काहीच हालचाल होईना मला रेडिओ माहीत होता, पण म्हणून मी तो दुरुस्त करू शकेन का ? जर करू शकलो तर बाहेरच्या जगातील बातम्या कळतील, अशी जिवाला हुरहूर लावणारी शक्यता होती दुसरा कुणी तरी ही संधी लाटेल की काय, या जाणिवेन जिवाचा थरकाप उडाला आणि मी पटकन हात वर केला एका एन सी ओ न पुढ येऊन माझ नाव आणि इतर माहिती लिहून घेतली 'गरज लागेल तेव्हा बोलावीन !'

माझा हा निर्णय अत्यत सुदैवी ठरणार होता या निर्णयामुळ कॅम्प ३०३ मधील वास्तव्याच्या अत्यत चित्तथरारक आणि शेवटच्या पर्वाला सुरुवात झाली होती इथल्या बाह्य जगाशी सबध तुटलेल्या छावणीत पाच ते सहा हजार कैदी होते त्यांच्यावर देखरेख करायला सैनिक व अधिकाऱ्याची एक सबध बटॅलियन होती आणि या सर्व पुरुषांमध्ये स्त्री फक्त एकच होती उषाकॉव्हची पत्नी ! बिघडलेला टेलीफकन रेडिओ हा तिच्या–माझ्या मधला दुवा ठरणार होता माझ्या अदाजाप्रमाणे तिच्याशी संभाषण होऊ शकणारा मीच एकमेव कैदी होतो !

दुसऱ्याच दिवशी घसरपट्टी–कारखान्यात काम करत असताना निरोप आला गोल गरगरीत चेहऱ्याच्या आयगॉर नावाच्या सैनिकानं येऊन सागितल की, साहेबांनी बोलावल आहे माझ्याबरोबर चल ! आम्ही निघताना साथीदार म्हणाले, ' युद्ध कुठवर आलय याच्या बातम्या ऐक पोलडची काही बातमी मिळते का पहा वगैर सूचना आल्या ते माझ्याही मनात असल्यामुळ मी त्याना हात हलवून समती दर्शवली व तिथून निघालो मला हे कबूल केलच पाहिजे की, कमांडण्टच्या घरी जाताना माझ्या मनावर कसल तरी प्रचड दडपण आल होत. खर म्हणजे मनातून धास्तावलोच होतो मुख्य दरवाजातून बाहेर पडल्यावर, अधिकारी भोजनगृहाला वळसा घालून गेल की, छावणीच्या दुसऱ्या टोकाला कवायतीच्या मैदानाच्या बाजूला त्याच निवासस्थान होत इतर लाकडी घरासारखच होत वर्फुल, वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी दक्षिणाभिमुख दरवाजा वगैरे. कैद्याच्या बराकीपेक्षा इथल्या लाकडी तक्तपोशी अधिक सफाईदार होत्या आणि मुख्य म्हणजे उबशेगडीतून निघणारा धूर वाहून न्यायला वरपर्यंत चिमणी होती

दारापाशी पोचल्यावर उषाकॉव्हन आयगॉरला जाण्यासाठी खूण केली आणि मला आत घेतल मी जमेल तितका रशियन भाषेचा वापर करून आदर व्यक्त केला आणि रेडिओसेट पहायला आल्याच त्याना सांगितल.

' हो, दाखवतो ना, असं म्हणून तो आत गेला त्याची पत्नी समोरच शेगडीसमोर ऊब घेत बसली होती. त्या शेगडीची रचना आतल्या व बाहेरच्या अशा दोन्ही खोल्याना ऊब मिळेल अशी होती कर्नलन औपचारिकपणे त्याच्या पत्नीशी माझी ओळख करून दिली तिनही माझ्या अभिवादनाचा किंचित हसून स्वीकार केला मी तिच्याकडे एकटक पहात राहिलो पिंस्क सोडताना आईला पाहिल होत तेच शेवटच स्त्री-दर्शन ! मी अत्यत अस्वस्थ झालो माझ्या अवताराची मलाच किळस येत होती. गलिच्छ कपडे, अस्ताव्यस्त वाढलेली दाढी, केस, सगळच ओंगळवाण वाटत होत तरीही तिच्यावरची नजर मी काढू शकलो नाही

ती उभी राहिली चांगली उंचीपुरी होती तिनं लांब, जाडसर स्कर्ट घातला होता, फुलकारी केलेल्या पांढऱ्या ब्लाऊजवर लोकरीचा कार्डीगन घातला होता बदामी रंगाच्या केसांचा खास रशियन पद्धतीचा अंबाडा तिनं डोक्यावर बांधला होता तिच्या नितळ कातडीचा तजेला विशेष नजरेत भरत होता स्त्रीचं वय ओळखण्यात काही मी वाकबगार नव्हतो, तरीही ती चाळिशीची

असावी असा आपला एक अंदाज ती दिसायला तशी सुंदर वगैरे काही नव्हती, पण दुसऱ्याचं लक्ष वेधून घेण्याइतकी स्त्रीसुलभ सहजता तिच्यात नक्कीच होती मी बेभान अवस्थेतून बाहेर आलो आणि लक्षात आलं की, तीही माझ्याकडे आपल्या निळ्या डोळ्यांनी पहाते आहे त्या नजरेत दया आणि आपुलकी पुरेपूर भरली होती मी नजर वळवली तेव्हा उषाकॉव्ह दोन्ही खोल्यांच्या मधल्या दारात उभा राहून अत्यंत अलिप्त नजरेनं पहात होता

'ये मी तुला रेडिओ दाखवतो !' तो म्हणाला आम्ही खोलीत शिरलो ती त्याची बेडरूम आणि ऑफिसची खोली होती शेगडीजवळच्या भिंतीतल्या उघड्या कपाटात त्याचे गणवेष टांगलेले दिसत होते. डाव्या हाताला पलंग आणि समोरच खण असलेलं कपाट होतं खोलीचा उजवा भाग म्हणजे त्याचं ऑफिस होतं भिंतीवर सैबेरियाचा नकाशा होता तसंच कॅम्प ३०३ चा आराखडा आणि त्याच्याच बाजूला जोसेफ स्टॅलिनचं रंगीत चित्र होतं. त्या स्टॅलिनच्या नजरेखालीच एका बाकड्यावर तो कोरा–करकरीत बॅटरीवर चालणारा टेलिफंकन रेडिओ होता.

उषाकॉव्हनं मला एक 'पुष्की' सिगारेट दिली, रॉकेलचा एक दिवा आणून बाकावर माझ्याजवळ ठेवला मी रेडिओचं पाठीमागचं झाकण काढलं आणि एखादी तार सुटली आहे की काय, ते बोटांनी चाचपडू लागलो उषाकॉव्ह त्या रेडिओबद्दल अवांतर माहिती विचारू लागला कुठला मेक आहे, कसा चालतो, साधारण किंमत काय असेल, वगैरे

जरा अडखळतच मी विचारलं, 'कुठून आणला ?'

'दुर्दैवानं १९३९ साली पोलंडमध्ये मी कमांडर होतो तिथं तो मला मिळाला'

'दुर्दैवानं' या शब्दानं मी आश्चर्यचकित झालो. सैबेरियासारख्या भागात अधिकारावर असणं, मग तो तुरुंगाचा का असेना, म्हणजे एक प्रकारच्या शिक्षेचाच भाग असतो, असं बरेच कैदी म्हणत असत, त्याची मला आठवण झाली 'दुर्दैव' शब्द ऐकून माझाही समज असाच होऊ लागला–आणि नंतर त्याला पुष्टीही मिळाली–पोलंडमधल्या काही आगळिकीबद्दल उषाकॉव्हची सैबेरियामध्ये नेमणूक झाली असावी

तो माझ्याजवळून उठला आणि आपल्या बायकोजवळ जाऊन बसला. माझं काम धीम्या गतीनं चालू होतं. ताराचा गुंतावळा तपासून पाहात होतो. अर्ध्या तासानं माझ्या असं लक्षात आलं की, ती शेजारच्या खोलीत काही तरी करते आहे. त्यानं मला जवळ बोलावलं. तिनं सॅकरीन घातलेल्या चहाचे दोन पेले आणले. एक मला दिला. मग मी पुन्हा कामाला लागलो. माझ्या असं लक्षात आलं की, काम संपवण्याची घाई करण्याचं काहीच कारण नाही. अटक झाल्यानंतरचा हा सर्वांत सुखद अनुभव होता आणि तो मला जास्तीत जास्त टिकवायचा होता. आयगॉर मला परत न्यायला आला तेव्हा हे रेडिओदुरुस्तीचं काम म्हणजे किती वेळखाऊ आहे, ते मी त्याला पटवून दिलं. ते व्हाल्व्हज्, त्या किचकट वायर्स, फार काळजीपूर्वक काम करावं लागतं, वगैरे गोष्टी सांगणं भागच होतं.

'ठीक आहे. तुला पुन्हा आलं पाहिजे, मी निरोप पाठवीन तुला!' जाताना उषाकॉव्हनं मला आणखी एक सिगारेट दिली.

सर्वांनी बाहेर मला घेरावच घातला. 'सांग, काय बातमी आहे?'

'अजून चालू झाला नाही रेडिओ. मला कळल्याबरोबर लगेच सांगीन!'

दुसऱ्या दिवशी आयगॉर पुन्हा मला न्यायला आला. मी रेडिओ हाताळू लागलो. त्याच वेळी उषाकॉव्ह आणि त्याची बायको हे माझ्याशी संभाषण करू लागले. माझ्या रशियन भाषेवरच्या 'प्रभुत्वा'चं तिला कौतुक वाटलं. मी तिला सांगून टाकलं की, माझी आई रशियन होती!

'कोणत्या गुन्ह्यासाठी तुला इथं धाडलय्?'–कर्नल

'कसलाही नाही!'–मी

'तुला २५ वर्षांची शिक्षा झालीय होय ना?'

'हो.'

थोड्या वेळानं ती पुन्हा म्हणाली, '२५ वर्षं म्हणजे फार झाली, नाही? तुझं वय काय?' मी २५ वर्षांचा असल्याचं तिला सांगितलं.

आमच्या तिहेरी संभाषणात मधेमधे विचित्र शांततेचे क्षण जायचे. ते दोघे एकमेकाला बिलगून बसले होते. मी ओणवा होऊन टेलिफंकन तपासत होतो. उषाकॉव्हनं अचानक विचारलं की, 'रशिया पुन्हा एकदा युद्धात अडकेल असं तुला वाटतं?' मी चक्रावलोच. त्याच्या दृष्टीनं १९१४ सालचं युद्ध हे शेवटचं युद्ध झालं. मी फिनलंड आणि पोलंडचा उल्लेख करताच तो म्हणाला, 'छे, छे, ते काही युद्ध नव्हतं, तो त्यांचा मुक्ती-संघर्ष होता!' मी गरकन् वळून मागे पाहिलं. तो माझी नजर चुकवून निर्विकार चेहऱ्यानं आढ्याकडं पहात होता. त्यानं रशिया युद्धात सहभागी होण्याचा प्रश्न पुन्हा काढला,

'पोलंडमध्ये गोअरिंग मदत मागण्यासाठी येऊन गेला तेव्हा सर्वांना असा

समज झाला की, रशियावर हल्ला करण्यासाठी पोलडचा आडोसा म्हणून उपयोग करायचाय जर्मनीची तयारी झालेली आहे आणि आता रशियावरची चढाई अटळ आहे !' मी एका दमात भळभळा बोलून टाकल. मला वाटल की, जादा वटवट करण्याबद्दल चांगली तबी मिळणार, पण त्या दोघानी कसलीच प्रतिक्रिया दाखवली नाही

माझ्या अस लक्षात आल की, त्यांनाही रेडिओ दुरुस्त होण्याची कसलीच घाई नव्हती बॅटरीला जोडली जाणारी एक वायर जरा सैल आहे, त्यामुळे रेडिओ चालत नाहीय, हे केव्हाच माझ्या लक्षात आल होत, पण मीच रेडिओ चालू करायची टाळाटाळ करत होतो नाहीतर इथल्या सुखद फेऱ्या थांबल्या असत्या !

ती मला युद्धपूर्व पोलडबद्दल प्रश्न विचारी. तिथल्या बायकाच्या फॅशनी कशा होत्या ? उंच टाचांचे बूट वापरता का ? मी बेधडक सागायचो की, 'कपड्याच्या फॅशन्स थेट पॅरिसच्या असत. कपडे, बूट सर्व काही अतिशय आकर्षक असत.'

दोन दिवसानतर मला पुन्हा बोलावण आल.

या वेळी मात्र मी रेडिओ चक्क चालू करायच्या प्रयत्नाला लागलो उषाकॉव्ह आपल्या कामात दग होता. त्याची बायको मात्र माझ्याशी बोलत होती. सिनेमाबद्दल बोलताना जेव्हा मी सांगितल की, पोलडमध्ये रशियन सिनेमाना बदी होती, तेव्हा तर तिला आश्चर्यच वाटल बोलण चालू असताना‌च मी रेडिओच बटण दाबल आणि त्याच्या जिवात जीव आला, त्यातून नेहमीचे घुमारे येऊ लागले मी डायल फिरवून कुठल स्टेशन लागत का पाहू लागलो. आवाज ऐकताच उषाकॉव्ह काम सोडून माझ्याजवळ आला मॉस्को रेडिओवरचा एक वाद्यवृद ऐकला मी मला जे ऐकायच त्यासाठी निरनिराळी स्टेशन पकडायचा प्रयत्न करत होतो. काही ठिकाणच्या बातम्या ऐकायला मिळाल्या, शेवटी अचानक हिटलरच त्याच्या नेहमीच्या थाटाच भाषण थोडस ऐकायला मिळाल

जाताना उषाकॉव्हन कोरीझकी तबाखूच सबध पाकीटच दिल आणि सिगारेटी वळण्यासाठी आख्खा वर्तमानपत्राचा कागदही दिला म्हणाला, 'आम्हाला काही त्या रेडिओतल कळत नाही गरज लागली तर पुन्हा बोलवीन' परत जाताच गराडा घातलेल्या मडळीना मी काय काय ऐकल ते सर्व सांगितल सगळ्यात मोठ आकर्षण ठरल ते जर्मनी आणि हिटलरच भाषण !

मार्च सपत आला होता कारखान्यात विनाव्यत्यय काम चालू होत टेलिफकन-प्रकरण सपल्याची हळहळ मला वाटू लागली त्याच सुमाराला एक वैशिष्ट्यपूर्ण माणसाशी माझी ओळख झाली अॅनास्ताझी कोलमेनो त्याच नाव

मी त्याला ऊव घेण्यासाठी शेगडीजवळ आलेला अनेक वेळा पाहिला होता. दणकट शरीरयष्टीचा अत्युत्तम नमुना होता तो सहा फुटाहून जास्त उंच भुऱ्या रंगाच्या केसांनी भरलेल डोक आणि चेहरा हिरवेगार घारे डोळे कोणाच्याही नजरेत सहज भरेल असा तो होता तिथल्या हलाखीच्या परिस्थितीतही त्याच वजन दोनशे पौंड असेल अतिशय नम्र कोणालाही मदत करायला तयार असलेला तो पूर्ण पुरुष होता वर्चचे ओंडके वाहून आणून ते घसरपट्टूचाना वापरता येतील असे फोडून देण हे त्याच काम

कारखान्याच्या दाराबाहेर उभा राहून मी त्याच्याकडे पाहात होतो त्याच नेहमीच वाहकाच काम चालू होत त्याला थोडी मदत करावी या हेतून मीही तिथ गेलो आणि एक ओंडका उचलण्यासाठी हात घातला तो ओंडका हलतोय कशाला ! उचलण तर सोडाच पण एक इंचभरही हलला नाही माझी अवस्था पाहून कोलमेनो तिथ आला नि म्हणाला,

'ठीक आहे दोस्त छोडो मी उचलतो ते !'

तो खाली वाकला आणि एकाच झटक्यात त्याने तो ओंडका असा काही खांद्यावर घेतला की, देखते रहो मी स्वत काही तसा अशक्त नव्हतो, पण हे म्हणजे अजबच प्रकरण होत आम्ही एकमेकांची ओळख करून घेतली तो लॅट-व्हियामध्ये जमीनदार होता वय फक्त २७ वर्ष ! पलायनाची माझी कल्पना पुन्हा उफाळून आली पण ही बोलायची जागा नव्हती 'आपल्याला केव्हा तरी नीट बोलल पाहिजे' मी म्हणालो

'अवश्य भेटू या मला आवडेल' तो भीमावतार म्हणाला

कारखान्याच्या खडखडाटात सहकाऱ्यानी ओरडून सांगितल, 'अरे तुझ्या 'मित्रान' तुला बोलावलय' आयगॉर माझी वाट पाहात पुतळ्यासारखा उभा होता हातातली घसरपट्टी खाली ठेवली, कपडे झटकले आणि त्याच्याबरोबर बाहेर पडलो

उषाकॉव्हबरोबर तीही होतीच त्यान सांगितल की, 'रेडिओ चालतोय पण आवाज फार हळू येतोय' मी तपासणी सुरू केली रेडिओ चालत तर होता, पण आवाज अतिक्षीण येत होता 'बॅटऱ्या बदलायला हव्या आहेत,' अस मी सांगितल 'करतो काही तरी व्यवस्था', म्हणून त्यान आपला ग्रेटकोट अंगावर चढवला आणि अधिकाऱ्यांच्या मीटिंगला जायचय, अस काही तरी बायकोजवळ पुटपुटून बाहेर निघून गेला एकमेकावर अतिशय जीव असल्याच त्या दोघांच्या हावभाव, हालचालीवरून सहज जाणवत होत

'मी तुझ्यासाठी चहा करते, तोपर्यंत त्यातल्या त्यात एखाद स्टेशन मिळत का पहा ना ! गाण तरी ऐकायला मिळेल'. ती हसत म्हणाली.

ती संगीताविषयी बरच बोलत राहिली चॉपीन बिथोव्हन आवडतात.

तरीही चायकोव्हस्की हा तिचा खास आवडता सगीतकार. तिन असही सागितल की, तिला पियानो वाजवायला फार आवडत असे पण तोच इथ आणायला न मिळाल्याच तिला फार दु:ख होत. तिचा विरगुळाच हरवला होता

तिला आवडेल अशी सुरावट सापडली सिंफनी वाद्यवृंद चालू होता त्या सगीताच्या पार्श्वभूमीवर ती आपल्याविषयी सांगत राहिली आणि मला सभाषणात ओढत मी माझ्याविषयी काही सांगाव असा प्रयत्न करत होती 'ही मी अशी आहे आयुष्याच्या या अशा फेऱ्यात सापडलेली आहे माझ्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही,' असच जणू ती सुचवत होती.

मला कळत नव्हत की, हे माझ्याच बाबतीत का घडतय ? मला मनातून जाणवल होत की, हे जरी उच्चपदस्थ असले तरी खऱ्या अर्थान वनवासच भोगतायत एक प्रकारे बहिष्कृत जमातीच जीवन जगतायत विशेषत माझ्याइतकीच तीही कैदी वाटत होती ती इथ आहे कारण फक्त तो इथ आहे. छावणी ३०३ चा खरा अधिकारी आहे तो पॉलीट्रक

गरम चहा पिता पिता तिन हळू आवाजात आपली कहाणी सागितली. तिच माहेर पिढ्यान्पिढ्या सैनिकी पेशाच होत तिचे वडील झारच्या राजवटीत कर्नलच्या हुद्द्यावर होते, पण कम्युनिस्ट राजक्रांतीच्या वेळी बोल्शेविकांनी त्याना ठार मारल होत धाकटा भाऊ विख्यात स्मोल्नी इन्स्टिटचूटच रक्षण करताना कामी आला निजवी नोव्हगोरॉड या गावी असलेल्या घरातून तिला आईबरोबर पळ काढावा लागला, पण आईसुद्धा फार दिवस जगली नाही ती उघड्यावर पडली पण तिन जिद्दीन नव्या आयुष्याचा स्वीकार केला काम करण्याचा परवान मिळवला अतिशय कष्टाचे दिवसही सरून थोडे सुखाचे दिवस आले. खास कामगारांना मिळणाऱ्या विशेष सवलतींपैकी मिळणारी सुट्टी उपभोगायला ती याल्टाला गेली होती तिथच तिला उषाकॉव्ह भेटला आणि त्यानतर तिन त्यालाच पुढच आयुष्यभर आपल दैवत मानल

ती उषाकॉव्हशी अत्यत एकनिष्ठ होती त्याला पोलडमधून इथ का पाठवल ते काही तिन मला सांगितल नाही त्याला प्रथम व्हॅलडीव्होस्टॉकला पाठवल तिथून जवळजवळ सहा महिने त्याच काही पत्र नाही की निरोपही नाही तिच्या ओळखीच्या पार्टीमधल्या काही मित्रांनी एवढच सांगितल की, त्याला सैबेरियातल्या एका छावणीवर प्रमुख म्हणून पाठविण्यात येणार आहे. तिने अविश्रात धडपड केली, अतोनात खटपट केली आणि अखेर प्रवास—परवाना मिळवून या छावणीत उषाकॉव्हजवळ येऊन राहू शकली

मी स्वत:ला सतत बजावत होतो. मी कैदी आहे तिला माझ्याविषयी कणव वाटतेय कारण तीही थोडी-फार त्याच अवस्थेत आहे. तिला आपल्या माणसाकडे आपल्या व्यथा व्यक्त करता येत नाहीत असही जाणवत होत की,

ही बाई जशी हळवी, भावनाशील आहे तितकीच चलाखही आहे आपल्याभोवती ज्याच उमेदीच आयुष्य वाया चालल आहे अशा कैद्याचा गराडा आहे, या जाणि-वेन ती आतून धसकली आहे कुठल्याही संवेदनाक्षम स्त्रीसाठी ही जागा नव्हती ती रशियन होती आणि रशियाच्या उज्ज्वल भवितव्याविषयी तिला जबर आस्था होती तरीही ती एक स्त्री होती आजूबाजूला घोंघावणार कैद्याच उध्वस्त जीवन तिला अस्वस्थ करत होत दिवसचे दिवस, महिन्यामागून महिने हे पाहात राहाण तिच्या सहनशीलतेच्या पलीकडच होत

आपल्या निळ्या डोळ्यानी तिन माझी नजर वेधून घेतली 'इथून पळून जायचा कधी विचार केलायस का?' त्या प्रश्नान मी उडालोच! प्रचंड धोका समोर उभा राहिला तोंड उघडून आ वासला तोंडातून शब्दच फुटेना! कसा फुटणार? माझा कप डचमळत कसाबसा खाली ठेवला. ती मात्र माझ्या भयचकित हालचाली आपल्या शांत, निळ्या, मनमोकळ्या नजरेन निरखत होती

आपल्या शांत आवाजात ती पुन्हा बोलू लागली, 'तू उत्तर देत नाहीयेस रावीझ, तुला माझा भरवसा वाटत नाहीये मला वाटत होत, मला या बाबतीत बोलायला आवडेल बोल, माझ्याजवळ बोलायला काहीच हरकत नाही .'

पलायन! जणू काही तिन माझ्या मनात, पार आतमध्ये डोकावून माझ्या इच्छा–आकांक्षेचा अत्यंत धोकेबाज, परवलीचा शब्द अचूक पकडून बाहेर काढला होता होय, मला तिच्याजवळ माझ्या स्वप्नाबद्दल बोलायच होत; पण तिनच हा प्रश्न विचारून माझी भाषाच बंद करून टाकली नाही; शब्द फुटण शक्यच नव्हत तेव्हढ्यात आयगॉर अवतीर्ण झाला अत्यंत बेचैन, अस्वस्थ मन स्थितीत मला निघावच लागल कुणी तरी महतीचा हात पुढे करतय् आणि तो स्वीकारता येत नाहीये, अशा अवस्थेत मी निघालो तिन शांत, औपचारिकपणे विचारल, 'रेडिओ बिघडला तर पुन्हा येशील?' मी घाईघाईन उत्तरलो, 'हो, हो, नक्की येईन. मला आवडेल यायला!'

पुढचे काही दिवस मला पुन्हा बोलावण येईल, या आशेची ज्योत सतत तेवत होती याच काळात सिग्मंड मॅकोवस्की या ३७ वर्षांच्या एका पोलिश कॅप्टनची ओळख झाली स्वच्छ विचारांचा, ठणठणीत प्रकृतीचा, तरतरीत लष्करी अधिकाऱ्याचा पक्का ठसा उमटलेला असा तो होता कोलमेलोप्रमाणच मी त्याचीही मनात नोंद करून ठेवली माझ्या मनोकामनेबद्दल मी त्याच्याजवळ काहीच बोललो नाही कर्नल–पत्नीकडून कसल्या अपेक्षा करायच्या हे काहीच कळत नव्हत एवढच वाटत होत की, ती निदान आपल्याला थोडा–फार सल्ला देऊ शकेल.

अपेक्षेप्रमाणे तिच बोलावण आलच या वेळी एकटीच होती मी रेडिओची बटण फिरवत आमच्या मित्रांसाठी काही बातम्या मिळतात का, ते पाहात होतो आणि ती सैबेरियात येणाऱ्या ग्रीष्म ऋतूबद्दल बोलत होती

मी संधी साधून उफाळून बोलू लागलो 'मागच्या खेपेला काय झालं त्या-बद्दल फार वाईट वाटतय मला माफ करा त्या पद्धतीचे विचार खरच माझ्या मनात घोळतायत; पण ही अनंत अंतर, दुर्गम प्रदेश, या सर्वांतून मार्ग काढायला माझ्याजवळ कसलीच साधन सामग्री नाही !'

'तू फक्त पचविशीचा आहेस आणि पुढची २५ वर्षं या असल्या भयानक वातावरणात काढायच तुझ्या मनात निश्चितच नाही, हे कबूल करायला, तुला घाबरायच काहीच कारण नव्हतं. निदान माझ्याजवळ तरी !' ती म्हणाली 'तू माझ्याबद्दल म्हणशील तर आमच इथ चांगल चाललय की. राहायला छान जागा आहे तुमच्यापेक्षा सकस अन्न मिळतंय हव्या तेवढ्या सिगारेटी मिळतायत पण तरीही मलासुद्धा इथे २५ वर्षं काढावीशी वाटणार नाहीत तेव्हा पलायन हे तुझ्या हृदयातल गुपित असायलाच हव आणि त्याबद्दल तू माझ्याजवळ बोललास, आपलं मन मोकळ केलस तर त्याचा तुला फायदाच होईल !'

अशा तऱ्हेन विषयाला वाट मोकळी झाली एखाद्या त्रयस्थाच्या भूमिकेतून आम्ही विचार करू लागलो आम्हीच प्रश्न उभे केले आणि आम्हीच उत्तर शोधू लागलो माझ्या मते इथून जर कोणी सटकू शकलाच तर पूर्वेला साधारण सहाशे मैल गेल तर कामचाटका गाठता येईल आणि तिथून शेवटी जपानमध्ये शिरता येईल

तिच म्हणण अस पडलं की, कामचाटकाला जाण म्हणजे घोडचूक ठरेल. कारण त्या भागाला सीमा रक्षणाच्या दृष्टीन अत्यंत महत्त्व होत आणि साह-जिकच तिथ कडा पहारा असणारच त्यापेक्षा पश्चिमेकडे जाणाऱ्या एखाद्या आगगाडीतून सटकून उरलमधल्या खाणीमध्ये प्रवेश मिळवावा तिथून कदाचित रशियाबाहेर पलायन करायला सोप जाईल अर्थात त्यासाठी प्रवास–परवाना, कामगार-परवाना यांसारख्या महत्त्वाच्या कागद-पत्रांचा प्रश्न उद्‌भवला असताच त्या दिवशीच्या चर्चेतून एवढच निष्पन्न झाल त्या दिवशी रात्री बिछान्यावर पडल्या पडल्या विचारांच थैमान चालू झाल विचार करता करता अस वाटल की, ती पलायनाच्या दृष्टीन दक्षिण दिशेचा जाणून-बुजून विचार टाळतेय की काय ? समजा, दक्षिणेकडे पळालो, प्रचंड बैकल तलावाला वळसा घातला पुढ ? पुढ काय ? अफगाणिस्तान–अचानक त्या देशाच नाव डोक्यात घुमल पुरेस दुर्ल-क्षित आणि तटस्थ राष्ट्र !

पुढच्या खेपेला कर्नलन स्वतःच बोलावणं पाठवल मला गमत वाटली की, त्याला खरोखरच त्या रेडिओच्या तलाच ज्ञान नव्हत वास्तविक तसा तो तल्लख होता रेडिओ या प्रकरणाचा त्याला किंचित दरारा वाटत असावा नकोच त्याच्या वाटेला जायला म्हणून मी त्याला निरनिराळी स्टेशन लावायला हवा असायचो.

त्याला बातम्या हव्या असायच्या त्या त्याला भाषण आतमीपत्राच्याद्वारे ऐकवत असे त्यावरून त्याची खात्री पटायला लागली की, रशिया युद्धात नक्की अडकणार! त्याला युद्ध आवडत होत, असं मुळीच नव्हे, पण सैबेरियातून सुटण्याची युद्ध ही एवढी एकच संधी त्याला दिसत होती आणि शेवटी त्याच जे काही सैनिकी शिक्षण झाल होत ते युद्धासाठी, तुरुगाधिकारी म्हणून खितपत पडण्यासाठी नव्हे।

त्याच्या पुढ्यात पलायनाच्या वगैरे रम्य कल्पना बोलण शक्यच नव्हत आपली बायको या असल्या भानगडीची चर्चा एका कैद्याबरोबर करते हे जर त्याला चुकून कळल असत तर त्यान हायच खाल्ली असती.

माझी जायची वेळ झाली तेव्हा तो रेडिओ ऐकण्यात मग्न होता ती मला पोचवायला दाराजवळ आली आणि म्हणाली, काही काळजी करू नकोस, सर्व काही ठीक होईल '

त्याच सध्याकाळी मी मॅकोवस्कीला सडासाजवळ गाठल आणि त्याच्याजवळ विषय काढला, ' काय रे, इथून पळून जाण्याविषयी तुला काय वाटत ?'

' तुला काय वेड लागलय् काय ? आपल्याजवळ पळून जायला साधन काय आहेत ? आणि समजा सटकलो तर पुढ काय ?'

' मला थोडी मदत मिळण्याची शक्यता आहे.'

' मिळेल ? मिळालीच तर मी तुझ्याबरोबर आहे साला वैताग आलाय या जागेचा !'

कर्नलच्या बायकोला या प्रकारच्या कटाची सूत्रचालक म्हणून काम करताना गमत वाटत होती मी इथून खरोखरच पळून जाईन किंवा कस, याबद्दल तिच्या मनात नक्की काय आहे, हे मलाही नीटस कळत नव्हत शक्यता अशी होती की, या इथल्या अत्यत नीरस कटाळवाण्या आयुष्यात काही तरी विरंगुळा म्हणून ती हे सर्व करत असेल

शन्यातून बरच काही उभ राहू पाहात होत तिच्या आवडत्या चायकोव्हस्कीच्या सगीतरचना ऐकता ऐकता तिच्या योजना चालू होत्या तुम्हाला अत्यत तडफदार आणि सुदृढ तरुणाचा गट करावा लागेल रोज पाव किलो मिळणाऱ्या पावातला पाव किलो भाग कारखान्यातल्या शेगडीच्या मागे ठेवून वाळवावा लागेल आणि तो लपवून ठेवायची व्यवस्था ही करावी लागेल तुम्हाला थैल्या करता येतील अशा गोणपाटाची व्यवस्था मी करते जादा कपड्यासाठी आणि पायताणांसाठी कातडही लागेल सैनिक हाकारे घालून सेबल ' प्राण्याना कोंडीत पकडतात आणि आमचे शूर अधिकारी त्याची शिकार करतात त्याची कातडी सुकवण्यासाठी बाहेरच्या तारांवर वाळत घातलेली असतात जगल-कामगारानी त्यातल रोज एक एक पळवल तर कोणाच्याही लक्षात येणार नाही बाहेर

पडण्याची योजना तुमची तुम्हालाच आखावी लागेल तसे बाहेर पडा आणि दक्षिण दिशेला कूच करा ! ज्या रात्री प्रचंड हिमवृष्टी होईल ती रात्र निवडा, म्हणजे तुमच्या पायवाटा आपोआप झाकल्या जातील !'

इतकं सगळं बोलून झाल्यावर काही तरी आठवल्यासारखं ती म्हणाली,– ' उषाकॉव्ह् इथ छावणीत असताना तुमचा बेत अमलात आणू नका ! तो लव-करच याकुत्सला बैठकीसाठी जाणार आहे तेव्हा काय ते करा माझ्यासाठी, कृपा करून एवढं करा !'

पतीबद्दल किती ही आस्था !

मी मॅकोव्हस्कीला तडक जाऊन गाठलं, ' आपण नक्की जायचं आपल्या साठी मदतीची व्यवस्था झाली आहे'

' आपल्याला किती माणसांची गरज लागेल ?' तो.

' मला वाटतं सहाएक माणसं पुरेत ' मी म्हणालो

' छान ! आपण तपास करू माझ्या विश्वासातला आणखी एकजण आहे

मला कोलमेनोची आठवण झाली मी म्हणालो, ' मलाही एकजण माहीत आहे बाकीच्याना आपण उद्याच गाठू !'

¤

' तो पहा तिथं उभा आहे ' मॅकॉव्हस्कीनं एका माणसाकडे बोट दाखवून म्हटलं दुसऱ्या दिवशी दुपारच्या सुटीत आम्ही माणसं न्याहाळत होतो रुंद खांद्याचा माणूस होता तो अत्यंत ढगळ कपडे घातले असले तरी त्याची पीळ-दार शरीरयष्टी लपू शकत नव्हती

' तू घोडदळातून आलायस् तेव्हा त्या जातीची माणसं तू सहज ओळखू शकशील !' मॅकोव्हस्की म्हणाला

' कोण आहे तो ?'

' पोलिश आहे. अँण्टन पालुकोविज् पोलंडच्या घोडदळात सार्जंट होता. आहे ४१ वर्षांचा; पण अत्यंत दणकट ! कुठल्याही प्रसंगाला तोंड देईल असा आहे अत्यंत तयार गडी आहे ! त्याच्याबरोबर कुठही उडी घ्यायला मी मागे-पुढे पाहणार नाही आपण वाटलं तर बोलू या त्याच्याशी !'

आम्ही त्याला गाठून त्याच्याशी बातचीत केली. मला अँण्टन एकदम आवडला त्यानं आमची योजना एखादी युद्धाची कामगिरी स्वीकारावी तितक्या उत्साहानं तात्काळ स्वीकारली मी पोलिश घोडदळात लेफ्टनंट होतो याचाही त्याला आनंद झाला



ग्रंथ संग्रहालय

'आपण हे करू या!' तो म्हणाला, 'हे काम सोप नाही, पण आपण नक्की पार पाडू'

सध्याकाळी कोलमेनोला गाठल तो हसला म्हणाला, 'अरे तू आहेस का? बोल!'

'कोलमेनो, मी इथून आणखी काही जणाबरोवर पळायच ठरवल आहे तू येणार का?

त्यान माझ्या खाद्यावर आपला जबरदस्त पजा ठेवून विचारल, 'खरच म्हणतोयस तू? पूर्ण विचार केलायस का तू?'

मी मान हलवून म्हणालो, 'विचार पक्का आहे लवकरच अमलात आणायचा निश्चय झाला आहे!'

तो हसला आणि आपल्या दणकट हातान दोनदा थोपटून म्हणाला,

'मीही येईन नुसत येईन नव्हे, तर गरज लागली तर तुला खाद्यावर वाहूनसुद्धा नेईन!'

आता आम्ही चौघे झालो तातडीन आमच्या योजनेला आकार द्यायच काम सुरू झाल मार्च सपत आला होता, याचा अर्थ फार सवड मिळणार नव्हती एकूण परिस्थितीच फार निरखून अवलोकन करण सुरू झाल अनेक गोष्टी लक्षात येऊ लागल्या त्यापैकी एक म्हणजे, कुपणाबाहेर रात्रीची गस्त चालू असताना सत्री पुढे यायचे आणि पाठीमागून गस्ती–कुत्रे मागे ठेवल्याबद्दल ते कुत्रे सारखे गुरगुरायचे हे भुकण साधारण दोन तासाच्या अतरान ऐकायला यायच. असही लक्षात आल की, त्याची फेरी उलट घडीच्या दिशेन व्हायची फेरीची सुरुवात दक्षिणेकडच्या सर्वांत लाबीच्या बाजून व्हायची तेव्हा एक विचार नक्की झाला, तटबदी ओलांडायची ती दक्षिण बाजूला असलेल्या बरा-कीत तबाखूची लाच देऊन जागा पटकावण सुरू झाल.

ॲण्टनन झारोला या कटात सामील केल युजीन झारो बाल्कन राष्ट्रातून आलेला युगोस्लाव्ह असावा तिशीचा होता रशियनाच्या तावडीत सापडण्यापूर्वी कारकून होता 'वाटेत थोडी मौजमजा हवी असेल तर झारोसारखा मनुष्य नाही!' ॲण्टनन सांगितल

मॅको, ॲण्टन आणि मी अशा आमच्या तिघाच्या चाचणी समितीन झारो भोजनरागेत असताना त्याची पाहणी केली उचीन ठेंगणासाच होता; पण बांधा मात्र चागला मजबूत होता जवळपास काळ्या डोळ्यांत एक हसरी आणि अत्यत मिस्किल छटा झळकत होती आजूबाजूच्या कैदी-जनांत त्याच्यामुळे हास्याचे फवारे उडताना दिसत होते

'ठीक आहे. घेऊ या त्याला आपल्यात!' मी ठराव पास केला

'मला प्रवास करायची आवड होतीच हा बत झकास जमेल !' आमच्यात सामील होताच झारो म्हणाला

'एक लक्षात ठेव ! ही काही मौजेची सहल नाही. भयानक अडचणींना तोंड द्याव लागणार आहे' मी सुनावल

'मला कल्पना आहे आणि तरीही मी तुमच्याबरोबर येणार आहे !' तो म्हणाला थोड्या वेळानं म्हणाला, 'या रशियन गाढवांना विनोदबुद्धी कशाशी खातात हे माहीतच नाही त्याच्यापासून लाब जायला मला आवडेलच !'

झारो आला आणि आम्ही पाचजण झालो

माझ्या कारखान्यातल्या शेगडीमागे पाव सुकवण्याचा कार्यक्रम चालूच होता सुकवून झाल की दूर कोपऱ्यात घसरपट्ट्याच्या प्रचंड ढिगामागे लपवून ठेवायच

सहावा भिडू कोलमेनान आणला. झकॉरियस मार्चिन्कोव्ह २८ वर्षांचा हा वास्तुशिल्पी लिथुआनियातून आला होता उचापुरा, दणकट बांध्याचा आणि अत्यत तरतरीत. पिंगट डोळ्याचा त्याला पाहताक्षणीच माझ त्याच्याविषयी अनुकूल मत झाल त्यान या प्रकारच्या योजनेचा खूप विचार केलेला दिसत होता येणाऱ्या अनत अडचणी लक्षात घेऊनही आपल्या प्रयत्नांना यश येण्याची आशा त्याला वाटत होती

आमच्या गुप्त चर्चेत सार्जंट अँन्टनन श्मीडच नाव सुचवल नावावरून हा रुसो जर्मन असावा असा माझा समज झाला. आमच्या तुरुग-वाटेवर उरल-मधल्या ऊफा इथ त्याला गाडीत चढवल होत ही जर्मन नावाची रशियन माणस म्हणज 'पीटर द ग्रेट' न कित्येक वर्षांपूर्वी जे जर्मन कुशल कारागीर आयात केले होते त्याचे वशज असावेत, असा माझा अदाज होता

मी सार्जंटला विचारल, 'तो जर्मन आहे का ?'

'मला ठाऊक नाही, पण त्याच नाव श्मीड आहे एवढ खर तो रशियन अतिशय चागल आणि सफाईन बोलतो तो इतरांपासून साधारणपणे अलिप्त असतो खूप विचारही करतो. मला त्यान अनेक गोष्टींबाबत फार चागला सल्ला दिला आहे मी त्याची शिफारस जरूर करीन !'

मॅकोन आणि मी श्मीडला भेटण्याची तयारी दर्शवताच अँन्टन खूष होऊन म्हणाला, 'श्मीड कुठला ते मी तुम्हाला दाखवीन !'

श्मीड भोजनरांगेत कॉफीसाठी पुढे सरकताना अँन्टनन मानेन खुणावल. मॅको आणि मी त्याच्याजवळ सरकलो

प्रथमदर्शनीच या सर्व साहसामध्ये तो अडचणींना कितपत तोड देऊ शकेल याविषयी माझ्या मनात शका निर्माण झाली चांगलाच वयस्कर दिसत

होता निदान पन्नाशीचा असावा तसा अंगा-खांद्याने मजबूत दिसत होता. रुंद आढ आणि कंबरेतही बारीक होता. दाट केसात आणि दाढीत वयाची निशाणी दिसू लागली होती. आम्हाला जवळ येताना पाहून, बहुधा अँटनन आधी कल्पना दिल्यामुळं, त्याच्या चेहऱ्यावर कसलच आश्चर्य उमटल नाही 'आम्हाला तुझ्याशी काही बोलायचय' मी रशियनमध्ये म्हणालो तोही त्याच भाषेत उतरला, 'तुमच्या बराकीच्या दिशेन चला, मी तुम्हाला गाठतो,' असं म्हणून तो रांगेत पुढ सरकला.

हातामधे कॉफीचा बपर घेऊन तो आम्हाला येऊन मिळाला आम्ही थांबलो आमच्याकडे पाहून हसला व म्हणाला, 'मित्रांनो, माझ नाव 'स्मिथ' मला कळल की, तुमची काही योजना आहे' आम्ही आ वासून बघतच राहिलो 'स्मिथ'! आम्ही पुनरुच्चार केला

'होय माझ नाव स्मिथ, मी अमेरिकन आहे तुम्हाला फारच आश्चर्य वाटलेल दिसतंय !' त्याला एकूण गंमत वाटत होती.

'आश्चर्य कसल ?' आमची तर त्यान चक्क दांडीच उडवली होती तो रशियन तर सुरेख बोलत होता. कसलाही अनाघाती उच्चार जाणवत नव्हता

'विश्वास ठेवण कठीण आहे' मी म्हणालो; 'पण मग तू इथ कसा आलास ?'

'तुमचा विश्वास बसणार नाही म्हणून पुन्हा सांगतो. मी अमेरिकन आहे. व्यवसायान इंजिनियर आहे आम्हाला साधारण ९ ते १० वर्षांपूर्वी मॉस्को-मधील भुयारी रेल्वेच, मेट्रोच बांधकाम करण्यासाठी रशियन सरकारन बोलावल होत ५० जण होतो त्यांनी मला ३६ साली पकडल आणि ठरवून टाकल की, मी कुणी तरी धंदेवाईक हेर आहे बस् ! आणि २० वर्षांची शिक्षा ठोठावली !' तो कॉफी भुरकत बोलत होता. अतिशय सहजसंथ, एखाद्या पट्टीच्या वक्त्याप्रमाणे त्याची शैली होती आम्ही बावळटासारखे त्याच्या तोंडाकडे पाहात राहिलो 'मी माझा बपर परत भरून आणतो आणि मग आपण बराकीकडे बोलत, बोलत चालू !'

आम्ही स्मिथला आमच्या झोपडीत आमंत्रण दिलं एप्रिल सुरू झाला होता एव्हाना मी आणि मॅकोन शेवटच्या बराकीत दरवाज्याजवळच्या जागा मिळवल्या होत्या कोलमेनोनही तिथ प्रवेश मिळवला होता आणि बाकीचेही लवकरच आमच्याच बराकीत जागा मिळवतील अशी आशा होती. मॅकोच्या बाकड्यावर आम्ही जमलो आजूबाजूचा कानोसा घेत मी योजनेची कल्पना दिली यश मिळायच असेल तर दक्षिण दिशेचा मार्ग अवलंबावा लागेल अति-शय दीर्घ पल्ला आहे, पण इलाज नाही ! आमच्यापैकी काहीजण मात्र पूर्वेकडे कामरचाका गाठण्याची कल्पना सोडायला नाखूष होते

त्यान उत्तर द्यायची अजिबात घाई केली नाही. त्यान अत्यंत हुषारीनं काही शकांच निरसन करून घेतल त्याला विचार करायला सधी देत आम्ही स्वस्थ बसून राहिलो थोड्या वेळान तो म्हणाला, 'मित्रानो, तुमच्यात सामील व्हायला मला अभिमानच वाटेल मलाही वाटत की, दक्षिण दिशेचा मार्गच योग्य आहे माझ्यावर विश्वास ठेवा !'

आम्ही स्मिथबरोबर बराच वेळ बसलो एकमेकाच्या वैयक्तिक माहितीची देवाण-घेवाण केली आमच्या रशियातल्या वास्तव्याला, इथल्या हालचालींना विशिष्ट वळन होत आमच्या अटक-कथा साधारणत एकाच धाटणीच्या होत्या स्मिथ फक्त वेगळा होता त्यान आम्हाला खूप काही सांगितल, पण आपल बारशातल नाव काही सांगितल नाही ! त्या वेळी नाही आणि नतरही नाही आम्ही सहा युरोपीय एकमेकाला पहिल्या नावान सबोधू लागलो, पण अमेरिकन मात्र नुसता मिस्टर स्मिथच राहिला !

त्याच्या चेहऱ्यावर जखमेचा एक प्रचड व्रण दिसत होता डोक्याच्या उजव्या कोपऱ्यापासून खाली मानेच्या डाव्या कोपऱ्यापर्यंत जवळपास नऊ ते दहा इचाची जखम होती मेट्रोच्या बांधकामावरची परात कोसळून अपघात झाला, अस तो म्हणाला

'हा एक अपघात सोडला तर माझ मॉस्कोमध्ये छान चालल होत कामसुद्धा तस मनोरजक होत पगारही भरपूर मिळत होता. रशियानाच्या-बरोबर काम करायला अवघड काहीच जात नव्हत खर पाहता त्याच्यामध्येही चागले कुशल तज्ञ होते, पण महत्त्वाच्या जागा मात्र माझ्यासारख्या परदेशी माणसाकडे होत्या त्याच साध कारण अस असाव मेट्रोच बाधकाम हा त्यांच्या प्रगतियोजनेतला फार मोठा टप्पा होता तेव्हा त्यात जर काही घोटाळा झालाच तर आमच्यासारख्या परकीयांच्या डोक्यावर खापर फोडायला सोप जाव मी एकूण खूष होतो मला रशिया खूप पाहायचा होता आणि त्या अनुभवासाठी माझी आर्थिक स्थितीही उत्तम होती

युद्धामधून थोडी उसत मिळून पचवार्षिक योजनेच्या आधारे प्रगती करणाऱ्या मॉस्कोसारख्या शहरात स्मिथ आणि त्याचे मित्र अत्यत सुखात होते. राहायला उत्तम जागा होत्या स्थानिक लोकाना जिथे परवाना लागत असे तिथे हे लोक चैनीच्या वस्तूंची खच्चून खरेदी करत असत स्मिथकडे मोटार होती आणि त्यातून तो मनसोक्त भटकत असे आणि तेच बहुधा रशियन गुप्त पोलिसांच्या डोळ्यावर आल असाव त्याच्याबद्दलची, त्याच्या हालचालींची माहिती गुप्त अहवालात जमा होत होती त्याला एक रशियन मैत्रिणही होती ते पोलिसाना आवडत नसाव, पण ते जाणून-बुजून दुर्लक्ष करीत होते

'काही तरी धोका आपल्याकडे वाटचाल करतोय हे मला कधी कळलच

नाही सुमारे एक वर्षाच्या कामानतर ,करारानुसार ठरलेला पगार अचानक दुप्पट केला गेला मी तर कसलीच मागणी केली नव्हती बाधकामाच्या अत्यत समाधानकारक प्रगतीच हे बक्षीस असाव तेव्हापासून त्याच माझ चांगल सूत जमतय अस वाटायला लागल होत.'

१९३६ सालच्या एका सध्याकाळी स्मिथ आपल्या मैत्रिणीला आपल्या राहत्या फ्लॅटवर राहायला घेऊन गेला होता मध्यरात्रीनतर केव्हा तरी गुप्तहेर खात्याच्या एका तुकडीन त्याच्या घरावर धाड घातली अत्यत सफाईन घातलेली धाड होती ती ! आजूबाजूच्या फ्लॅटमधल्या रहिवाशांना जराही पत्ता लागला नाही त्या दोघानाही पकडण्यात आल त्यानतर त्याला ती पुन्हा दिसलीही नाही ! पहाट झाली तेव्हा स्मिथला तुरुगाकामधल्या कोठडीत डाबण्यात आल होत. त्यानतर सहा महिने तेथेच त्याचा मुक्काम होता. अमेरिकन दूतावासातील कुठल्याही अधिकाऱ्याची साधी भेटही त्याला नाकारण्यात आली !

'नशिबाचा काय चमत्कारिक फेरा आहे बघा !' स्मिथ म्हणाला, 'आदल्या रात्रीपर्यंत एक अत्यत यशस्वी, उपयुक्त इजिनियर आणि दुसऱ्या दिवशी महा-घातकी परकीय हेर ! याचा अर्थ माझ्या दैनदिन हालचालीवर लक्ष होतच , पण मी घरी पाठवत असलेल्या पत्रावरही त्याच लक्ष असल पाहिजे इथल्या गमती-जमती पत्रात लिहिल्या, त्याचा अर्थ त्यानी इथली 'माहिती' मी अमेरिकन दोस्ताना कळवत होतो असा लावला होता

' त्यानतरचा खटला अत्यत गुप्ततेन आणि लुटुपुटीचा चालवला गेला वीस वर्षं सक्तमजुरी लावली माझी गाडी, माझ्या खासगी मालकीच्या इतर वस्तू जप्त केल्या मला वाटत मला उदारपणे दिलेला जादा पगार याच मार्गाने वसूल केला असावा !'

त्यान आमच्या योजनेविषयी खूप आस्थेन चौकशी केली सगळ्या योजनेच जास्तीत जास्त स्पष्ट चित्र त्याला हव होत त्यान अनेक महत्त्वपूर्ण शकाही विचारल्या एकूण अतराबद्दलही तो अत्यत विचक्षण होता नुसती मगोलियाची हद्द बर्फातून फरफटत गाठायची म्हणजे साधारण १००० मैलाची चाल आहे, याचीही कल्पना त्याच्या मनात होती आम्ही बराच वेळ कुजबुजत बोलत होतो त्याच बराकीतले इतर सहवासी अगावरची बर्फुल झटकून टाकत, शेगडीजवळ जाऊन ऊब घेत, इकडे–तिकडे त्यांची वर्दळ चालूच होती, पण त्याना आमच्या बेताचा सुगावा लागला किंवा नाही ते कळत नव्हत, पण बहुधा नसावा स्मिथलाही आमच्याच छपराखाली आणण आवश्यक होत त्याबाबतीत मदत करण्याच आम्ही त्याला आश्वासन दिल , पण एकूण वेळ थोडा होता. घाई करायला हवी होती.

तो उठला, विचारमग्न होत मान हलवली आणि म्हणाला, 'बराय् मडळी,

मी निघतो, भेटू लवकरच ! ' तो गेला सर्वांनी त्याचा सातवा आणि शेवटचा भिडू म्हणून उत्साहान स्वीकार केला होता

एप्रिलचा पहिला आठवडा सपताना आम्ही सर्वजण एकाच झोपडीत आलो होतो प्राथमिक तयारीचा एक भाग यशस्वी झाला होता साधनसामग्री, शिधा साठवण्याच काम जोमानं चालू होत कोलमेनोनं त्याच्या लाकूड वाहण्याच्या फेऱ्याच्या वेळी, बाहेरच्या तारावरची कातडी, एक एक करून बरीच काढून आणली होती कारखान्यात एक जाडजूड ६ इची खिळा मी सपाट करून, धार लावून तयार केला अनेक गोष्टींसाठी त्याचा उपयोग होऊ शकत होता आम्ही जमा केलेल्या कातड्यामध्ये सेबल, अर्मीन, सैबेरियन कोल्हे याची कातडी होतीच शिवाय कोणा अधिकाऱ्याने शिकार केलेल्या हरणाचही एक कातड आम्ही मिळवल होत किंवा पळवल होत, अस म्हणू या कातड्याचे तुकडे करून त्याच्याच वादयानी मोजड्या शिवून तयार केल्या, कबरेचे पट्टे केले थडीपासून बचाव करण्यासाठी केसाळ कातड (सैनिकाच्या लक्षात येऊ नये म्हणून) आतल्या बाजूला करून जाकिटच्या आत घालण्यासाठी बड्या केल्या पायाच रक्षण करण्यासाठी आवरण तयार केली

आमच हे सर्व काम रात्रीच्या वेळी चालत असे सतत भीतीचं दडपण असायच, कोणी चहाडी-चुगली–करील की काय ! कारण आमच्या कामाचा अहोरात्र चालणारा झपाटा कुणाच्याही सहज डोळ्यावर आला असता. कोणी असा निघालाच असता तर त्याला रशियन सैनिकाकडून जादा शिधा पण नक्कीच मिळाला असता, पण कुणी सूर्याजी पिसाळाचा वशज निघाला नाही !

कर्नल-पत्नीला, मला सहा साथीदार मिळाल्याच सागितल ते कोण अशी चौकशी तिन केली नाही, म्हणजे तिला त्याची गरजही वाटली नसावी तिन मला एक अत्यत अनमोल भेट दिली कुऱ्हाडीच एक धारदार पात होत ते !

'हे पात मला जन्मभर खात राहील ! आयुष्यात पहिलीच चोरी मी केलीय !' तिच मन तिला खात होत

मी कुऱ्हाडीसाठी दाडा तयार केला तो दाडा आपल्या विजारीच्या मागच्या पट्ट्यात जाकिटाच्या आड कायम लपवण्याची जबाबदारी कोलमेनोन घेतली

अशीच आणखी एक अत्यंत उपयुक्त वस्तू मी तयार केली १ फूट लाब आणि ३ इच रुदीच्या एका जाड करवतीच्या पात्यापासून एक सणसणीत सुरी तयार केली. आकार देण्यासाठी कारखान्यातील शेगडी आणि धार लावण्या-साठी दगड होताच लाकडाचे दोन तुकडे चामड्याने भक्कम बाधून त्याची मूठ तयार केली कोलमेनोन कुऱ्हाडीचा ताबा घेतलाच होता. मी सुऱ्याचा पालक झालो यापैकी काहीही उघडकीला आल असत तर कबरतीच होती !

वाटेत शेकोटी पेटवायची झाली तर काय करायच, याचही उत्तर आम्ही

शोधल होत. आगपेट्यांचा विचार करण वेडेपणाचच होत इतक्या त्या दुर्मिळ होत्या, पण त्याऐवजी एका प्राचीन मार्गाचा अवलब करायच ठरवलं होत त्या भागात झाडावर बुरसटलेल्या शेवाळासारख किंवा स्पजासारख काही तरी वाढत असे रशियन भाषेत त्याला 'गुबका' म्हणतात ते उकळून वाळवल की त्याचा जळण म्हणून उत्तम उपयोग होत असे. ते तयार करून आमच्या जाकिटातून भरून ठेवू लागलो ठिणगीसाठी गारगोटचा आणि लोखडी खिळे याचाही साठा करून ठेवला

१९४१ एप्रिलच्या १३ तारखेला ईस्टरचा रविवार येत होता त्याआधी ६ तारखेलाच आमची तयारी पूर्ण झाल्यासारखीच होती तयारीच्या साधनानी आमची बाकडी भरली होती डोक आणि मान एकाच वेळी झाकली जाईल अशा केसाळ कातडयाच्या सात 'बाला क्लाव्हा' टोप्या तयार केल्या होत्या पलायनाची जय्यत तयारी झाली होती कातडी, कुऱ्हाड, सुरा' सुका पाव वगैरे त्यातच त्यातल काही चोरीला तर जाणार नाही ना, अशी धास्तीही सतत मनात असायची

आणि त्याच दिवशी कर्नल-पत्नीन निरोप पाठवून मला बोलावल 'नवरा याकुत्सला गेला आहे' म्हणूनच त्या दिवशीच्या कवायतीला तो हजर नव्हता 'तुमच्यासाठी वाणसामानाच्या गोणत्यापासून ७ थैल्या केल्या आहेत एक एक करून तुम्हाला त्या न्याव्या लागतील !' हे सर्व बोलताना ती अतिशय शात भासत होती माझ मात्र काळीज धडधडत होत पहिली थैली तिन दिली तेव्हा ती गरजेच्या वस्तूनी भरलेली पाहून मी थक्कच झालो ! ही न्यायची कशी ? जाकिटाच्या आत काखेजवळ ती दाबून धरली दोन्ही हात विजारीच्या खिशात घातले आणि सावधपणे सटकलो रोज एक याप्रमाणे सातही थैल्या हस्तगत केल्या !

शेवटच्या काही दिवसात आम्ही एक मेंढीच्या कातडयाच जाकीट मिळवल कोणा सैनिकान वापरून जीर्ण झाल्यावर टाकून दिल होत चोर–शिकारी वापरतात तसली युक्ती आम्हाला उपयोगी पडणार होती जगलात चोरून शिकार करताना कुत्र्याना आपला वासावरून माग काढता येऊ नये म्हणून हे चोर-शिकारी आपल्या माग असल मेंढीच कातड फरफटत नेत म्हणजे त्याच्या उग्र वासात मानवी वास लपत असे याच युक्तीचा वापर करून बघायच आम्ही ठरवल होत

हवामानाचा अदाज घेत योग्य सधीची आम्ही वाट पहात होतो आम्हाला बर्फुलाचा पाऊस हवा होता. चांगला लपफेदार बर्फुलांचा जोरदार वर्षाव होण अत्यत आवश्यक होतं त्यामुळ आमच पलायन लपणार होत सोमवारी थडी खूप होती, पण आकाश स्वच्छ होत मगळवारी जोरदार वाऱ्यासह गारांचा

पाऊस कोसळला बुधवारी मात्र सकाळी दहा–अकरा नतर आम्हाला हव्या असलेल्या सधीची लक्षण दिसू लागली आकाश शिशाच्या रगासारख काळभोर होऊन, बर्फुलाच्या पावसाला सुरुवात झाली जोर वाढला. 'निर्मनुष्य' जागेत बर्फ साचू लागला तारेपर्यतची जागा भरून येऊ लागली. दुपारच्या भोजनसुट्टीत आम्ही सात जण एकमेकांना भेटलो इशारा निरोप दिला गेला 'हाच तो दिवस !'

दुपारी ४ वाजता घसरपट्टीच्या कारखान्यातून मी बाहेर पडलो, तो शेवटचाच ! बाहेर पडताना माझ्या फुफैका जाकिटात सुक्या पावाचा साठा लपवला, सुरा पोटरीभोवती गुंडाळला त्याचा थडगार स्पर्श अगावर काटा आणत होता सध्याकाळच कॉफी–पावाच भोजन सपवल आणि एक एक, दोघ दोघ असे बराकीत परतलो

बराकीत योजनेवर शेवटची चर्चा, दबल्या आवाजात, पण जोरात चालू झाली सडासाच्या फेऱ्या वाढल्या त्या फेऱ्यातच ही चर्चा सुरू होती फार घाई करून उपयोगी नाही सर्व छावणी तळ विसावल्यानतरच हालचाल करायला हवी होती स्मिथनच ही कल्पना माडली आणि पटवली मध्यरात्र हीच पळायला योग्य वेळ, तोपर्यंत आपण अत्यत शात राहिल पाहिजे चेहऱ्यावर कसलीही अधीरता दिसता उपयोगी नाही त्यानच हे सुचवल आम्हालाही ते पटल. मधल्या काळात बर्फुल मात्र आशीर्वाद दिल्यासारखी पडत होती चागली मोठी मोठी कापसाच्या बोचक्यासारखी पडत होती सगळा परिसर गच्च भरून गेला

तेवढ्यात झारोन आचरट कल्पना मांडली तो म्हणाला 'आज बुधवार आहे पॉलट्रिकच्या प्रचारसभेला जाऊन बसू या तेवढाच बरा वेळ जाईल!'

आम्ही हसलोच पण मॅको तेवढ्यात म्हणाला, 'खरच, काय हरकत आहे ? जाऊ या पॉलट्रिकलाही बर वाटेल '

शेवटी आम्ही सातहीजण निघालो आमचा मौल्यवान खजिना आपापल्या बाकड्यावर तसाच ठेवून दिला होता दिवसभर इतक चांगल घडत असताना शेवटच्या क्षणी वाईट काहीही होऊ शकणार नाही, असा आत्मविश्वास आम्हाला वाटत होता आम्ही प्रचारवर्गात अगदी मागच्या जागावर बसलो त्यान आश्चर्योद्गार काढत आमच स्वागत केल आम्हीही सस्मित त्याचा स्वीकार केला चेहरे अत्यत स्वस्थचित्त ठेवले होते

आजवर हजर राहिलेल्या राजकीय सभांमध्ये त्या रात्रीची सभा अत्यंत थरारक झाली अर्थात त्याच श्रेय पॉलट्रिकच्या भाषणाला अजिबातच नव्हतं उषाकॉव्हच्या गैरहजेरीत तोच तुरुग छावणीचा सर्वेसर्वा होता त्यामुळे जोषात होता तेचतेच चऱ्हाट पुन्हा ऐकल रशियान राज्यक्राती करून घडवलेला चमत्कार, श्रमजीवीच खरखुर मोल आम्हीच कस जाणल, राष्ट्रशिस्तीच्या

चौकटीत राहून पाळावयाच्या स्वयंशिस्तीत महत्त्व, साम्यवादी विचारांच जगात वाढत चाललेल महत्त्व अनेक विषय त्यात होते.

साधारण दीड तास त्याची वडबड ऐकून आम्ही जायला निघालो एक-मुखान 'गुड नाइट' केलं त्यानही 'गुड नाइट' म्हणून प्रतिसाद दिला

आमच्या बराकील सर्वांची विसावण्याची तयारी चालू होती दाराजवळ-च्याच बाकड्यावर स्मिथ आणि झारो होते त्यांनी आम्हाला इशारा करायचा होता आम्ही आपापल्या बाकड्यावर चढून वाट पाहात आडवे झालो आम्ही सहाही जण सताड जागे होतो, पण माझ्याच खालच्या बाकड्यावर कोलमेनो मात्र मंदसप्तकात घोरायलाही लागला.

माझ्या हृदयातील ठोके मलाच धाडधाड ऐकू येऊ लागले मला आठवल की, आपण कर्नल पत्नीचा निरोपही घेतला नाही कदाचित तिलाच ते अवघड वाटल असत

किती तास गेले कुणास ठाऊक, वेळ जाता जात नव्हता बराक हळूहळू शांत झाली क्वचित कुणाच्या घोरण्याचा आवाज असेल किंवा कुणी तरी झोपेत वडबडत असेल, तेवढंच

स्मिथन माझ्या खांद्याला स्पर्श करून म्हटल, 'आत्ता!'

मीही कोलमेनोला हळूच जाग करून म्हणालो, 'आत्ता!'

## पलायन

आमच्या थैल्याचे बंद हातात धरून आम्ही बाकड्यावरून झटक्यात उतरलो, गादीवजा शेवाळ उशीच्या जागी रचून ठेवल 'सगळे तयार?' मी विचारल, सगळ्यांकडून घशातल्या घशात उत्तर आल 'होय!' कुणाला अजून विचार बदलायचाय?' कोणाकडूनच उत्तर आल नाही.

'चला तर मग!' मँको म्हणाला

मी दाराजवळ थैली टाकली आणि बाहेर पाऊल ठेवल, सगळी छावणी शांत होती आणि धमाल 'कापूस' वृष्टी चालू होती तारेच कुंपण जवळपास कुठे दिसेनास झाल होत आग्नेयेचा मनोरा हे आमच सगळ्यात जवळच धोक्याच ठिकाण, पण तिथून २० यार्डांवरचंसुद्धा काही दिसू शकत नव्हत. इतर तुरुंग–छावण्यांतून असतात तसे प्रकाशझोत, विजेच्या तारा वगैरे काहीही नव्हत याबद्दल आम्ही त्यांचे आभारच मानायला हवेत

ताराच आतल कुंपण आमच्यापासून १०० यार्डांवर होत बर्फामुळ एकजीव घट्ट झालेल्या ताराच भेंडोळ जमिनीच्या उंच-सखलपणाला बिलगून नव्हत ही गोष्ट आम्ही पूर्वीच हेरली होती ती अजूनही तशीच असेल अशी आशा आम्हाला वाटत होती त्यावरच सर्व अवलंबून होत आमच्या समोरच

जमिनीचा भाग थोडा खालवटला होता तिथला बर्फ थोडासा उकरला तर तारांच्या खालून पलीकडे निसटता येईल अशी खाची होती

एकएक मिनिटाच्या अतरान आम्ही पुढ सरकू लागलो झारो सगळ्यांत पुढ होता पहिल्याच फटक्यात त्याला योग्य जागा सापडावी अशी प्रार्थना आम्ही करत होतो त्याच्यामागून लियुआनिअन, मग स्मिथ होते पाठोपाठ मॅको, पालुको होते. प्रचड कोलमेनो माझ्यापुढच होता माग वळून मला म्हणाला 'देव करो आणि झारोला माझ्यासाठी प्रचड फट करण्याची बुद्धी देवो !'

कोलमेनो ठरल्याप्रमाण पुढ पळत सुटला. थैली तारेखालून आधी ढकलण्यासाठी पुढ्यात धरली होती आता माझी पाळी होती तळहाताना घाम सुटला होता बराकीत शेवटची नजर फिरवली सगळ शात होत मी धूम सुटलो

मी तारेजवळ पोचलो तेव्हा दोघेजण पलीकडे होते आणि स्मिथ निसटण्याचा प्रयत्न करत होता आम्ही खाली दबून पाळी येण्याची वाट पाहात होतो मन अधीर करणारा वेळ भराभर चालला होता आहू अई असे तसे बारीक घुसमटलेले आवाज काढत सार्जंट आणि मॅकोही निसटले त्यानतर महाकाय कोलमेनोन आधी थैली मग आपल डोक फटीतून पुढ सरकवल माझा श्वास थाबला तो अर्धा सरकला आणि वरच्या काटेरी तारेन त्याच्या पाटीवरच्या जाकिटात आपली नख अडकवली मी खिसफिसत म्हणालो, 'थाब, अजि- [illegible] '

[illegible] त्याची थैली ओढून घेतली आणि तारेतून सुटका करायला सुरुवात केली मिनिटामागून मिनिट सरकत होती अतिशय अस्वस्थतेमुळ माझा जबडा घट्ट दाबला गेला होता हाताच्या बोटावर तबल्याचा ताल धरावा तसे सेकद मोजत होतो. पलीकडच कुणी तरी कुजबुजल आणि कोलोची सुटका झाली मी निःश्वास सोडला. पाठोपाठ मीही निसटलो पूर्ण २० मिनिट मोडली ह्या प्रकारात। पहिला अडथळा पार झाला होता।

आता पुढचा अडथळा म्हणजे खोल चर त्यात आम्ही उतरलो कोलो पलीकडच्या काठाला म्हणजे लाकडी कुपणाच्या बाजूला टेकून उभा राहिला. ती बाजू चढर-उताराची होती कोलो आपल्या दोन्ही पजाचा उपयोग करून आम्हाला एकेकाला वर पोचवू लागला वर चढल की, लाकडी भिंतीला अगदी चिकटून उभ राहाव लागत होत. कारण वर जागाच नव्हती, पण खुद्द कोलोला वर खेचून घेण्यात आमचा बराच वेळ गेला केवढ धूड होतं ते। मग पुढचा कार्यक्रम बर्फामुळ १२ फुटातील थोडीशी उंची कमी झाली होती. कोलोच्याच खाद्यावर चढून, पूर्ण हात उचावून वरचा काठ गाठला नशिबान पलीकडचा आधार-खाब वरपर्यंत होता त्यावर नीट उभ राहून खालच्या माणसाना खेचून घेण सोप जात होत

पुन्हा एकदा कोलोला वर ओढायचं म्हणजे प्रश्नचिन्ह उभं राहयलं मी व मॅकोन नीट उभं राहून, खाली वाकून कोलोचे दोन्ही हात धरले त्याला खेचण्याचा प्रयत्न करू लागलो तीन–चार इंच काम राहिले आणि आमची ताकद संपली ! त्याला खाली सोडाव लागल. असा प्रकार तीन वेळा झाला आम्हाला त्या श्रमान तसल्या थंडीतही घाम फुटला. हात-पाय कापायला लागले काय करायच ? पुन्हा एकदा जीव तोडून त्याला उचलला आणि या वेळी मात्र त्याच्या बोटांना वरचा काठ लागला त्याबरोबर त्यान आमचा हात सोडून स्वत च्याच अफाट ताकदीवर वर येण्याचा प्रयत्न केला आणि तो आला ! आणखी, आणखी वर आला आणि खांबावर उभा राहिला लाकडी भिंतीला लागूनच एक तारांच भेंडोळ होत आम्ही सर्वांनी धबाधब त्याच्या पलीकडे बर्फाच्या ढिगावर उड्या मारल्या. एकदोघांच्या उड्या नीट पडल्या नाहीत त्यांना थोड-फार खरचटल, पण त्याकडे लक्ष द्यायला वेळ होता कुणाला ? आता आम्ही गस्त-गल्लीमध्ये उभे होतो त्याच वेळी जर गस्त-फेरी झाल्याचा इशारा कुत्र्यांनी दिला असता तर आमची काय अवस्था झाली असती कुणास ठाऊक ! वेळ भराभर सरकत होता

आम्ही पलीकडच्या कुंपण-भिंतीशी धावतच गेलो ही त्यामानान कमी उंच होती या वेळी सर्वांनी जोर करून कोलोला आधी उचललं. तो वर पोचला सर्व चालू असताना आमची थोडी खिसफास, कुजबूज चालू होती आवाज होता थोडाच, पण नीरव शांततेत आम्हालाच तो भयकर वाटत होता कोलोन आम्हाला एकेकाला खेचून घेतल आणि पलीकडे टाकल या वेळी मी सगळयात शेवटी होतो पलीकडे उतरताच शेवटच्या अडथळ्याकडे जीव घेऊन धूम ठोकली त्याच झपाट्यात तारेच्या भेंडोळ्यावरून कोलांट्या घेतल्या कोणाकोणाला किती लागल याची चौकशी केली आणि पुढच्याच क्षणाला पळायला सुरुवात केली सगळी कुंपण पार करून झाली होती मी मेंढीच्या कातड्याच जुनेर काढल आणि आमच्यामाग फरफटवत पळू लागलो

आम्हाला प्रचंड धाप लागली होती श्वासोच्छ्वास करण पावलागणिक अशक्य होत होत घशाला कोरड पडली होती, पण पळण भाग होत बर्फुलांचे कपडे घातलेल्या झाडांच्या प्रचंड जंगलात आम्हाला शिरायच होत दक्षिणेकडे आमची तोंड होती आणि छावणी आमच्या पाठीमाग होती एकेकजण धडपडायला सुरुवात झाली. एकमेकाला हात देत पुढं पळत होतो पळण्याच रूपांतर हळूहळू दुडक्या चालीत झाल त्याच पद्धतीन तासन तास, पहाट झाली तरी पुढं सरकत होतो पुढचा सबंध दिवस तसाच ढकलत जाव लागलं इलाजच नव्हता जितक्या दूर जाता येईल तेवढ जायला हव होत पळताना आमच्या थैल्या आमच्या पाठीवर लदालदा आपटत होत्या जरासा श्वास घेऊन झाला की, मी पुन्हा सग-

ळ्यांना हाकलत होतो हा प्रकार सकाळी अकरापर्यंत चालला आणि त्यानंतर पुढं पाऊल टाकणं कुणालाही अशक्य झालं ! मी मेंढीचं कातडं उचलून घेतलं. एकमेकाकडे थकल्या नजरेनं सगळेजण बघू लागले पालुको ओणवा होऊन गुडघ्यावर हात टेकून प्रचंड धापा टाकत होता श्वास घ्यायचा प्रयत्न करत होता. दोघजण खाली बसून दम खाऊ लागले. आमच्या सगळ्याची तोंड वासली होती कुत्र्यासारख्या जिभा बाहेर काढून श्वासोच्छ्वास करण्याचा प्रयत्न चालू होता

हा भू-भाग एखाद्या घमेल्यासारखा होता झाडी थोडीशी विरळ होती. आम्ही इतके थकलो होतो की, पलीकडचा किंचितसा चढही चढणं अशक्य होतं. तिथं आम्ही सुमारे दहा मिनिट उभे होतो तोंडातून शब्दही फुटणं अशक्य, अशी धाप होती शून्याशाखाली तपमान असलेल्या हवेतही आम्हाला दरदरून घाम सुटला होता !

अजूनही बर्फ पडतच होतं, पण आता जोर ओसरला होता त्याची जागा वाऱ्यानं घेतली आणि तो झाडामधून वाहताना कण्हल्यासारखा आवाज होऊ लागला काटकुळ्या फांद्या विचित्र करकरू लागल्या शिकार होऊ घातलेल्या जनावरांसारखे आम्ही कान टवकारून होतो पाठलागाची काही चाहूल लागते का, याचा कानोसा घेत होतो कुठं कुत्र्याचं भुंकणं ऐकू येतं का, पाहात होतो, पण आवाज येत होता तो फक्त वाऱ्याचा भुरभुरणाऱ्या बर्फुलांचा आणि सळसळणाऱ्या झाडाचा !

आमच्या डाव्या हाताला वरच्या अंगाला झाडी जरा [illegible] राहून म्हणाला, 'आपण तिथं जाऊ या तिथं आडोसा चांगला आहे आपल्याला वाऱ्यापैकी लपता येईल !' अंगात त्राण नसल्यामुळं सगळे कुरकुर करू लागले स्मिथ माझ्या मदतीला आला म्हणाला, 'रावीज् म्हणतो ते बरोबर आहे चला लवकर !'

कसेबसे चढ चढून गेलो एका प्रचंड बुंध्याच्या झाडापाशी आसरा घ्यायचं ठरलं बुंध्याजवळचा सहा-सात चौरस वारांचा भाग सपाट केला तिथन काढलेल्या बर्फाची छोटीशी भिंतच उभारली कोलोन काही फांद्या तोडून आणल्या आणि झाड आणि बर्फाची भिंत यांच्या आधारानं छप्पर तयार केलं त्यावर बर्फ पसरला आणि झकास आडोसा तयार झाला सैबेरियात शिकलेला हा पहिला धडा होता वाऱ्यापासून बचाव करा, तोच तुमचा मारेकरी होईल आजूबाजूला बर्फाचा आडोसा करा आणि खुशाल त्याच्या आड झोपा ! परांच्या गादीवर झोपल्यासारखं उबदार वाटेल

इथं आम्हाला आमचं सामान नीट पाहाता आलं प्रत्येकाच्या थैलीमध्ये एकेक भाजलेल्या पावाची लादी होती, थोडा मैदा सुमारे अडीच किलो बार्ली,

थोड मीठ, कोरीझकी तबाखूच एकेक पाकीट आणि जुना रद्दी कागद, एवढ सामान होत याशिवाय मी सुकवून साठा केलेला पाव होताच प्रत्येक थैलीवर आम्ही केलेल्या मोजक्या आणि इतर कातडयांचे तुकडे होते आम्ही छोटयाशा बर्फकुटीत शिरलो अगदी एकमेकाला घट्ट बिलगून पडलो हळुवार आवाजात कुजबूज सुरू झाली पहिला मुद्दा निघाला, धूम्रपान करायच की नाही ? सर्वा-नुमते अस ठरल की, धूम्रपान कराव त्याचा मनावरचा, शरीरावरचा ताण कमी व्हायला फार उपयोग होईल. धूर दिसला तरी त्या मानाने धोका कमी आहे झाल ! सगळयांचं धूम्रपान सुरू झाल निळया धुराकड पाहाताना सर्वांच्या चित्तवृत्ती शिथिल झाल्या

आम्ही तुरुगतळापासून तसे काही लांब आलो नव्हतो. त्यामुळ शेकोटी पेटवण्याचा प्रश्नच नव्हता. तेव्हा कोरडया पावाचे थोडेथोडे लचके आम्ही तोडले ते खाताना एक गोष्ट अचानक लक्षात आली. घोडदळातून आलेल्या सार्जंट पालुकोच्या तोंडात एकही दात नव्हता ! असला कडक-कोरडा पाव खाण म्हणजे त्याच्या जिवावरच काम होत पाव भिजवून खाण एवढाच मार्ग त्याच्याकडे होता. इथ तर पाण्याचा थेंबही नव्हता ! त्यान पाव बर्फातच घोळवून मऊ केला आणि कसाबसा घशाखाली रेटला !

'मला पकडल तेव्हा माझ्या तोंडात छान कवळया बसवलेल्या होत्या त्या राडेच्या रशियन सैनिकांनी मला थोबाडून त्या बाहेर काढल्या आणि जमिनीवर आपटून फोडून टाकल्या केवढ प्रचड शौर्य गाजवल अस हसत होते साले ! माझ्यासमोर मात्र सकटच उभ राहयल तुरुगातला तो पाव बोळक्या तोंडान खायचा म्हणजे काय महाकर्म होत, ते तुम्हाला कस सागू ? समजत नाही आपण जिथे जाणार आहोत तिथ पोचलो की, पहिल्यांदा दाताच काम करून घेऊ !'

पालुकोच्या या केविलवाण्या निवेदनावर झारोन विनोदच केला. म्हणाला, 'आपण त्या कवळयाला सोनेरी मुलामा देऊ. त्या तुला शोभतीलच !' सगळेच या विनोदावर हसू लागलो. पालुकोही सामील झाला.

त्या दिवसाचा बाकीचा वेळ आम्ही झोपून काढला आळीपाळीन, एकान बिळाच्या तोंडाशी जाग राहून पहारा करायचा. कोलो तर एखाद्या रांगून रांगून दमलेल्या लहान मुलासारखा झोपला ! छान गोड आवाजात घोरायला लागला मार्चिनकोनं आम्हाला जाग केल तेव्हा दिवस मावळायला आला होता आम्ही थोडासा पाव खाल्ला, एकेक सिगरेट ओढली आणि बिळा-तून रांगत बाहेर पडलो अगदी झिरमिर बर्फ पडत होता. थडी तर मी म्हणत होती आमची शरीर मात्र श्रमान अत्यत, आंबून गेली होती

आम्हा सातही जणाना तुरुगतळापासून आपण शक्य तितक्या लवकर

आणि शक्य तितक्या दूर गेल पाहिजे, याची मनोमन पूर्ण जाणीव होती ती दुसरी रात्र आम्ही चालत आणि पळत काढली आजूबाजूला पसरलेल्या बर्फाळ-वटात गडद अंधार कधीच दाटला नाही, पण कधी कधी तीन-तीन फूट भुस-भुशीत बर्फुलांतून चालायच म्हणजे नाकी नऊ येत होते पहाटेच्या वेळी एक गोठलेला ओढा पार केला पलीकडेही जगल होतच त्या जगलात आम्ही आमचा मुक्काम टाकला

पहिले चार ते पाच दिवस आम्ही हाच कार्यक्रम ठरवला होता रात्रभर चालायच आणि दिवसभर बर्फाचीच गुहा करून त्यात विश्रांती घ्यायची. नशि-बान पाठलागाच कसलही चिन्ह दिसत नव्हत आमच पलायन लक्षात येताच तपास सुरू झाला असणार, पण रात्रभर पडलेल्या बर्फान आमच्या पाऊलखुणा पूर्णपणे झाकल्या गेल्या असणार ! साहजिकच तपासाची दिशा पूर्वेकडे म्हणजे सगळ्यात जवळच्या सीमेकडे वळली असणार अर्थात हे असच असेल, अस वाटून घेण्यापलीकडे आम्ही काहीच करू शकत नव्हतो. दक्षिणेची वाट धरल्या-बद्दल आम्ही आमचच सावधपणे अभिनदन केल दिवसा वाटचाल करायला सुरुवात केली एकाच ओळीत पण विखरून चालत असू दिवसाकाठी साधारण तीस मैलाची वाटचाल होत होती दक्षिण दिशा समजायला आम्हाला सूर्याचा उपयोग होत होता त्याचप्रमाणे झाडावर सावलीच्या बाजूला वाढलेल्या शेवाळ्याचीही मदत होत होती वाटेत अनेक छोटे-छोटे गोठलेले ओढे लागले आणि त्याच्या दिशेवरून ते दक्षिणेकडे असलेल्या मोठ्या लेना नदीला मिळत असावेत असाही अदाज आम्ही बाधला वाट अत्यत कष्टाची होती थडी आणि दमछाक याच्याशी सामना चालू होता, पण आमची हिंमत दांडगी होती आम्हाला सारख वाटायच, कुठ तरी शेकोटी पेटवावी, परतु आम्ही स्वत लाच बजावल होत की, लेना नदी आल्यावर मगच आगोटी पेटवायची !

सुमारे आठवड्याच्या प्रवासानतर आमच्यात आपोआप विभागणी होऊ लागली समविचाराचे, समव्यावसायिक एकत्र चालू लागले खऱ्या अर्थान सैनिक असलेले मॅको आणि पालुको याची जोडी जमली मार्चिन तसा गभीरच, पण कधीकधी अनपेक्षित वेळी तो कोरडा विनोद करून जायचा त्याची आणि कोलोची गट्टी जमली. स्मिथ, अमेरिकन असला तरी त्याचा मनमोकळा स्वीकार आम्ही केला होता तो माझा जिगर झाला स्वच्छद, गमत्या झारो सर्वांशी मिसळून वागत होता, सर्व जोड्यावरोबर सवाद साधून होता झारो हा काही तरी वेगळाच मनुष्य होता ! बघाव तेव्हा आनदी, काही तरी थट्टामस्करी करायच्या तयारीत असलेला आता आम्ही दिवसभराच्या श्रमान थकून रात्रीच्या विश्रांतीसाठी थाबलो की केव्हा झोपेच्या आधीन होतो अस व्हायच, पण झारोला विनोद करायची लहर यायची आमच्या आणि त्याच्याही दमछाकीची

नक्कल करायचा, फतकल मारून बसायचा काय, रशियन नाचाचे प्रकार काय करून दाखवायचा, सगळी मजाच ! कोलो तर त्याच्या विनोदी चाळ्यांमुळ इतका हसायचा की त्याच्या डोळ्यातून दाढीवर पाणी गळायला लागायच, चिडण, घाबरणं म्हणजे काय ते झारोला ठाऊकच नव्हत आजवर अनेक विनोदी माणस भेटली, पण झारोसारखा नाहीच अत्यंत कठीण प्रसगातसुद्धा विनोदीबुद्धी कशी शाबूत ठेवावी, हे झारोनच आम्हाला शिकवल

आठव्या किंवा नवव्या दिवशीचा प्रवास त्या मानान बराच सुकर झाला होता सारा प्रदेश दक्षिणेकडे मंद उताराने पसरला होता दोन झाडामधल्या जागेत खास सैबेरियन कडक गवताचे पुजके दिसू लागले झाडावर शेवाळांचे थर दाट होऊ लागले मध्यान्ह टळना टळताच जगल एकदम विरळ होऊ लागल आणि लेना नदीच पात्र साक्षात आमच्या पुढ्यात उभ राहिल ! अर्धा मैल रुंदीच पात्र सपूर्ण गोठून प्रचड लादी तयार झालेली होती आर्टिक महासागराला मिळायला या नदीला अजून किमान १५०० मैल तरी वाहायच होत तरी इतक्यावरसुद्धा जलमार्ग म्हणून वापरायला चागलच रुंद पात्र होत आम्ही आडोसा घेत एका ओळीत पण विखरून उभे राहिलो. न्याहाळत, कानोसा घेत बराच वेळ थांबलो. दिवस अगदी स्वच्छ होता आणि दूरवरचा आवाजदेखील ऐकू आला असता, पण सगळीकडे अगदी शांत दिसत होत

स्मिथ माझ्याजवळ आला आणि म्हणाला, 'आजची रात्र आपण याच तीरावर काढू आणि उद्या तांबड फुटताच नदी पार करू' मी संमती देताच आम्ही तळ ठोकला नेहमीप्रमाणे बर्फाची गुहा तयार केली अधार होताच आम्ही पहिली आगोटी पेटवली गुबका जातीच शेवाळ आणि आम्ही जाकिटात भरून आणलेल्या वाळक्या काड्या यांचा छान उपयोग झाला

वरच्या फाद्यांमध्ये हळुवार तरगत नाहीशा होणाऱ्या धुराच्या साक्षीन आम्ही समारभ साजरा केला इतक्या दिवसानतर प्रथमच गरम भोजनाचा आस्वाद घेतला भोजन म्हणजे काय, तर बर्फ वितळून आधी पाणी करायचं, त्यात थोडी बार्ली, थोडा मैदा, चवीला थोड मीठ असं घालून शिजवायच की, झाला 'काश्का' नावाचा पदार्थ आमच्याकडे शिजवायला मोठ भाड म्हणजे अर्धा लिटर पाणी मावेल एवढ एक अल्युमिनियमच डबड होत त्यात 'काश्का' उकळायचा, लाकडाचे तुकडे तासून कामचलाऊ चमचे केले होते ते वापरून आळीपाळीन काश्का थोडा-थोडा ओरपायचा पटकन सपावायचा की पुन्हा उकाळा सुरू. पालुकोला त्याचा पाव त्या गरम 'काश्का'त बुडवून मऊ करायची परवानगी दिली त्या सुदर गरम जेवणाबद्दल आम्हीच आमच कौतुक केल ती धुनी आम्ही पेटत ठेवली पहारा करणारान ती सतत पेटत ठेवायची होती

पहाटेच्या अधुक प्रकाशात आम्ही लेना नदी पार केली प्रचड नद्या

असलेल्या या देशातील ही एक अशीच मोठी नदी होती पलीकडच्या उच काठाशी रेलून आम्ही काही काळ मागे पहात उभे राहिलो गेल्या काही आठवड्यांतील प्रचंड मानसिक ताण आता खूप सैल झाला होता, लेना नदी-पर्यंत पोचूच शकणार नाही, अशी भीती मनात सदैव वावरत होती आणि आता आम्ही ती पार करून पैलतीरावर सुरक्षित, कसलाही अडथळा न येता उभे होतो मनाला नवी उभारी मिळाली होती पुढच्या प्रवासासाठी नवा विश्वास प्राप्त झाला होता

नदी पाहिल्यामुळे की काय, कुणी तरी माशाचा विषय काढला आणि माझे विचार धाव् लागले जुन्या आठवणी जाग्या होऊ लागल्या मी त्याना सांगायला लागलो की, पोलडमध्ये असताना आम्ही बर्फाला भोक पाडून मासे पकडत असू

झाल ! आम्हाला विषयच मिळाला 'हो बर्फाला भोक पाडायचं आणि मग काय करायच ? शिटी वाजवून माशांना बाहेर बोलवायचं !'

'नाही, नाही,' मी त्याना समजावून सागू लागलो, 'बर्फ फोडण्याच्या आवाजान खालचे मासे विचलित होतात आणि प्रत्यक्ष भोक पडत तेव्हा हवेच्या दाबात फरक पडल्यान पाणी उसळून बाहेर येत त्यबरोबर मासेही बाहेर फेकले जातात' हे ऐकल्यावर सगळेजण हॉ, हॉ करून हसायला लागले माझी टर उडवायला लागले पाठीवर थापा मारून मी किती थोर कथाकथक आहे अस सांगू लागले

मी हटायला तयार नव्हतो. म्हटल, 'प्रात्यक्षिकच करून दाखवतो' लगेच कोलोन एक दाडग लाकूड पैदा केल आम्ही काठापासून साधारण वीस एकवार दूर आत गेलो कोलोम आपल्या मजबूत पजान ते दांडक उचलल, झारोन आणि मी दिशा देण्यासाठी खालच्या बाजूला पकडल आणि दणके मारायला सुरुवात केली एकदाच भोक पडल पडल मात्र, आतून थडगार पाणी कारज्या-सारख उसळून वर आल आजूबाजूला आमच्या पायाभोवती पसरू लागल आणि आश्चर्य म्हणजे चवक चार मासेही त्याबरोबर बाहेर आले चांगले हेरिं-गच्या आकाराचे होते. आमच्या आनदाला पारावार राहिला नाही झडप घालून ते मासे काबीज केले आम्ही नाचू लागलो माझ्यावर शाबासक्याचा वर्षाव झाला झारोन, माझी थट्टा केल्याबद्दल क्षमायाचनाही केली त्याचवेळी स्मिथ आजूबाजूला पाहात म्हणाला, 'आपण आपल्या नशिबाची परीक्षा फार वेळ पाहू नये ! आडोसा घेत आपल्याला निघायलाच हव !' आम्ही लेना नदीच थडगार स्वच्छ पाणी पिऊन मार्गस्थ झालो.

पुन्हा दक्षिणेकडे तोड करून नदीचा उच काठ चढून पलीकडच्या जमिनी-वर चालायला आरभ केला आमच पुढच उद्दिष्ट होत, बैकल सरोवर

त्या रात्री नदीपार प्रदेशात एका टेकाडाच्या आश्रयाला मुक्काम टाकला काटक्यांवर मासे भाजले. थोडा थोडा 'काश्का' तयार करून ताज्या अन्नाची मेजावनी केली

एव्हाना आमचे रबरी बूट केव्हाच फेकून दिले होते आम्ही तयार केलेल्या मोजक्या चामड्याच्या वादया पायाला बांधून टाकल्या होत्या दिवसाला साधारण दहा तास चाल आणि तीस मैल या वेगान वाटचाल सुरू होती

□

आमचा मार्ग झाडाझुडपांतून काढावा लागत होता. असे काही दिवस गेले एका सकाळी निघालो तेव्हा धुक पसरल होत. आम्ही एकेकट्यानं चालण्याऐवजी एकत्रितपणे चालू लागलो होतो धुक्यातून वाट काढत होतो एवढ्यात कुणी तरी शू शू करीत सगळ्यांना शात व्हायला सांगितल आम्ही जागीच थबकलो आणि कान टवकारले

आमच्यापासून जवळच पुढे कसला तरी जमीन धोपटल्यासारखा आवाज येत होता पाठोपाठ काही तरी मोडल्याचा, काही तरी जोरान घसरत सरकल्यासारखा आवाज येत होता. हा आवाज छोट्या झुडूपाखालन येत असल्यासारखा वाटत होता आम्ही पुतळ्यासारखे जागीच खिळलो मी माझ्या सुऱ्याला हात घातला कोलोन कुऱ्हाड उचलली

तो धुसफूस, आवाज अचानक थांबला पूर्ण मिनिटभर आम्ही यावलो कान अधिकच टवकारले घणात अडकलेला, दमछाक झालेला श्वासोच्छ्वास ऐकू येऊ लागला आणखी एक मिनिट गेल आणि तो धडाड आवाज पुन्हा येऊ लागला कोलो माझ्याजवळ सरकला, 'काय असाव ते ?'

'कसल तरी जनावर असाव !' मी

'एक गोष्ट नक्की जे काही आहे ते आपल्याकडे सरकत नाहीये' भीमकाय म्हणाला, 'आपणच जवळ जाऊन पाहू या !'

आम्ही थोडे विखरून धुक्यातून वाट काढत पुढ सरकू लागलो थोड्याच अतरावर एक जनावर अत्यत अगतिकपणे पाय झाडताना दिसल त्याच मुडक झुडुपाआड असल्यामुळ नीट दिसत नव्हत पुढच अतर मी रांगतच गेलो बाकीचेही माझ्या मागोमाग आलेच ते एक पूर्ण वाढ झालेल हरिण होत मरणप्राय वेदनानी ते लाथा झाडत होत नाका-तोंडातून फेस फसफसत होता, त्याबरोबरच वेगान, धापाळून श्वासोच्छ्वास चालू होता आणि त्याबरोबर बाहेर पडणारी वाफ धुक्यात मिसळत होती. ते सापळ्यात अडकल होत पळता येत नव्हत खाली

पडलेल्या झाडाच्या फांद्यांत सापळा आला होता आणि त्यात त्या हरणाचा शिंग-सभार अडकला होता !

आजूबाजूला झालेली पडझड आणि त्या जनावराची शेवटची वाटेल अशी धडपड पाहून बऱ्याच वेळापासून ते हरीण अडकून पडलं असावं असं वाटलं. आम्ही कोलोकडं नजर टाकली. त्याची नजर रोखली होती त्या अगतिक जनावरावर.

तो आडव्या झालेल्या झाडाच्या खोडावर चढला. आपल्या कुऱ्हाडीनं त्यानं एकच घाव घातला आणि ते हरिण शेवटचा आचका देऊन गतप्राण झालं ! आम्ही सगळेच पुढं धावलो आणि हरणाचं मुंडकं झाडातून सोडवायचा प्रयत्न करू लागलो; पण ते मोकळं होईना. शेवटी कोलोनं पुन्हा एकदा आपली कुऱ्हाड चालवली आणि मुंडकं धडावेगळं केलं.

एकूण सगळा प्रकार इतका झपाट्यानं झाला होता की, बोलणं झालंच नाही. हरीण मेल्यावर मात्र सगळे एकमेकांकडे पाहू लागले. स्मिथकडे पाहून मॅको म्हणाला, 'आता ह्याचं काय करायचं ?'

'मला वाटतं, यावर चर्चा होणं आवश्यक आहे !'– स्मिथ. तो म्हणाला की, 'आपण हे एवढं सगळं बरोबर काही नेऊ शकणार नाही आणि इथं असंच टाकूनही चालणार नाही !'

मार्चिनकोनं सर्वांना मान्य होईल अशी गोष्ट सुचवली. 'आपण इथं चोवीस तास मुक्काम करू या. खच्चून पोटभर खाऊ या. म्हणजे उरलेलं आपल्याला बरोबर नेता येईल !'

झारो तर जिभल्या चाटत म्हणाला, 'आपण बुवा, हे ओझं हलकं करायला नक्कीच मदत करू !' सर्वांची संमती मिळताच सगळ्यांनी आनंदानं आरोळ्या ठोकल्या.

पालुको लाकूडफाटा गोळा करून होळी पेटवण्याची तयारी करू लागला. बाकीच्यांनी नेहमीप्रमाणे आडोसा तयार केला. खाटीकखानाही उरकला. तासा-भरातच भट्टीवर त्या हरणाचं लुसलुशीत मांस भाजलं जाऊ लागलं. नेहमीच्या बर्फ वितळून केलेल्या काश्कात आज काळजाचे आणि मटणाचे तुकडे रटरटत होते. ह्या सगळ्याच्या दरवळानं सगळ्यांच्या तोंडांना पाणी सुटू लागलं. कोणा-लाच धीर नव्हता. भाजून झालेल्या भागाचे लचके तोडून मी वाटू लागलो. थोडं अर्धकच्चं मांस चावायला किंचित् जड जात होतं; पण सुरेख लागत होतं. पालु-कोनं माझा सुरा वापरून त्याच्या वाटचाचे बारीकबारीक तुकडे केले आणि बोळक्या तोंडानं चघळायला सुरुवात केली. वाढणाची पहिली फेरी त्यालाच दिली. आम्ही नुसते हाणत होतो. भाजून विरघळलेल्या चरबीचे ओघळ आमच्या दाढ्या-वर येत होते. ढेकरावर ढेकरा देत होतो आणि ते आवाज ऐकून हसत होतो. नशिबानं मिळवून दिलेल्या आहाराबद्दल एकमेकांचं कौतुक करत होतो. त्यानंतर

धूम्रपान आणि दोन–चार तास गुहेत विश्रांती झाल्यावर मृगाजिन साफ करायचं काम हाती घेतल

कातड साफ करायला बराच वेळ लागला. लाकड्या-ढलप्यानी सगळी चरबी निपटून काढायची म्हणजे भलतच किचकट काम ! कातड साफ करून झाल मग त्याचे तुकडे करून १४ जोडे व मोजड्या बनवल्या त्यातली एकेक आधी-च्याच मोजडीवर चढवून पावलावर घट्ट बांधून टाकली आणि उरलेली प्रत्येकाच्या थैलीत गेली तरीही प्रत्येकाला त्या कातड्याचा एकेक सुटा तुकडा मिळालाच ! आमची चाभारकी संपल्यावर पुन्हा एकदा पुख्खा झोडला रात्रीसुद्धा बोट लावे-पर्यंत खाल्ल पोट फुटतील की काय, अशी अवस्था झाली तेव्हा थांबलो !

पहाटे उठल्यावरही नको नको म्हणत थोडस खाल्लच आणि उरलेल सात वाटयामध्ये विभागून प्रत्येकाच्या थैलीत कोंबल

बैकल सरोवराच्या दिशेन दक्षिणेकडे आमची वाटचाल सुरू झाली दिवस मे महिन्याच्या मध्याकडे झुकू लागले तेव्हाच सैबेरियातल्या वसत ऋतूची चाहूल लागली वारा मंदावू लागला होता झाडावर कुठकुठे कळ्याची बोंड दिसू लागली. वाटेतील ओढे अजूनही गोठलेलेच होते, पण वातावरण सुखाच होत.

आम्हाला सगळ्यात कुठली गोष्ट टाळायची होती ती म्हणजे इतर माण-साची भेट ! अजूनपर्यंत तरी ते जमल होत मधूनमधून वहिवाटलेले रस्ते लागत; पण पूर्ण निरीक्षण करून आसमतात कोणी नाही याची खात्री करूनच आम्ही ते पार करीत असू. क्वचित रात्रीच्या वेळी आम्हाला दूरवरच्या खेड्यातले मिण-मिणते दिवे दिसत कधीकधी दिवसा एखाद्या गावच्या इमारती क्षितिजरेषेवर दिसत. तिथल्या चिमण्यांतून बाहेर येणारा पाढरा धूर दिसे अशा वेळी आमची चाल अतिसावध होत असे

नतर मात्र आम्हाला जरा बऱ्यापैकी मळलेले रस्ते लागू लागले आतापर्यंत आडव्या आलेल्या वाटांपेक्षा जास्त रहदारी असावी असा अदाज करता येत होता. सरोवराच्या दिशेन येणाऱ्या वाऱ्याबरोबर कुठल्या तरी कारखान्याचा भोंगा ऐकू येऊ लागला

आम्ही एका उच्च ठिकाणावर पोचलो तिथून बैकल सरोवराची सुरुवात झाल्यासारखी दिसत होती दूरवर पश्चिमेकडे काही मैलावर कारखान्याच्या इमारती दिसत होत्या आम्ही उभे होतो तिथून खाली सरोवराजवळ वळणा-वळणान गेलेला एक रस्ता दिसत होता महत्त्वाचा महामार्ग असावा कारण त्याच्याच बाजून विजेच्या टेलिफोनच्या तारा वाहून नेणाऱ्या खांबाची रांग होती आपण सरोवराच्या नक्की कोणत्या टोकाशी आहोत याचा अदाज येत नव्हता. आम्ही आपापसात चर्चा केली आणि अशा निर्णयाला आलो की, आपण सरो-वराच्या ईशान्य टोकाशी आहोत. याचा अर्थ उत्तर किनाऱ्यावरून पश्चिमेकडे

बरच पुढ जाऊन मग डावीकडे दक्षिण सैबेरियात शिराव लागणार !

जवळजवळ तासभर तिथ बसून आम्ही सभोवारचं विहगम दृश्य नजरेत साठवून घेतल आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचा आनद सर्वांनाच आलेला दिसत होता आमच्या पुढ वेगळाच प्रश्न उभा राहिला होता शिधासामग्री सपत आलेली होती बार्लीचे थोडे फार दाणे, पावाचे कुरतडलेले तुकडे आणि दुर्गंधी सुटलेल्या मासाचे काही अवशेष, बस्स् !

थोडचा वेळात स्मिथ एकदम म्हणाला, ' चला, खाली रस्त्यावर जाऊन आजूबाजूला जरा पाहू या !'

आम्हाला रस्त्यावर पोचायला अपेक्षेपेक्षा जास्तच वेळ लागला तिथ एक वाऱ्या-पावसान जीर्ण झालेला फलक होता त्यावर जवळच्या गावाची दिशा आणि अतर दर्शविल होत त्या गावाच किंवा खेड्याच नाव होत चिचेवका ते दूरवर दिसणारे कारखाने बहुधा त्याच गावचे असावेत, आम्ही धूम ठोकून रस्ता पार केला आणि पलीकडच्या झाडोऱ्यात शिरलो आमच्यापासून तळ्यापर्यंत साधारण मैलभर गर्द झाडीन भरलेला सपाट भूभाग होता. ओक, ॲश, ज्युनिपरचीही बेसुमार वाढ झालेली दिसत होती आम्ही झुडपाची राग बाजूला दाबून पाण्या-जवळ आलो तो एका छोटचा नदीचा भाग होता साधारण १५० यार्ड लाबीचं पात्र होत गोठलेल्या पात्राचा साधारण मध्यावरचा भाग विरघळून थोडचा मळ-कट पाण्याचा ओहोळ वाहू लागला होता इथे आमच्या लक्षात अस आल की. सर्वांनाच पोहायला येत होत आम्हाला यानतर बऱ्याच लहान–मोठचा नद्या ओलाडायला लागणार होत्या तेव्हा इथे सधी आहे तर सर्वांची परीक्षाही होईल, सुरुवात कोणी करायची ? शेवटी मीच पुढ झालो.

आम्ही आमच्या अगावरची लोढणी उतरली चामडचाच्या वाद्या सुटचा केल्या. त्या एकमेकांना बाधून सुरक्षा–दोरी तयार केली एक टोक मी स्वत·ला बाधून घेतल आणि त्या निसटत्या बर्फावरून तोल साभाळत चालू लागलो ओहोळाच्या काठाशी बर्फावरच थाबलो तेवढचात पायाखाली भगदाड पडलं आणि मी गारठलेल्या पाण्यात पडलो एकदम श्वासच अडकल्यासारखा झाला ! पाण्याखालून उसळी मारून बाहेर आलो पोहत पलीकडच्या काठाला गेलो. वर चढू लागलो तर काठच फुटायला लागला शेवटी एकदाचा कसाबसा चढलो आणि बाकीच्यांना खूण केली. सपूर्ण ओलाचिब, गारठलेला अशा अवस्थेत मी त्यांची वाट पाहात थाबलो

बाकीच्याना येण फारस अवघड नव्हत; पण फार सुखाचही नव्हत. सगळेजण सुरक्षा-दोरीचा आधार घेत घेत आले. स्मिथ सगळचात शेवटी आला त्याला ओढूनच वर घ्याव लागल कारण दोराच शेवटच टोक त्याला बाधल

होत यानंतर पुढं जेव्हा जेव्हा या गोठलेल्या नद्या पार करण्याचा प्रसंग आला तेव्हा मी कुऱ्हाड घेऊन जाऊ लागलो काठावर चढायच्या आधी कुऱ्हाडीन बर्फ फुटेनासं होईपर्यंत फोडायचं मगच वर चढायचं ते सोपं जाऊ लागलं

आम्ही झपाट्यानं जंगलाच्या आडोशाला पळालो अंगावरची तीन तीन कापडं काढली जमतील तेवढी घट्ट पिळली आणि वाळण्यासाठी पुन्हा अंगावरच चढवली सरोवराच्या दिशेनं जायला सुरुवात केली हात पाय गारठलेले होते त्यांचं चलनवलन नीट व्हावं, अंगात ऊब यावी म्हणून पळायला सुरुवात केली

त्या दिवशी दुपारी आमची कुजबुज-सभा झाली पुढच्या वाटचालीबद्दल योजना आखली गेली सामान्यज्ञानाच्या आधारे असं ठरलं की, सरोवराच्या फार जवळून जाणं म्हणजे छोट्या मासेमारी गावातल्या लोकांचं लक्ष आकर्षून घेणं जसं जसं दक्षिणेकडे जाऊ तशी गावाची गर्दीही वाढत जाणार ! कारण सरोवराच्या दक्षिणेकडून ट्रान्ससैबेरियन रेल्वेचा मार्ग होता त्याच्या आणि सरोवराच्या आसपास शहरं अधिक असणार ! तेव्हा सरोवरापासून फार दूर नाही तरी समांतर असं दक्षिणेकडे जायचं सर्व वस्त्या टाळून, पुन्हा ईशान्येकडे जाऊन लांबून वळसा घालून पश्चिमेकडून खाली उतरायचं ठरलं मधाचा रस्ता आणखी वर पार करायचं ठरलं त्या दिशेनं झपाट्यानं कूच केलं कपडे अजूनही दमटच होते. ते लवकर वाळण्यासाठी पुन्हा पळायला सुरुवात केली सुमारे ५ मैलानंतर पुन्हा नदीचा काठ सुचविणारी झाडांची रांग दिसली

माझ्या उजव्या बाजूला असलेल्या झारोनं अचानक हात वर करून सर्वांना थांबण्याचा इशारा केला मी तोच इशारा करून सगळी माणसं थांबवली झारोनं पुढं झाडीच्या दिशेनं हात केला. तिकडे काही तरी वावरत होतं कदाचित् जनावर असेल किंवा माणूस असेल दोनअडीचशे यार्डांवर मावळत्या अंधुक प्रकाशात नक्की काय आहे ते समजणं कठीण होतं, पण आम्हाला शोध घेणं भाग होतं. मी झारोला विचारलं, 'तुला काय वाटतं ?' तो म्हणाला, 'कुणी तरी माणूस असावा काहीही असलं तरी त्याची हालचाल अशी भासतेय् की, त्यानं आपल्याला पाहिलंय् आणि लपायचा प्रयत्न करतोय् !'

सगळे आमच्याभोवती जमले. मॅको म्हणाला, माणूस असेल तर त्याचं टाळकं सडकून नदीत फेकून द्यायला हवं आपलं अस्तित्व उघड होण्याचा धोका आपल्याला पत्करता येणार नाही

आम्ही विखुरलो स्मिथ, झारो माझ्या डावीकडून पुढे आले उरलेले माझ्या उजव्या हातानं. आम्ही शक्यतो खाली वाकून झुडपांचा शोध घेत पुढं सरकू लागलो नदीपासून फक्त ५० यार्डांवर आल्यावर नदीचं पाणीसुद्धा दिसायला लागलं मी थांबलो आणि कानोसा घेऊ लागलो बाकीचेही थबकून

अदाज घेऊ लागले अचानक झाडामागे स्तब्ध उभी असलेली एक आकृती बाजूला झाली आणि जीव घेऊन झुडपाकडे पळू लागली पळताना त्याची विजार आणि उंच बूट तेवढे दिसले त्यामुळ ती मानवी आकृती होती हे नक्की झालं मी आडोसा सोडून पाठलागावर पळालो बाकीचे लगेच पाठोपाठ आलेच

झुडपातून डोकावणारे बूट रबरी तळव्याचे होते गुडघ्याएवढे उंच। त्यावर फर होती त्यांच्या मालकाला बाहेर ओढून काढण्यासाठी मी त्यावर झडप घातली आणि बाहेर खेचले दुसऱ्याच क्षणाला ते बूट नुसतेच माझ्या हातात आले मी डोळे विस्फारून पाहायलाच लागलो। कोलोचा उष्ण श्वास माझ्या खांद्याला जाणवत होता आम्हाला कापड गुंडाळलेली नाजूक पावलांची एक जोडी दिसली आणि त्या झुडपातून दर्दभऱ्या कण्हण्याचा आवाज येत होता आम्ही एकमेकाकडे पाहिल आमचाही ऊर धावण्यान धपापतच होता. कोणी तरी पुटपुटल, 'अरे, ही तर कुणी तरी बाई दिसतेय!'

कोलो खाली वाकला झुडुपाचा पसारा खांद्यान बाजला सारून तिला अलगद उचलून त्यान बाहेर काढल आम्ही घोळका केला ती एक नाजूक नार–मुलगी होती गोल डोळ्यातून अपरपार भीती ओसडत होती अश्रूंचा पूर वाहात होता त्यातच काही क्षणापूर्वी आम्ही नरभक्षकाचा अवतार धारण केला होता आमच अस्तित्व उघड होऊ द्यायच नव्हत, पण तिला पाहताच सगळा नूरच पालटला। खोडी काढताना हातून काही तरी घोडचूक व्हावी आणि आता ती कशी सुधारायची अशी अवस्था झालेल्या वाह्यात् पोरांच्या टोळक्या-सारखे आम्ही दिसू लागलो तिन रडक्या चेहऱ्यान माझ्याकड पाहयल आणि पुन्हा मान खाली घालून मुसमुसू लागली

मी रशियनमध्ये म्हणालो, आम्हाला घाबरण्याच काही कारण नाही।'

तिन पुन्हा माझ्याकडे पाहिल नतर सहाजणाचे शांत, दाढीन भरलेले चेहरे न्याहाळले आणि पुन्हा रडायला लागली तिला दोष देण्यात अर्थ नव्हता कारण आम्ही खरच नरराक्षसासारखे दिसत होतो

'कृपा करून रडू नकोस मुली!'–पालुको

ती अजूनही भेदरलेलीच होती हुंदका दाबण्याचा आटोकाट प्रयत्न करत होती मी तिच सात्वन करू लागलो घाबरू नकोस आम्ही तुला काहीही करणार नाही आम्हालाही बहिणी, प्रेयसी सर्व काही आहे।'

तिनं जे काही अंगावर घातल होत ते अत्यंत ढगळ होत वजनदार हिवाळी जाकिटान तिचे खांदे भारावले होते तिची बारीक पावल जाडजूड लांब-रुंद विजारीतून डोकावत होती जाकिटाच्या आत जीर्ण झालेला जांभळ्या रंगाचा मखमली पोशाख दिसत होता त्याचा स्कर्टचा भाग विजारीत खोचलेला कळत

होता. हिरव्या लोकरी स्वेटरचे दोन लाब हात वापरून तयार केलेला मफलर तिन गळ्याभोवती गुडाळला होता पाण्यान भरलेले तिचे डोळे सुदर निळेभोर होते आक्रोडी रगाच्या केसावर वाळवीन खाल्लेल एक टोपर चढवल होत दाडग्या माणसाचे कपडे घालून फॅन्सी ड्रेस स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या एखाद्या शाळकरी मुलासारखी दिसत होती ती

तिन आपला चेहरा जाकिटाच्या बाहीन पुसला तिच्या हातात येशूचा क्रूस धरला होता तिन एकदा आपल्या पायाकडे पाहिल, मग माझ्या चेहऱ्या कडे ती जवळपास अनवाणी बर्फात उभी होती तिचे बूट अजूनही माझ्या हातात होते मी खाली वाकलो आणि हळुवारपणे तिच्या पावलांवर ते चढवले

तिने तोंड उघडल आणि रशियन, पोलिश अशा मिश्र भाषेत ती बोलू लागली 'मी जिथ काम करते त्या कोलकोझ गावाची वाट चुकलेय. मी पोलीश आहे आणि कोलकोझला काम करण्यासाठी जबरदस्तीन माझी पाठवणी केलीय्' बोलताना ती अत्यत भयभीत दिसत होती

पालुको आणि मॅको दोघेही पुढ सरसावले आम्ही तिघही एकाच वेळी बोलू लागलो आमच्या कोलाहलातून तिला एवढच समजल की, आम्हीसुद्धा पोलिश आहोत आणि पळून जाणारे कैदी आहोत. तिला आमच्यापासून घाबरण्याच काहीएक कारण नाही तिन सुटकेचा दीर्घ नि श्वास टाकला आणि ती मला बिलगली. तिच्या डोळ्यातून पुन्हा अश्रू वाहू लागले, पण ते नक्कीच आनदाचे होते ती पुन्हा पुन्हा देवाचे आभार मानू लागली इतर दोघे पोल तिच्या डोक्यावर, खांद्यावर थोपटून तिला धीर देऊ लागले

स्मिथ जरा दूर राहून अतिशय सावधपणे नीट लक्ष ठेवून या सगळ्या प्रकाराकडे पाहात होता तो एकदम म्हणाला—'अरे, आटपा लवकर! आपण कुठे आहोत याच भान आहे का? कृपा करा आणि कुठ तरी आडोशाला चला!'

आम्ही घोळका मोडला आणि आसऱ्यासाठी जागा शोधू लागलो.

## ख्रिस्तिना आमच्यात सामील झाली !

तिच नाव होत ख्रिस्तिना ख्रिस्तिना पोलान्स्का. फक्त १७ वर्षांची होती; तिन दोन दिवसांत काहीही खाल्लेल नव्हत. अतोनात भूक लागली होती. आमच्या थैल्या धुडाळून काही तुकड तिच्या समोर धरले. तिन ते अधाशासारखे एकाग्र चित्तान खाल्ले खाताना बाहीन सारख नाक पुसत होती तिन आमच कुतूहल चागलच जागृत केल तिच्यावरून आमची नजर ढळत

नव्हती एकटा स्मिथ आमच्यापासून थोडा दूर बसून, तिला अत्यंत अलिप्त-पणे न्याहाळत होता

'मी काही वाटबीट चुकलेली नाही मी कोलकोझहून पळाले आहे' तिन आत खर सागायला सुरुवात केली. 'मी गेले काही दिवस सारखी पळते आहे तुम्ही मला पहिलेच भेटलेले सद्‌गृहस्थ आहात.' तिन 'सद्‌गृहस्थ' या शब्दावर विशेष जोर दिला

'तुझ घर कुठाय खिरस्तिना ?' मी विचारल

'माझ्या वडिलाच ल्युक इथ शेत होत पोलिश युक्रेन भागात आहे ते गाव १९३९ साली मी पाहिल ते शेवटचच आता मला घरच नाही !' ती माहिती देत होती

आमच संभाषण चालू असतानाच स्मिथन पुढचा बेत काय, असा हळूच विषय काढला अधार वाढत असल्याच त्यान लक्षात आणून दिल, तसच आपण उत्तरेला नदीकिनाऱ्यान आणखी थोड वर जाव आणि दुसऱ्या दिवशी सकाळी नदी सहज पार करता येईल अशा ठिकाणी मुक्काम करावा असही सुचवल तो पुढ म्हणाला, 'आज रात्री पुन्हा एकदा नदीतून पार होण म्हणजे मूर्खपणाच होईल निदान आजची रात्र तरी कोरड्यान झोपता येईल'

कुणीही वाद घातला नाही आम्ही चार-पाच मैल झाडीतूनच पण नदीकिनाऱ्यान उत्तरेकडे चालत राहिलो खिरस्तिना स्मिथकड मधूनमधून पाहात होती पण त्याच्याशी चकार शब्दही बोलली नाही तिला अस वाटत असाव की, या गटात आपल्याला विरोध केलाच तर तो हाच करील आम्ही सगळे पोल तिच्याशी बातचीत करत होतो पण स्मिथ काहीच बोलला नव्हता

आडोशासाठी थावलो तेव्हा चांगलाच अधार पडला होता एका प्रचड कोसळलेल्या झाडापाशी आम्ही आडोसा तयार केला तिच्यासाठी आमच्या थैल्या रिकाम्या करून अथरल्या, ती आमच्यावर पूर्ण विसबून एखाद्या लहान मुलासारखी गाढ झोपी गेली आम्हाला मात्र स्वस्थ झोप लागण शक्य नव्हत आलटूनपालटून पहारा चालूच होता पहाटेची चाहूल लागली तरी ती आपली पाय मुडपून छान झोपेतच होती स्मिथन मला हळूच बाजूला बोलावून घेतल

त्यान मुद्द्यालाच हात घातला 'आपण या मुलीच काय करणार आहोत रावीझ ?'

हा प्रश्न उभा राहणार याची मला कल्पना होती, पण काय बोलाव कळत नव्हत मला वाटल, तिला तिचे बेत विचारले तर आपल्याला त्याचा कदाचित उपयोग होईल, मी प्रश्नाच उत्तर टाळत होतो आणि त्याची मला पूर्ण जाण होती हळूहळू मंको, पालुको वगैरे सगळेच एकापाठोपाठ आम्हाला सामील झाले

वाटेतल्या खेड्यामध्ये काही कनवाळू लोकानी जमेल तेवढ्या प्रमाणात तिला अन्न, वस्त्र, निवारा दिला तिला एका विचारान पूर्ण पछाडल होत की, काय वाटेल ते झाल तरी रशियनाच्या पुढ चार पावल आपण राह्यच, पळायच पण त्यांच्या हाती लागायच नाही! दुर्दैवाची गोष्ट अशी की, ती सरहद्द ओलाडायच्या बेतात असतानाच पकडली गेली आणि आपण सरहद्दीच्या इतक्या जवळ होतो याची तिला बिचारीला कल्पनाही नव्हती। लाल सैन्यान तथाकथित नागरी न्यायालयाकडे तिचा खटला दाखल केला आणि त्यानी तिनक्याच तत्परतेन तिला दोषी ठरवून कोलकोझ कामगार म्हणून पश्चिम सैबेरियातील थेमसी नदीच्या खोऱ्यात पाठवून दिल

तिन सोविएत शेतावरच्या आयुष्याच फार मार्मिक वर्णन केल तिथ काम करणाऱ्या सर्व बायका या रशियन, अत्यत आडमाप दाडग्या होत्या ख्रिस्तिना ही एकच पोलिश मुलगी होती शेतावर दाखल झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासून मका झोडपण्याच आणि पोत्यात भरण्याच काम तिला मिळाल इतर बायका तिच्या नाजूकपणाची टिंगल उडवायच्या जी काम ताकदीच्या जोरावर त्या सहज करत असत, ती न जमल्यामुळ ख्रिस्तिनाची हसून टर उडवायच्या रात्री झोपताना तिला रडू कोसळायच इतर कामगारासारखच तिला भिकार अन्न मिळत असे एक किलो पाव हेच मुख्य अन्न बस्स!

परतु तिला तिथून पळून जाण्याची गरज भासली ती त्या बायकामुळ नव्हे त्या छावणीचा प्रमुख एक लपट पुरुष होता इतर रशियन बायका त्याच लक्ष आपल्याकडे वेधून घ्यायला टपलेल्या असायच्या ख्रिस्तिनाला त्याची भीती वाटायची आणि त्याच्यापासून शक्यतो दूर र्‍हाण्याचा ती प्रयत्न करायची चांगला दाडगा आणि रापल्या चेहऱ्याचा होता तो। तिला नेहमी हुडकून काढायचा आणि बळजबरीचा प्रयत्न करायचा 'तू इतर रशियन साळकायापेक्षा किती वेगळी आहेस। तुझी देखभाल मी छान करीन' वगैरे काहीबाही बडबडायचा

एक दिवस कहरच झाला इतर बायकांबरोबर कामासाठी न जाता 'खास चौकशीसाठी' घरी बोलावल आहे असा निरोप तिला मिळाला त्याचा हेतू तिला बरोबर कळला होता त्यान तिच्याशी 'सहकार्य' केल तर तिला अवघड काम दिल जाणार नाही, असही आश्वासन त्यान दिल होत

तिन इतराबरोबर जाऊ देण्यासाठी त्याची आर्जव केली, पण यावर प्रत्युत्तर म्हणून त्यान तिच्यावर सरळ सरळ बलात्काराचा प्रयत्न केला ख्रिस्तिनान कोंडलेल्या वाघिणीसारखा गुरगुराट केला नखान त्याचा चेहरा ओरबाडला, आपल्या जाड बुटांनी प्रचड लाथाळी केली तिचा हा अवतार पाहून त्याची पकड जराशी म्हणजे तिला निसटता येईल एवढी ढिली झाली ती उसळी

मारून धाडकन बाहेर पडली आणि तिन बायकांच्या बराकीकडे धूम ठोकली. त्यानं चडफडत अर्वाच्य शिव्या हासडल्या आणि बदला घेण्याच्या वल्गना करू लागला.

ती उग्ह कलू लागेपर्यंत धावली मनात सारखी धास्ती होतीच तो केव्हाही येईल अशी, पण तिचं नशीब थोर ! तो फिरकला नाही इतर बायका कोणत्याही क्षणी परत येतील तसं तिला वाटू लागल तेव्हा तिन पळ काढला कोल्कोझच्या इमारतीचा आडोसा घेऊन ती पळत राहिली. त्या रात्री ती नदी-काठी एका वेळूच्या जगलात झोपली दुसऱ्या दिवशी नदीकाठान बरेच मैल दूर चालत राहिली शेवटी एक रस्ता लागला तिथून तिला पूर्वेकडे जाणाऱ्या दोन वाहनानी मदत केली.

'सगळेच रशियन काही वाईट नसतात बर का ! आता हेच दोघे पहा. माझी कथा ऐकून हृदय द्रवल बिचाऱ्याच आणि त्यानी मला मदत केली. दुसऱ्यान तर ईरकुत्सला कस जायच याचा मार्गही दाखवला '

सगळी कहाणी सांगून सपल्यावर सगळ्याच्यावर तिची नजर फिरत शेवटी स्मिथवर स्थिरावली आणि म्हणाली, 'अशा रीतीनं मी इथवर येऊन पोचले !'

त्या अमेरिकनानं आपले हात फुर्फकाच्या खिशात घातले आणि निर्वि-कारपणे म्हणाला, 'आम्ही पूर्वेकडे ईरकुत्सला जाणार नाहीयोत सरोवराला वळसा घालून दक्षिणेकडे जाणार आहोत. तुझा इथून कुणीकडे जायचा विचार आहे ?'

ती धास्तावलीच ! म्हणजे आपल्याबरोबर न्यायचा विचार नाही की काय याचा ? तिन आम्हा सहा जणाकडे अत्यत आर्जवी नजरेन पाहिल आम्ही माना दुसरीकडे वळवल्या वास्तविक आम्हाला काय हवय याची आम्हाला चांगली कल्पना होती, पण त्याचा निर्णय स्मिथवरच सोपवण आम्ही पसत केल तिचे ओठ थरथरू लागले अत्यत केविलवाणा चेहरा करून स्मिथकड पाहून ती म्हणाली 'मी—मी तुमच्याबरोबर येणार आहे. मला एकटीला अस टाकून जाऊ नका ! '

स्मिथन तिच्या डोक्यावरून मागे नदीच्या पात्राकडे पहात बरेच क्षण विचार केला आणि म्हणाला, 'तुला पोहायला येतं का ?'

तिला एकदम आधार गवसल्यासारख झाल थोडयाशा अभिमानानच ती म्हणाली, 'हो, हो येत तर! शाळेत मी पोहोण्याच्या स्पर्धांमध्ये भाग घेत असे !

स्मिथच्या भुऱ्या भरघोस दाढीमधून त्याचे ओठ हास्यविलग झालेले पाहिले आणि आम्ही समाधानाचा सुस्कारा टाकला. तो म्हणाला, 'मुली माफ कर मला माझे प्रश्न तुला फार कोरडे वाटले असतील, पण मला वाटल होतं

तू तुझी काही तरी योजना ठरवली असशील आमच्याबरोबर तुला नेण्यात आम्ही तुला फक्त कठोर परिश्रमच देऊ शकतो आमच्याजवळचा अन्नाचा साठा आता तळाला गेला आहे आणि पल्ला तर फार लांबचा गाठायचा आहे! तुला हीही गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, समजा आपण पकडली गेलोच, तर तू एकटी सापडल्यामुळे जेवढा त्रास तुला होईल त्यापेक्षा किती तरी जास्त हालांना तोंड द्याव लागेल। याउपर जर तुला आमच्यात सामील व्हायच असेल तर आम्ही तुला बरोबर न्यायला तयार आहोत!'

'मी तुमची अत्यंत आभारी आहे मला फक्त तुमच्याबरोबर रहायच आहे।' ती अत्यंत भारावून म्हणाली

ती झुडपाआड गेली आणि आम्ही अन्नसाठ्याची तपासणी केली सातही थैल्या उघडल्या कातडयाचे तुकडे बाजूला केले आणि आमच्या अंदाजाप्रमाणेच शिध्रासामुग्रीने तळ गाठला होता एखादा किलो बार्ली, थोडासा मैदा, चिमूट-भर मीठ आणि २.४ किलो काळवंडलेल हरणाच मांस बस एवढच शिल्लक होत। दिवसाकाठी एकदाच आणि तेसुद्धा अत्यल्प जेवण करायचा ठराव पास केला. गत्यंतरच नव्हत. पुन्हा पुरवठा होईपर्यंत अगदीच नाही म्हणायला गुवका शेवाळ्याचा साठा मात्र भरपूर होता निदान शेकोटी तरी पेटवता येणार होती

शक्यता अशी होती की, प्रत्येकाने एक एक पावाचा सुकून दगड झालेला एकेक तुकडा आपल्या जाकिटाच्या कोपऱ्यात दडवून ठेवला असावा, निदान माझ्याकडे तरी होता आणि गमत म्हणजे कालांतराने सर्वांकडे तसाच असल्याच उघडकीला आल आता त्यामध्ये अप्रामाणिक किंवा समाजद्रोही अस काहीच नव्हत कारण तुरुंगातील वास्तव्यामध्ये पाव लपवून ठेवण ही अत्यंत स्वाभाविक आणि नैसर्गिक गोष्ट होती सर्वसामान्य सुसंस्कृत जीवनात अनेक माणस आपल्या खिशात एखाद नाण कायम बाळगतात ते जवळ असल की, आपण कधीही निर्धन, खक होणार नाही असा त्यांना विश्वास वाटत असतो तमाच विश्वास कैद्यांना त्या लपवलेल्या पावाच्या तुकड्यामुळे मिळत असतो तो पावाचा तुकडा म्हणजे त्यांना जगण्यासाठी आधार वाटतो त्या निराधार पोलीश मुलीबद्दल आमच्या मनात अत्यंत ममत्व वाढीला लागल होत त्याच प्रतीक म्हणून तिची भूक भागविण्याकरता प्रत्येकाचा लपवलेल्या पावाचा तुकडा बाहेर येऊ लागला

आम्ही घाईघाईने छोटासा नास्ता उरकला आणि तडक नदीपार व्हायच ठरवल पहाटेच्या कोवळ्या उन्हात एका सुंदर वसंतऋतूतल्या सकाळच दर्शन घडवल आम्हा सर्वांचीच इच्छा होती की, शक्य तितक्या लवकर दक्षिणेकडे जाणारी सरळ वाट पकडावी

त्या मुलीला नदीतून पार होण हे नवीनच दिव्य होत आम्ही तिला

तिचे गरम कपडे, जाकीट, विजार, बूट कोरडे रहावेत म्हणून कढण्याचा आग्रह केला तिला तिच्या साध्या जांभळ्या पोशाखात पाहून मला तिची दया आली; पण दुसरा काही इलाजच नव्हता मागच्या वेळेसारखाच मी दोर कमरेला बाधून बर्फावरून चालत काठाशी पोचलो कुऱ्हाड पाठीशी होतीच पाण्यातून झपाझप हात मारत पलीकडे पोचलो कोलो तिचे कपडे डोक्यावर धरून, थोडासा धडपडतच, पण आला पालुको, मॅको तिला आणखी एका दोरीन बाधून घेऊन आले, उरलेले तिघेही पाठोपाठ आलेच त्यांपैकी एकान तिचे बूट आणले पलीकडे पोचताच आम्ही पळत आडोशाला गेलो धावता धावता दोरही गुडाळून घेतला

ख्रिस्तिना काकडून निळीकाळी पडली. दातांची थडथड थाबता थांबेना. कोलोन तिला तिचे गरम कपडे घालायला दिले

स्मिथन तिला जवळपास हाकललच 'अशी इथ कुडकुडत उभी नको राहूस जा, पटकन् तिकडे झाडामागे जा, हे कपडे काढून टाक आणि दुसरे घाल ! जा, पळ लवकर !'

आम्हीही कपडे काढले अग गरम करण्यासाठी नाचलो नाचता नाचता कपडे पिळत होतो अर्थात एवढ्यानं थडी जाणार नव्हतीच, पण तेवढ तर तेवढ आम्ही आमचे ओले कपडे पुन्हा चढवले थोड्याच वेळात ती सुके कपडे अगावर आणि ओल्या कपड्याच बोचक काखेत अशी धावतच आली.

'पाहिलत् ना, तुम्ही! मला पोहायला येत की नाही ?'

स्मिथ हसला 'हो तर, पाहिल ना ! मडळी, या मुलीचा आपल्याला फारसा त्रास होणार नाही अस दिसतय !'

तो सबध दिवस आम्ही चालत होतो. उगाच कुठ थोडा श्वास घ्यायला थांबलो तेवढच ख्रिस्तिना विनातक्रार आमच्या चालीनं चालत होती मेच्या मध्याचा सुमार होता दिवसाची बेताची उष्णता आमचे कपडे वाळवायला मदत करीत होती ईशान्येकड साधारण तीस एक मैल अतर काटल्यावर आम्ही रात्रीच्या मुक्कामासाठी थाबलो बैकल सरोवरापासून दूर पुन्हा झाडांच्या गर्द राईत पोचल्यामुळ जरा बर वाटल

तीन दिवसानतर मला अस वाटल की, आता दक्षिणेकडे वळायला हरकत नाही सरोवर साधारण ५० मैल आमच्या उजव्या हाताला असाव अदाजच होता, पण फारसा चूक नसावा अर्थात काटोकट समातर ठेवून मार्ग आखण अशक्यच होत प्रदेश चागला डोगराळ आणि दाट जगलाचा होता. कधी झकास उभ्या चढणी तर कधी घसर उताराच्या दऱ्या, वाटेत लहानमोठे ओढे–नाले होतेच ह्या दऱ्याची घडण अचूकपणे दक्षिण–पश्चिम अशी होती नद्यामधला सगळा बर्फ अजून वितळला नव्हता. नुकत्याच वाहू लागलेल्या

ओढ्यांना खूप जोर असे अशा वेळी भीम कोलो सर्वांत पुढ जायचा हातात एक दांडका घेऊन गोठलेल पाणी ठोकत ठोकत अंदाज घेत पुढ जायचा

मला कौतुक वाटत होत ते त्या मुलीच ! आमच्या सगळ्याच्या मनात तिच्या नाजूकपणाबद्दल चुकीच्या कल्पना अजूनही होत्या आणि याची तिला जाणीव होती, पण गमत म्हणजे इतक्या दिवसात तिच्यासाठी म्हणून एक वेळही थांबाव लागल नाही कधी कधी पावल सोलवटून थकून आम्ही थांबायचो, तेव्हा तर तिचा उत्साह अधिकच वाढायचा आम्हा सहाजणावर भाऊ असल्यासारखे उपचार करायची आणि स्मिथ– त्या दोघात मात्र बाप–लेकीसारखे संबंध निर्माण झाले होते विसाव्यासाठी थांबलो की त्याला अमेरिकेविषयी सांगायला लावायची तो तिला हे सगळ दिव्य सफल की अमेरिकेला बरोबर नेण्याच आश्वासन द्यायचा तिच्या अजागळ बुटाकडे पाहून तिची थट्टा करायचा आणि लगेच 'अमेरिकेला आलीस की तुला सुरेख कपडे, बूट घेऊन देईन !' अस वचन द्यायचा तीही मग उत्साहान, विश्वासान हसायची

तिचा आम्हाला एवढा लळा लागला की, तिच्यासाठी जीव देण्याची वेळ आली तर एकानही क्षणभरसुद्धा वाट पाहिली नसती सकाळी ती उठायची आणि आजूबाजूला लोळत असलेल्या सात दाढीदीक्षिताना पाहून म्हणायची, 'तुम्हाला पाहिल की फार बर वाटत खूप सुरक्षित वाटत !' प्रवासात ती झारोला सारख्या गमती करायला लावायची क्वचित केव्हा झारोसुद्धा उदास व्हायचा ख्रिस्तिना लगेच पुढ होऊन त्याच्या खळखळत्या विनोदाला प्रवाही करायची त्या दोघाची थट्टामस्करी पाहिली की, आपण काही धोकादायक, चमत्कारिक मुशाफिरीवर आहोत याचाच विसर पडायचा ! धकाधकीचा खरा प्रवास तर अजून पुढच होता आमच्यात गप्प गप्प असायचा तो मॅको! त्याला काही विचारल्याशिवाय तो कधी बोलायचाच नाही फक्त ख्रिस्तिनालाच त्याला बोलत, मनमोकळ करायच जमल होत ती त्याच्याबरोबर मैलचे मैल चालायची त्याच्याशी हळू आवाजात गभीरपणे बोलत राहायची आणि यातच केव्हा तरी मॅको मोठ्यान हसायला लागायचा

तिन नर्सचही काम आवडीन पत्करल होत कोलोची पायाची बोट चिखल्यामुळ सुजली तर लगेच आपल्या पेटीकोटाच्या पट्ट्या फाडून त्याची मरम्मत केली माझ्याही पायाची जखम कधी उलली तर ती तयारच असायची जेव्हा गुडाळलेल्या पट्ट्यांच काम व्हायच तेव्हा ती त्या धुऊन वाळवून पुढच्या उपयोगासाठी नीट जपून ठेवायची !

सरोवराच्या अर्ध्यावर बारगुस्तीन नदीच्या जवळ आम्ही पोचलो असू आणि ख्रिस्तिना स्वत च लगडायला लागली 'माझे बूट जरासे लागतायत !' ती.

मी ते काढले तर तिचे तळवे फुटलेल्या फोडांनी अधू झालेले दिसले तिला त्या अवजड बुटानी बराच वेळ त्रास दिलेला असला पाहिजे आम्ही तिला खूप समजावल. शेवटी थोडस दटावलसुद्धा; तरी तिचा आपला हट्ट चालूच होता 'मला काहीही झालेल नाहीय, मी छान आहे' वगैरे मी तिच्या पायाला बँडेज बाधल आणि तिचे बूट फेकून द्यायला भाग पाडल. तिच्यासाठी नवीन मोजडी तयार केली. माझ्याजवळ असलेलं सगळ कौशल्य पणाला लावून एक जोडी तयार केली सगळेजण माझ्या कारागिरीकडे टक लावून पहात होते. मोजडीला डबल तळवे जोडलेले आणि मऊपणासाठी मृगाजिनाचा तुकडा जोडून दिला सगळयांनी माझ अभिनदन केल ! ख्रिस्तिनान आभार-प्रदर्शनार्थ माझ्या कपाळावर आपले ओठ टेकले !

ही पोरगी सुलक्षणी असल्याची आम्हाला खात्री पटली आम्हाला आमचा वेग कुठही फारसा कमी करावा लागला नव्हता दक्षिणाभिमुख झाल्यानतर पाच दिवसानी आम्ही वार्गुसिन नदीच्या तीरावर रात्रीच्या वेळी पोचलो !

□

वार्गुसिन ओलाडली तेव्हा मे सपत आला होता आमच्या मार्गाला त्रासदायक असा हा शेवटचाच जलप्रवाह ठरला पलिकडच्या तीरावर सैबेरियन उन्हाळा आमची वाट पहात होता. सूर्य लख्ख तळपत होता सगळीकडे हिरवगार, फुलानी बहरलेल होत पक्षीसुद्धा आपली दूरस्थळाची सुट्टी सपवून परत आले होते सहा आठवडयात आम्ही मध्य सैबेरियातील जीवघेणा हिवाळा सपवून दक्षिण सैबेरियातील उबदार उन्हाळयात प्रवेश केला होता चेरी, जरदाळू, गावठी ऑर्चिड्‌ या रगीबेरगी फळा-फुलानी सगळा आसमत भरलेला दिसू लागला शेकोटीशिवाय उघडयावर झोपण कमी क्लेशदायक होऊ लागल दिवसा अगावरचे जाडेभरडे लोकरकपडे काढून हातात घेऊ लागलो. रात्री मात्र थडीपासून बचाव करण्यासाठी ते अगावर चढवावेच लागत.

वार्गुसिन पार केल्यानतर पूर्ण दिवस अन्नाचा एक कणही पोटात गेला नाही. भुकेन जीव कसनुसा होऊ लागला होता आणि अशावेळी अवचित तो घोडा आम्हाला दिसला. झाडीमधून त्याची अस्थिर हालचाल प्रथम कळली एका घसरगाडीला तो बांधलेला होता त्याला आमची चाहूल लागली होती आणि ते त्याला आवडल नव्हत त्याच्या हालचालीवरून ते सहज कळत होत मी आणि झारोन पुढे जाऊन नीट टेहळणी केली घोडयान खांद्यावरून मान वळवून आमच्याकडे पाहिल आमच्या हेतूचा त्याला सशय आल्यास आश्चर्य वाटण्यासारख काहीच



राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय

नव्हत  आम्ही घोड्याच मांस खायला एका पायावर तयार होतो

झारोला आणि मला एकाच वेळी ती दिसली—एक नळीची, १२ बोअर, जुनी-पुराणी बंदूक, त्या गाडीच्या बाजूला पडली होती शेजारीच दारूगोळ्याची चामडी पिशवी होती दोघांच्याही मनात एकच विचार एकाच वेळी आला बंदुकीचा मालक यायच्या आत ती बंदूक हस्तगत केली पाहिजे क्षणार्धात पुढे धावलो आणि बंदूक झडपली उचलताना तिच तोंड वर करून उचलली, तिचा बुधा आणि नळी तारांनी एकत्र करून बांधली होती बाकीच्याना खूण करून जवळ बोलावले सगळे एकदम गोळा झाले फक्त स्मिथ ख्रिस्तिनाला कुशीत घेऊन पुढे घडणारा प्रसंग पहात थोडा मागेच थांबला घोडा अचानक फुरफुरू लागला. खिंकाळू लागला कोलो पुढे होऊन घोड्याला शांत करायचा प्रयत्न करू लागला पण ते जनावर कोलोला जवळ येऊ देईना

त्या घोड्याचा मालक जवळच असावा म्हणजे घोड्याची चलविचल ऐकू येईल एवढ्या अंतरावर तो आलाच आम्ही अत्यंत तंग परिस्थितीत त्याला सामोरे झालो म्हातारा साठीचा असावा अंगाखांद्यान अत्यंत मजबूत होता. बहुधा लाकूडतोड्या असावा उजव्या खांद्यावर भलीमोठी कुऱ्हाड सहज पेललो होती भरपूर गच्च दाढी होती पण छान आकार दिलेला होता तो आमच्याकडे अत्यंत दमदार पावल टाकीत येऊ लागला त्याच्या धीम्या चालीत आम्हाला जबरदस्त आत्मविश्वास दिसत होता भितीचा लवलेशही जाणवत नव्हता माझ्या हातातील बंदूक त्यान पाहिली होती तरी जराही नजर न ढळवता तो पुढेच येत राहिला त्याने घोड्याजवळ जाऊन त्याच्या आयाळीत बोट फिरवून त्याला शांत केल आपली कुऱ्हाड बाजूच्या झाडावर खाच्चकन् खोचली आमच्याकडे स्मिथ आणि ख्रिस्तिनाकडे एक वेळ नीट नजर फिरवली आणि विचारलं 'कोण आहात तुम्ही ?'

स्मिथ पुढ येत म्हणाला, 'आम्ही पळून निघालेले कैदी आहोत तुम्हाला आम्ही काहीही करणार नाही आम्हाला फक्त काहीतरी खायला पाहिजे'

'काळ आता बदललाय' तो म्हणाला, 'एक वेळ अशी होती की तुमच्यासाठी अन्नछत्र उघडल गेल असत आणि कसलीही चौकशी झाली नसती'

माणूस अत्यंत साधा पण ताठ मानेन चालणारा होता आम्हा सर्वांकडे अत्यंत सहजपणे तो पहात होता ख्रिस्तिनाकडे नजर जाताच आम्हाला वाटल, तिच्याबद्दल तो काही तरी विचारणार; पण तो काहीच बोलला नाही घोड्याला वळसा घालून गाडीजवळ खाली वाकला आणि एक थैली उचलली त्या थैलीच्या गळ्याभोवतीचे चामड्याचे बंद त्याने मोकळे केले

'माझ्यापासून तुम्हाला कसलही भय नाही,' तो सांगू लागला, 'मी

एकटाच रहातो आणि या भागात मलोगणती माझ्याशिवाय दुसर कुणीही रहात नाही'

पाठोपाठ त्या थैलीतून खजिनाच बाहेर आला गडद तपकिरी रंगाचा एक मोठा पाव, चार सुकवलेले मासे व डुकराच्या मासाचा खारवलेला एक भलामोठा तुकडा त्याने बाहेर काढला आमच्या तोंडाला सुटलेल पाणी आम्हाला लपवता येत नव्हत त्यान कमरेचा लांबलचक शिकारी सुरा काढला दिवसभर जगलात राह्ण्याच्या तयारीनिशी तो आला होता, हे स्पष्ट कळत होत आणि त्याच अजून जेवण झालेल नाही हेही उघड होत अत्यत मन लावून पावाचा एक आणि मांसाचा एक असे तुकडे त्यान कापून आपल्यासाठी बाजूला काढून ठेवले मग कोलोला, सगळ्यात जवळ तोच असल्यान, खूण करून जवळ बोलावल उरलेला सगळा माल त्यान कोलोच्या हातात कोंबला कोलोला नक्की काय कराव ते कळेना तेव्हा मीच त्याला सागितल की, आत्ता तुझ्याच थैलीत ठेव, मागाहून आपण त्याचे वाटे करू

माझा आवाज ऐकताच त्या रशियन शिकाऱ्यान माझ्याकड आणि हातातल्या बदुकीकड पाहिल प्रश्नार्थ स्पष्ट दिसत होता मी स्मिथजवळ जाऊन बदुकीच काय करायच, याबद्दल चर्चा केली एक गोष्ट नक्की होती की, त्या बदुकीचा आम्हाला काही उपयोग नव्हता त्या बदुकीन शिकार करण धोक्याच होतर कारण इथून पुढे दक्षिणेकडे लोकवस्तीच प्रमाण, गावाच प्रमाण वाढत जाणा होत बदुकीच्या आवाजान निष्कारण लक्ष वेधल जाण्याचा धोका होत अर्थात ती बदुक त्या लाकूडतोड्याला तशीच परत देण्याचा धोकाही आम्हाला पत्करायचा नव्हता. पालुको आणि मॅकोनही आपली मत माडली कदाचित् ती बंदुक आपल्याविरुद्ध वापरली गेली तर !

मी त्या रशियनाकडे वळून म्हटल, 'माफ करा म्हातारबुवा, पण ही बदूक आम्हाला आमच्याजवळच ठेवावी लागणार.'

तो पहिल्यादाच विचलित झालेला दिसला आम्हाला विनती करण्याकरता त्याने हात वर उचलले आणि निराशेन पुन्हा खाली सोडले तो म्हणाला, 'तुम्हाला ही बदूक वापरण फारस सुरक्षिततेच नाही तुमच्या भावना मला कळतात तुम्ही अस करा ना ! वाटेत कुठेतरी ती झाडाला टांगून ठेवा लगेच नाही, पण केव्हा तरी ती मला पुन्हा सापडेल'

आम्ही तिथून जायला वळलो त्यान आम्हा सर्वांकडे स्नेहपूर्वक पाहिल. विशेषत ख्रिस्तिनाकड पाहून म्हणाला, 'यशस्वी व्हा, नशीब तुमची साथ करो, तुमच ध्येय गाठण्यात तुम्हाला यश मिळो'

त्यानतर आम्ही फारस काही न बोलता जवळपास तासभर चालत होतो.

त्याची बंदूक त्याच्याकडून हिरावून घेतल्याची बोच मनाला सतत टोचत होती त्या सामान्य लाकूडतोड्याच्या दृष्टीने ती बदूक म्हणजे अनमोल ठेवा होता. साधारणपणे पाच मैल गेल्यावर मी ती बदूक एका झाडाच्या छोट्या फांदीला अडकवून ठेवली खुणेसाठी हरणाच्या कातड्याचा एक तुकडाही लटकवून दिला आम्ही यापेक्षा आणखी जास्त काय करू शकलो असतो ?

बरोबरच्या अन्नाला आम्ही सबध दिवसभराच्या वाटचालीत हात लावला नाही रात्री मुक्कामासाठी थांबलो, तेव्हा कोलोन त्या सगळ्याचे सारखे आठ भाग केले प्रत्येक वाटा इतका लहान होता की, माझा वाटा मी अक्षरश दोन मिनिटात फस्त केला असता आणि तरीही पोटाचा खळगा तसाच राहिला असता परतु अनुभवान शहाणपण येत म्हणतात, तशी याहीपेक्षा कठीण प्रसगात निभावून जाण्यासाठी शक्य तेवढा अन्नसाठा करून ठेवण्याची आमची सहजप्रवृत्ती तयार झाली होती तो इवलासा वाटासुद्धा तीन दिवसांसाठी विभागायच अत्यत कठोरपणे ठरवल ख्रिस्तिना आमच बोलण ऐकत होती आणि आमच्यासारखच पोट मारून खात होती एक तीळ आम्ही आठ जणात वाटून खात होतो त्या दिवशी ती फारच थकलेली, मलूल दिसत होती

दिवसभर भुकेचे विचार चालूच असायचे तरीही त्यामानान आमची प्रगती चागली होती लहान डोंगराच्या रांगामागून रागा आम्ही पार करीत चाललो होतो हळूहळू मनुष्यवस्तीच्या खुणा वाढू लागल्या सर्वसाधारण पद्धत अशी ठेवली होती—अत्यत सावधपणे टेकडाच्या माथ्यापर्यंत जायच आजूबाजूचा प्रदेश नीट न्याहाळायचा लांब अतरावर माणसाची हालचाल दिसायची टेलीफोनचे खाब म्हणजे मोठा रस्ता असल्याची पक्की खूण अशा रस्त्यावर [illegible] माग बदलावा लागायचा दूर शेतात माणस एकमेकाला हाका घालत असल्याचं ऐकू यायचं; क्वचित केव्हा एखाद्या कारखान्याचा भोंगा कानावर यायचा

सगळी 'टाळाटाळ' करून दिवसाउजेडी प्रवास करण अवघड होऊ लागल अन्नदात्या लाकूडतोड्याने दिलेल्या अन्नाचा शेवटचा कण सपला त्या दिवशी आम्ही एकूण परिस्थितीचा अदाज घेण्यासाठी थांबलो हा दिवस माझ्या चांगलाच लक्षात राहिला. त्या दिवशी ख्रिस्तिना मागेमागे राहू लागली मधेच थोडा वेळ गायब व्हायची आणि आमचा खोळबा व्हायचा आत्तासुद्धा आम्ही विचारविनिमयासाठी बसलो, तेव्हाही ती कुठे तरी नाहीशी झाली होती.

पालुकोने विचारल, 'या मुलीला काय झालय ? सारखी मागे मागे रहातेय'

थोडासा चिडूनच मी म्हणालो, 'तिला जे काय झालय ते एखाद्या दिवसाच्या विश्रातीन नक्की सुधारू शकेल एक गोष्ट लक्षात घ्या, ती स्त्री आहे आणि सर्वच स्त्रियांना मधूनमधून बर नाहीस होत, विसरलात काय?'

पालुको शरमिंदा झाला, 'अरे, ही गोष्ट माझ्या लक्षातच नाही आली.' तो म्हणाला तसं पाहिलं तर इतरांच्याही लक्षात ही गोष्ट आली नव्हती.

'अरेरे ! बिचारी' मॅको म्हणाला.

स्मिथनं बोलायला सुरुवात केली, 'आपल्याला पुन्हा एकदा रात्रीची वाटचाल सुरू करावी लागणार आहे मला वाटतं, आजपासूनच सुरुवात करावी, म्हणजे ख्रिस्तिनाला दिवसभराची विश्रांतीही मिळेल रावीज, आमच्यात तूच सगळ्यात तरुण आहेस तिच्याशी हळूच विषय काढ आणि तिला बरं वाटल्याशिवाय निघणार नाही, असं आश्वासन दे'

थोड्याच वेळात ख्रिस्तिना झाडामागून बाहेर आली तिला हळूवार आवाजात सांगितलं, 'ख्रिस्तिना, आज आपण सगळेच दिवसा विश्रांती घेणार आणि रात्रीच्या वाटचालीला पुन्हा सुरुवात करणार आहोत'

'माझ्यामुळे का ?' डोळ्यात करूणा होती

'नाही, मुळीच नाही ! यापुढे रात्रीचा प्रवासच जास्त सुरक्षित होणार आहे'

'रावीज, मला माफ करा माझ्यामुळं तुम्हाला अडकून पडावं लागतंय पण मी तरी काय करू ? माझा नाइलाज आहे आज फारच गळून गेलेय मी'

'मला कल्पना आहे मुली, काही काळजी करू नकोस'

'किती दयाळू आहेस तू ! तुम्ही सगळेच माझ्याशी किती ममतेनं वागता तुमचे आभार कसे मानू कळत नाहीये' ती वळता वळता कृतज्ञतेनं म्हणाली मी तिला सगळ्यांच्यात घेऊन गेलो सगळं वातावरण पुन्हा दिलखुलास झालं ती स्मिथजवळ जाऊन बसली त्याला अमेरिकेतल्या बायकांच्या पोशाखाबद्दल लाडानं विचारू लागली खेळकर संवाद सुरू झाला ती गुडघ्यावर आपला गाल टेकवून कौतुकानं ऐकू लागली

कार्यक्रमातला बदल सर्वांनाच सुखाचा वाटू लागला दिवसा झोपा काढायच्या आणि रात्रीच्या शांत, थंड वेळी चंद्रप्रकाशात मार्ग आक्रमायचा

अशाच एका चांदण्या रात्री भुकेनं आम्हाला एका खेड्यावर चक्क दरोडा घालायला प्रवृत्त केलं एका टेकडाच्या माथ्यावर पोहोचलो आणि मैल-दीड मैल अंतरावर विखुरलेल्या घरांच्या दिवल्या पाहून थबकलो तेवढ्यात एका डुकराचं ओरडणं आमच्या कानांवर आदळलं

झारोनं ओठावरून जीभ फिरवली म्हणाला, 'माझी आई डुकराची शेपूट आणि मटार याचं सूप काय झकास करायची !'

कोलोनं माझ्या खांद्याला स्पर्श केला 'चल, आपण ते डुक्कर शोधून काढू या.'

आम्ही धोक्याचा, संकटाचा विचार केला भूक तर जबरदस्त लागली

होती स्मिथन प्रथम कडवा विरोध केला मग जरा नरमून समती दिली डुक्कर-शिकारीसाठी पथकाची निवड झाली कोलो त्याच्या कुऱ्हाडीसह, मी सुरा घेऊन आणि मदतीला तिसरा भिडू मार्चिनको असे निघालो.

मी आणि कोलो पुढ, मागोमाग काही अतरावर मार्चिनको असे सरळ रेषेत निघालो ज्या बाजून डुकरण आल अस वाटत होत, ती दिशा अदाजान धरली खेड्याच्या सीमेवर झाडांच्या एका बेटाजवळ पोचलो मध्ये गवतही खूप माजल होत समोरच थोड्या अतरावर एक गोठेवजा लाकडी घर दिसत होत त्या झाडाच्याजवळ मार्चिनकोला पाहऱ्यासाठी ठेवून आम्ही रागत रागत त्या घराकडे सरकू लागलो त्या इमारतीला धुराची चिमणी नाही, यावरून तिथे माणसाची वस्ती नसावी, असा वास्तव अदाज आम्ही बाधला

मी रागत इमारतीच्या लाकडी भितीजवळ अगदी चिकटून निपचित पडलो आणि कान लावला आतमधे गवतात खसफस करीत डुक्कर हिंडत असल्याच कळत होत त्याला बहुधा माझा वास लागला असावा दरवाजा शोधण्यासाठी मी भित चाचपली सापडेना कोलोही एव्हाना माझ्याजवळ आला होता दार बहुधा पलिकडच्या बाजूला असाव त्या बाजूला तर इतर घराचे दिवे दिसत होते पण इलाज नव्हता रागत त्या बाजूला गेलो दाराच कवाड हाताला लागल साध्याच कडीन बद केलेल होत मी ती काढून कवाड उघडल बरेच दिवसात तेल—पाणी न केल्यामुळ रीतसर करकर आवाज झालाच आम्ही बारक्या फटीतुन आत शिरलो आत छान अधार होता दुसऱ्या कोपऱ्यात डुकराचा वावर जाणवत होता तिकडे वळलो. वाटेत एक कठडा होता त्यावरून पलीकडे उतरलो आमच्या हजेरीन अस्वस्थ झालेल डुक्कर माझ्या पायाजवळ येऊन आपल्या सपाट चबू ओठानी हुगापू लागल कोलोन त्याच्याभोवती आपल्या लोखडी हाताचा हलकेच विळखा घातला आणि उचलायचा प्रयत्न केला कोलो म्हणाला, 'प्रकरण चागलच जड आहे उचलून नेण अशक्य आहे'

आता काय करायच ? एकच उपाय होता. त्याला बरोबर यायला लावायच त्याच्याशी थोडी दोस्ती करून थोड्या गुदगुल्या करत, थोड ढकलत अस न्यायचं ठरवल आम्ही कोपरानी गुदगुल्या करायला सुरुवात केली डुक्कर आनदान गुरकू लागल मी त्याचा कान धरून दिशा दाखवू लागलो कोलो त्याला गुदगुल्या करत ढकलत होता ते हालायला तयार होत नव्हत शेवटी एकदाच डुड्डुडायला लागल बाहेर पडल्यावर मागच दार लोटल आणि त्या जनावराला चुचकारत आमच्याबरोबर मुकाटपणे यायला आम्ही प्रोत्साहन देत होतो तेही एखाद्या शहाण्या मुलासारख चालत होत वाटेत झाडाच्या बेटाजवळ मार्चिनको भेटला आमची पिछाडी साभाळत तोही आला

जिवावर उदार झाल्यासारख आमच ईप्सित आम्ही साध्य केलं. इतरापासून शभर एक थार्डावर कोलीन कुऱ्हाडीच्या एकाच फटक्यात डुक्कर आडव केल कसलाही आवाज न करता जनावर गारद झाल त्या आज्ञाधारक डुक्कराची क्षणभरच पण दया आली आम्ही झपाट्याने कामाला लागलो त्या धुडाची चीरफाड केली सात माणसाना वाहून नेता येईल असे तुकडे केले

आमचा कत्तलखाना त्या गोठ्यापासून जेमतेम पाऊण मैलावर झाला होता त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या खाणाखुणा सहजच उघडकीला आल्या असत्या थोडक्यात, तिथून शक्य तितक्या झपाट्यान लाब जायला हव होत जवळजवळ पळतच निघालो पूर्वेला ताबड फटफटेपर्यंत आम्ही थाबलोच नाही एका खडकाळ टेकाडावर चढलो आता मात्र आडोशाची गरज होती हात–पाय गळून गेले होते झाडोऱ्याच्या आड दडलेली एक छोटीशी गुहा आम्हाला सापडली आणि आम्ही हुश्श केल

सूर्य वर आला तशी आम्ही आलो त्या दिशेन सावधपणे नजर फेकली जवळपास दोन मैलाचा सपाट प्रदेश, त्यानतर छोट्या टेकड्याची एक रांग दिसत होती आणि नशिब म्हणजे मनुष्यवस्तीचा कुठे मागमूसही दिसत नव्हता तरीही उघड्यावर येण्याचा धोका पत्करायला आम्ही तयार नव्हतो खाद्यावरच्या मासाच्या थैल्या नीट रचून ठेवल्या जूनच्या उन्हाळ्यात ते फार दिवस खाण्याच्या अवस्थेत राहाण शक्य नव्हत शिजवून ठेवण अत्यावश्यक झाल होत त्यासाठी आगोटी पेटवायला हवी होती तो धोका पत्करण्याशिवाय गत्यतर नव्हत ताज, भाजलेल आहे तोवर ते जमेल तेवढ खाऊन घ्यायच ठरवल तडस लागली तरी चालेल! झाल विचार पक्का होताच धूर कमी व्हावा म्हणून सुक्यात सुक जळण गोळा करून आग पेटवली मटणाचे तुकडे भाजण्याच काम त्वरेन सुरू झाल काटक्याचा नाही म्हटल तरी धूर होतच होता त्यात चरबी वितळून धुराची आणखी भर पडत होती भटारखान्याचा ताबा ख्रिस्तिनान घेतला होता सगळ्या गुहेत भाजल्या जात असलेल्या चरबीयुक्त मटणाचा आणि धुराचा एकच 'सुगध, दाटून राहिला.

तो दिवसभर आम्ही मांस भाजत होतो, खात होतो आणि झोपा काढत होतो दर वेळी दोन तासाच्या पाळीन प्रत्येकजण पहारा देत होता दुपारच्या सुमाराला अजीर्णान माझ्या पोटात कळा मारू लागल्या साहजिकच होतं इतक्या दिवसाच्या उपासमारीन अन्नपचनाची क्षमताच नाहीशी झाली होती इतराचीही अवस्था तीच झाली होती कळा असह्य होऊन गडबडा लोळत होतो सध्याकाळच्या सुमाराला जरा आराम पडला आणि पुन्हा खायला सरसावलो

कोणीतरी सूचना केली की, उरलेल मास आपण धुरकटून ठेवू या, म्हणजे जास्त टिकेल लगेच हिरव्या जुनिपरच्या फाद्या पेटवून धूर केला आणि मांसाचे

तुकडे त्या धुरावर धरले एकच खकाणा उडाला धुरामुळे सगळ्यांची खोकून खोकून दाणादाण उडाली. सगळे तुकडे चांगले धुरकटून झाल्यावर थैल्यांत भरले आणि कूच केल

प्रवासाच्या या टप्प्यावर आम्हाला एक गोष्ट चांगली जाणवत होती सरहद्द साधारणपणे एका आठवड्याच्या अंतरावर असणार, या जाणिवेन आम्हाला जरा जास्तच सावध केल बडबडण कमी झाल सारख अस वाटायच की, आजूबाजूला वैरी पसरलेले आहेत आणि केव्हातरी त्यांच्याशी गाठ पडणार आहे सरहद्दीपेक्षा ट्रान्स सैबेरियन रेल्वे ओलांडण अधिक धोक्याच आहे, अस मला सारख वाटत होत रेल्वेलाइन फार लांब नसल्याच पहाटेच्या शांत वेळी दूरवरून येणाऱ्या आवाजावरून जाणवत होत स्मिथलाही माझ्यासारखच वाटत होत तो काळजीयुक्त स्वरात म्हणाला, 'रेल्वेवर फार कडक पहारा असणार !' मी म्हटल, 'आपण रात्रीच्या वेळीच पार करू !'

दिवसा झोपण अवघड होऊ लागल पहारा ठेवण्याची गरज वाटेना आणि सगळ्यांना चिंतेन ग्रासल होत एकट्या ख्रिस्तिनाची मन शांती ढळली नव्हती आमच्यावर पूर्णपणे विसबून ती बिनधास्त होती

जूनमधल्या एका स्वच्छ सकाळी एका टेकडीवरून दूर पाच मैलांवर ट्रान्स सैबेरियन रेल्वेचा लोहमार्ग आम्हाला अवचित दिसला त्या लोहमार्गाला लागूनच ४।५ मैलांच्या अंतरान दोन खेडी वसली होती दोन्ही खेड्यात रुळाशेजारी सिग्नल आणि दगडी केबिन दिसत होती लोहमार्गाच्या ज्या बाजूला आम्ही होतो, म्हणजे उत्तरेला, त्या बाजूला मुद्दाम लावलेल्या झाडांचा पट्टा दिसत होता तसच त्याच्या पलीकडे कसल तरी कुंपण असल्याच जाणवत होत दोन्हींचा उपयोग हिवाळ्यात उतारावरून रुळावर वाहून येणाऱ्या बर्फाचा लोट अडवण्यासाठी होत असणार दिवसभर आम्ही तिथूनच टेहळणी केली अनेक लांबलचक गाड्या दोन्ही दिशांनी जात-येत होत्या लोहमार्गावर पहारेकरी काही कुठे दिसत नव्हते

रात्र पडताच आम्ही लोहमार्गाकडे निघालो कुंपणान फारसा त्रास दिला नाही बंधाऱ्याच्या पायथ्याशी खड्डा खणलेला होता, त्यात उतरून थेट लोहमार्गावर चढलो मी जवळच्या रुळाला कान लावला कसलाही आवाज येत नव्हता मी उठून उभा राहिलो आणि हातान खूण करून लोहमार्ग झपाट्यान पार करण्यासाठी फर्मावल ख्रिस्तिनाच कोपर धरून आम्ही पलीकडे उड्या मारल्या पाठोपाठ बाकीचे धबाधब उड्या मारून आले आणि आम्ही जीव घेऊन पळत सुटलो दीड-दोनशे यार्ड पळालो असू, तेवढ्यात कुणीतरी किंचाळन सांगितल, 'पडा ! पडा ! आडवे व्हा !'

ख्रिस्तिनाला हातानच खाली पाडल मीही खाली पडून मागे वळून पाहिल

एका पॅसेंजर गाडीचे दिवे येताना दिसले काही क्षणातच ती धाड धाड करीत वेगाल निघून गेली आम्ही थोडक्यातच बचावलो होतो गाडीतल्या कुणी जर आम्हाला पाहिल असत, तर कदाचित आमचा निर्घृणपणे फडशा पाडला असता अजिबात कुणी पाहिल नसेल याची खात्रीही देता येत नव्हती तेव्हा घाईच करायला हवी होती

दुसऱ्या दिवशी सूर्योदयाच्या वेळेला, रात्रभराच्या अविश्रांत अवघड प्रवासानतर एका स्वच्छ, सथ वहाणाऱ्या नदीच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचलो होतो स्मिथच म्हणण पडल, शक्य तितक्या लवकर नदी पार करावी या नदीचं पाणी बैकल भागातल्या नद्यांपेक्षा चागल सथ आणि थोडस कोमटही होत ती नदी पोहून पार केल्यावर सुखद तरतरी आली दक्षिणेकडचा भू-प्रदेश बराच सपाट आणि जगल आडोशाचा होता त्यामुळे आमचा प्रवास खुशीत चालला होता

आम्ही सरहद्दीच्या अगदी जवळ असू, अचानक दोन माणस समोर साधारण ५० यार्डावर दिसली बुर्यात मोगली जमातीची असावी आता भेट टाळण अशक्य होत त्यांच्या दिशेन चालत राहिलो

त्या दुकलीतला एकजण मध्यमवयीन असावा आणि दुसरा मात्र निश्चितच तरुण होता बाप-लेक शोभले असते आम्हाला येताना पाहून थाबले आम्ही जवळ पोचताच रुद हास्य करून, मानेन अभिवादन केल.

त्याच्या बोलण्यात अत्यत अदब होती मार्दवाची झालर होती मीही तोच सूर पकडला अतिशय सथ रशियनमधे ते बोलत होते. आमची वाटचाल कशी झाली याची आस्थेन चौकशी करू लागले आम्हीही त्यांच कुशल विचारल त्या बाप्याला आम्ही कुठून आलो यात जास्त रस दिसला

'तुम्ही कुठून आलात?'—तो

'पार उत्तरेकडून—याकुत्सहून आलो'—मी

'मग आता निघालात कुणीकडे?'—तो

'आम्ही? आम्ही चाललोत दक्षिण यात्रेला!'

त्यान माझ्याकडे आपल्या सुरकुतल्या पापण्यातून कुतूहलान पहात म्हटल, 'अच्छा म्हणजे तुम्ही 'ल्हासा'ला यात्रेसाठी चाललायत तर'

मला अनायासे चागल सूत्र सापडल मी त्याच्या कल्पनेला होकार दिला.

त्या बाप्याच तेवढ्यान समाधान झाल नव्हत तो म्हणाला, 'मग या बाईला कुठ घेऊन चाललात?'

काही तरी सांगण भाग होत 'तिचे कुणी नातेवाईक वाटेवरच्या गावात रहातात, तिथे तिला सोडायच आहे,' मी दडपून सांगून टाकल

ते दोघे मोगल आपसात हसले आणि आम्ही ख्रिस्तिनाची छान काळजी

घेत आसल्याबद्दल कौतुक केल मग त्या दोघानी आपल्या अगरख्याच्या खिशात हात खुपसले, मूठमूठ शेंगदाणे बाहेर काढले आणि आनदान आमच्यात वाटले

दोघानीही, आमचे पाय आम्हाला आमच्या इच्छित स्थळी सुखरूप नेवोत, अशी प्रार्थना केली आणि मार्गाला लागले ते दृष्टिआड होण्याची वाट पहात आम्ही थाबलो तेवढयात तो 'मोठा' वळून परत मागे आला आणि खिरस्तिनाजवळ जाऊन उभा राहिला आपल्या खिशातून त्याने चागले पसा-भर शेंगदाणे काढले आणि तिला एकटीला दिले पुन्हा एकदा सदिच्छा व्यक्त करून ते दोघेही निघून गेले

आम्ही झपाटयाने निघालो सरहद्द अगदी जवळ होती आता कसलाही धोका पत्करता येत नव्हता

## मगोलिया

जून अर्धा उलटल्यावर रशिया-मगोलिया हद्द आम्ही ओलाडली आणि आमच्या सुटकेचा एक अत्यत महत्त्वाचा टप्पा पार पडला ही 'हद्दपारी' दोन गोष्टीसाठी लक्षात राहिली पहिली म्हणजे, अत्यत सहजपणे, कसलीही आडकाठी न येता आम्ही हद्द ओलांडली आणि दुसरी म्हणजे, ओलांडताना आमच्याकडे जवळजवळ पन्नास किलो कोवळया बटाटयाच सुखद ओझ होतं ज्या दिवशी दुपारी आम्ही सरहद्द ओलाडली त्याच पहाटे एका शेतावर डल्ला मारून आम्ही ते बटाटे हस्तगत केले होते ज्या सफाईन आम्ही ते काम उरकल त्याचीच आम्हाला गमत वाटत होती तुरुगात जाताना रिकाम्या हातांनी आम्ही प्रवेश केला होता आणि आता सुटका होताना अनमोल भेटवस्तू आम्ही देणगी म्हणून ढापली होती ज्याचे बटाटे आम्ही पळवले होते, त्या बिचाऱ्याना आपण केवढे उपकार केलेत याची जाणीवही नसणार !

हद्दीजवळ आम्ही दुपारनतर पोहोचलो मार्गात कसलाही अडथळा नव्हता हद्दीची दुभाजक रेषा दर्शविणारा एक नऊ फुटी खाब होता त्या खाबावरच्या गोल पट्यावर रशियाच खास चिन्ह काढलेल होत. गव्हाच्या लोंब्या, लाल तारा, हातोडा आणि कोयता त्या लाल खाबाच्या पूर्वेला आणि पश्चिमेला काही, अतरावर असेच खांब दिसत होते

जमिनीचा उचसखलपणा लक्षात घेऊन एका वेळी आणखी किमान दोन खांब दिसतील अशी योजना होती

मी तो खाब ओलाडून पलीकडच्या बाजूला काही लिहिलय की काय, ते पाहू लागलो. ती बाजू कोरी होती तेवढयात झारो मोठ्याने म्हणाला, 'काय रावीज, मगोलियाच्या बाजूला कस काय वाटतय ?' त्याच्या या बोलण्यावर एकच हशा उसळला

झारो लगडी घालत उड्या मारत माझ्यापर्यंत आला सगळेच ह्पापून हद्दीच्या पल्याड आले. एकमेकांच्या पाठीवर थापा मारून अभिनदन करू लागले दाढ्या कुरवाळू लागले नेहमीप्रमाणे स्मिथन या उधाणाला आवर घातला आपली बटाट्यान भरलेली पोती पाठीवर घेऊन तो झपाट्यान चालू लागला आम्हीही त्याच अनुकरण करून हसत-खिदळत त्याच्या पाठोपाठ झपाट्याने निघालो

तो म्हणत होता, 'हद्दीपासून शक्यतो दूर जायला हव कारण, रशियन हद्द सपली असली तरी त्यांची घुसखोरी कुठपर्यंत आहे ते कळण अवघड आहे आपण नक्की कुठ आहोत हे आपल्याला माहीत नाहीये '

आम्ही धाईनच निघालो पाठीवर बटाट्याची पोती बदाबदा आपटत होती सीमादर्शक खाब मागे अधारात लुप्त होऊ लागले होते. स्मिथन हळूहळू विचाराना गभीर दिशा दिली आम्ही ६०।६५ दिवसात जवळपास बाराशे मैल अतर तोडल होत वेग आणि आमची सहनशक्ती यांचा हा विजय होता

पालुकोन विचारल, 'आता अजून किती जायचय ?'

मी थोडा विचार करून म्हणालो, 'जेवढे आलो त्याच्या दुप्पट तरी अतर काटायचय !'

तो तोंड वासून बघतच राहिला

आपल्याला कुणीकडे जायच आहे कुठे चाललो आहोत याचा गभीरपणे विचार सुरू झाला आतापर्यंत सैबेरियातून बाहेर, एवढाच विचार होता छावणीत असताना मी अफगणिस्तानबद्दल बोलत होतो, पण त्यात कसलाही आत्मविश्वास नव्हता जिथे आपली कुणी फारशी चौकशी करणार नाही, असा एक छोटासा देश असेल एवढीच माफक कल्पना होती आता आम्ही भारता-बद्दल विचार करू लागलो त्याच मुख्य कारण म्हणजे त्या दोन मोगल प्रवाशांशी बोलताना झालेला ल्हासाचा उल्लेख. आमची भाषा न समजणाऱ्या या प्रातात ल्हासा हा परवलीचा शब्द होता. बाकी काही कळल नाही, तरी ल्हासा म्हण-ताच हातान दिशा दाखवली जाईल याची खात्री होती. त्यामुळे चर्चेच्या पहिल्या तासात तिबेट हाच मुख्य विषय होता भारताचा विचार करायला तो देश जरा जास्तच दूर होता

स्मिथला वास्तवाची फार चांगली जाण होती. कसलेही नकाशे जवळ नाहीत त्यामुळे आम्ही आत्ता कुठे आहोत हे कळत नव्हत बर, सागायला आजूबाजूलाही कुणी दिसत नव्हत याबद्दलच तो सारखा विचार करत राहिला.

हद्द ओलाडल्यावर दोनएक तासात आम्ही पर्वत चढू लागलो होतो. घामाच्या धारा वाहू लागल्या आणखी वर गेलो आणि वादळाची चिन्हं दिसू लागली गरम घोंघावणारे वारे अचानक वाहू लागले वादळाचा जोर वाढू लागला

मध्यरात्रीच्या सुमारास वादळान रौद्र रूप धारण केल वीजाच तांडव सुरू झालं पहिलाच कडाका डोक्यावर फुटला वीस-पचवीस तोफा एकाच वेळी डागल्यावर जसा थरकाप उडवणारा गडगडाट होईल, तसा वीजेचा कडकडाट झाला कानावर हात ठेवूनही कानठाळच्या तितक्यातच तीव्रतेन बसत होत्या. आकाशात चौफेर लखलखाट चालू होता त्यात रोरावणाऱ्या वादळ-वाऱ्याची भर सगळा आसमत त्या चक्री वादळान घुसळून निघत होता तेवढ्यात पावसाचे मोठाले थेंब आदळू लागले थेंबानी आम्हाला आडोसा शोधायला भाग पाडल पण पावसापासून बचाव करायला पुरेसा आसराच नव्हता नुसते उतारबद खडक होते पावसाचा जोर वाढू लागला, वाऱ्याला न जुमानता पावसाचे थेब आपल्या वजनभारान सरळसोट मुसळधार पडत होते

आमचे कपडे काही मिनिटातच पाण्यान थबथबून निथळू लागले आम्ही अतर्बाह्य भिजून चिंब झालो उभ्या आयुष्यात वीज-पावसाच्या या चक्री वादळा-सारखा प्रकार कधीही अनुभवला नव्हता

ती रात्र आम्ही आठही जणानी खडकाच्या एका खबदाडीत काढली सगळ्यात आत असलेल्या एक-दोघानाच काय तो त्या आडोशापासून थोडासा फायदा झाला त्या एक-दोघात अर्थातच ख्रिस्तिना होती भिजून कुडकुडत निसर्गाचे ते ताडव पहात ही काळरात्र केव्हा एकदाची सपते याची वाट पहात काढली.

दिवस उजडताच पुन्हा चालायला सुरुवात केली तेव्हा जरा हायस वाटल कधी थाबायचच नाही, अशा थाटात पाऊस आपला कोसळतच होता तो सबध दिवस, रात्र आणि दुसऱ्या दिवशी सध्याकाळपर्यन्त पावसाचा धुमाकूळ चालूच होता त्यानतर मात्र तो अचानक थाबला जितक्या अवचित तो सुरू झाला, तितक्याच अचानकपणे कुणी तरी झटकन नळ बद करावा, तसा तो थाबला तिसऱ्या दिवशीच्या कडक उन्हामुळे आमची भयाण अवस्था कमी झाली खडकातून वाफा निघू लागल्या आम्ही आमचे कापडे वाळवले आणि आमच्या आत्ताच्या ठिकाणाचा पुन्हा एकदा विचार करू लागलो.

चढण सुरूच होती तशी ती फार अवघड नव्हती, पण थकवणारी नक्कीच होती प्रत्येकाच्या पाठीवर असलेले दहा-पधरा किलो बटाट्यांच तस ओझ त्रासदायकच होत, पण कुणी तक्रार करीत नव्हतं चौथ्या दिवशी एका डोंगरमाथ्यावरून आजूबाजूचा बराच भाग दिसू लागला पूर्व-पश्चिम बाजूला डोंगराच्या ओळी दक्षिणेकडे उतरत असलेल्या दिसू लागल्या. पसरलेल्या प्रचड पजाची लांबसडक बोट दिसावीत अशी रचना दिसत होती अगदी अपघातानेच आम्ही ज्या डोंगरओळीवर होतो तीच त्यातल्या त्यात सोपी वाटत होती. कारण आजूबाजूच्या दोन-तीन प्रचड शिखराच्या मधून ती वाट जात होती

या पर्वतांचा समाचार घ्यायला आम्हाला आठएक दिवस लागले डोंगर-उताराचा शेवटचा टप्पा विशेष लक्षात राहिला; कारण जळणासाठी सुक्या काटक्या—फांद्या दिसू लागल्या आम्ही तीन दगडांची शेकोटी पेटवली आणि वास मारू लागलेल्या डुकराच्या मासाचे शेवटचे अवशेष शिजवले त्याच शेकोटीच्या एका कोपऱ्यावर एक सपाट दगड ठेवून त्यावर बटाटे भाजले बटाट्यानी जेवणाला बहार आणली.

थडगार उंची सोडून खाली पठारावर उतरलो आणि भट्टीमधे शिरल्यासारख झाल आमची लोकरीची जाकिट अंगावरन निघून हातात आली केसाळ गजीफ्रॉकवरच वाटचाल सुरू झाली ख्रिस्तिनाच्या जाकिटाच लोढण कोलोन वागवल ती तिच्या जाभळ्या पोशाखात चालू लागली सिमेंट कॉंक्रीट-सारखी कडक आणि त्यावर लालसर धुळीचा थर अशी जमीन होती आमचे उघडे हात कडक उन्हाने रापून काळवडले, त्यावर फोड आले आणि फुटलेही दिवसाकाठी त्या तशा उन्हात वीस—तीस मैलांची चाल करण अत्यत दमवणार होत आणि रात्र आली की थडीचा कडाका सुरूच व्हायचा

फुटलेल्या पायाचा उपचार करणं हे एक कामच होऊन बसल पायाला चिखल्या झाल्या बोटामध्ये भेगा पडायला लागल्या. त्यात भर म्हणून आमच्या मोजड्यात शिरलेली गरम धूळ त्या भेगात शिरायची आणि मरणयातना व्हायच्या त्यात थोडा दिलासा पालुकोच्या दूरदर्शीपणामुळे मिळाला होता. सैबेरियाच्या गुहेत डुकराची चरबी गळत होती ती त्यान गोळा करून नारळाच्या करवटीसारख्या एका वाडग्यात जमवली होती ती आम्हाला यावेळी उपयोगी पडली तो स्वत या चिखली रोगान कायमचा पछाडला होता त्याच औषध आम्हालाही उपयोगी पडल

तो सगळा प्रदेश वेड्यावाकड्या वाहणाऱ्या लहानलहान नद्यानी व्याप-लेला होता, हे आम्हाला दोन दिवसानी लक्षात आल एका दुपारी उन्हान भाजून निघत असतानाच नदीच अस्तित्व जाणवल आणि तिच्या थडगार पाण्याच्या लालसेन आमची पावल त्या कोरड्या ठाक जमिनीवर झपाझप पडू लागली नदीच दर्शन झाल आणि जीव सुखावले शभर यार्ड रूदीच पात्र होत दोन्ही काठांवर लुसलुशीत हिरवगार गवत वाढल होत. नदीच्या काठाला आधार देण्यासाठीच जणू काही जाड गवताचे पुजके उगवले होते या प्रकारच गवत सैबेरियातही सतत आढळल होत पोटावर पालथ पडून आकठ जलपान केल पाण्यात पाय सोडून ठणकणाऱ्या पावलाना जलासा दिला मनसोक्त अघोळी केल्या तिथलीच मऊशार वाळू अग घासायला वापरली कपडे साफ केले थोडेसे बटाटे भाजले आणि भोजन उरकून तिथल्याच गवतावर आम्ही

एखाद्या बादशहासारखे विसावलो

सुमारे दीड-दोन तासानी त्या नदीतून एक सांपान जातीची होडी येताना दिसली नाकाकडे उचावलेली, रुंद बसक्या बुडाची आणि त्यावर अगदी छोटीशी कनात बांधलेली होती त्या कनातीच्या जरा पुढे होडीवर एक लांब काठी आडवी बांधली होती त्याची दोन्ही टोकं पाण्यावर होती टोकाना काडयाची बोचकी बांधली होती प्रथम मला वाटल ती वल्ही असावीत, पण मग लक्षात आल की, ती तोल काठी होती कुठल्याही बाजूला कलंडायला लागली, तर त्या बाजूच बोचक पाण्यावर टेकून तरगायचा प्रयत्न करायचा आणि होडीचा तोल आपोआप सांभाळला जायचा होडीचालक चिनी दिसत होता अनवाणी आणि डोक्यावर भलीमोठी गवताची हमाली टोपी होती त्यान घातलेला चोळणा गुडघ्याच्या जरा खाली येऊन थांबला होता अंगात सैलसर अंगरखा. त्याच्या बाह्या कोपराजवळ ओरबाडून टाकल्या-सारख्या असा एकूण त्याचा अवतार होता

एका लांब बांबूच्या सहाय्यान वल्हवण चालू होत हे दृश्य आम्हाला नवीनच होतं आम्ही त्या चिन्याला हात हालवून अभिवादन केल त्यानही हसून, हात वर करून प्रत्युत्तर दिल आम्ही विश्रांती घेत असताना आणखी चार-पाच सांपान होडया तरगून गेल्या सर्वांची वल्हवण्याची तऱ्हा एकच होती एकाच होडीला फक्त एक उंच खांब लावला होता बहुधा तो शीड लावण्यासाठी असावा

मंगोलियाच्या त्या भागात निरनिराळया नद्यांमधून आम्हाला बऱ्याच होडया दिसल्या, पण त्या सर्वांमध्ये फक्त चिनीच दिसायचे आणि वाटेत रस्त्यावर मात्र हटकून मोंगलच दिसायचे रस्त्यात एकही चिनी कधीच दिसला नाही

आमची त्या प्रांतातील रहिवाशांची पहिली गाठ-भेट आम्ही नदी पार करून दक्षिणेकडे काही मैल गेल्यावर झाली आम्ही कुठलीच पाऊलवाट धरली नव्हती प्रदेशाचा एकंदर अंदाज घेऊन टेकडया शक्यतो टाळून प्रवास चालू होता दूरवरच एखाद ठिकाण निश्चित करायच आणि त्या दिशेन कूच करायच अशी पद्धत ठेवली होती मधेच केव्हा तरी एखादा पूर्व-पश्चिम रस्ता आडवा यायचा

अशाच एका रस्त्यान पश्चिमेकडून एक घोळका येताना दिसला आम्ही दोघानीही वेगात बदल केला नाही तर गाठ-भेट अटळ होती त्यांनी आम्हाला पाहिल आणि आमच्यासाठी थांबले आम्ही जवळ जाईपर्यंत त्यांची आपापसात, अर्थातच त्यांच्या भाषेत, जोरदार चर्चा चालू होती नंतर अचानक गडबड थांबली ते हसले, खाली वाकून आम्हाला अभिवादन केल खाली वाकताना

त्याची नजर मात्र सतत आमच्यावर खिळलेली होती

बारा-तेरा लोक असतील त्याच्याबरोबर एक ऊट, दोन खेचर, दोन गाढव असा लवाजमा होता सर्व जनावरांवर सामान लादलेल होतच शिवाय खोगीरही होती आत्ता मात्र फक्त ऊटावरच सवारी होती एक पाढऱ्या विरळ दाढीचा वृद्ध इसम आरामात ऊटाच्या टेंगळावर बसला होता. घोळका कौटुबिक, नात्यागोत्याचा असावा आणि बुढ्ढा कुटुबप्रमुख असावा सगळ्यांच्या डोक्यावर खास मोंगली, उच टोकाच्या टोप्या होत्या त्याच्या शेपटचा कानावर लोंबत होत्या सर्वांच्या पायावर पोटऱ्या झाकल्या जातील एवढे ऊच, ओबडधोबडच, शिवलेले पण उत्तम कातडयाचे बूट होते बुढ्ढयाचे बूट मात्र विशेष कलाकुसर केलेले होते

वाकवाकून अभिवादनाचा कार्यक्रम शातपणे पार पडल्यावर म्हातारबाबा खाली उतरला तो त्याच्या भाषेत माझ्याशी बोलू लागला मी काही कळत नाही अशी मान हलवली स्मिथ माझ्या कानात म्हणाला ' रशियन बोलून बघू समजते का ?' हे त्या म्हाताऱ्यान ऐकल आणि माझ्या तोंडाकडे बघू लागला

' तुमचे पाय तुम्हाला पुढच्या प्रवासात सुखरूप नेवोत !' मी रशियन-मध्ये म्हणालो

वरेच क्षण कुणीच काही बोलल नाही

थोडया वेळान अतिशय सावकाश, शब्दासाठी चाचपडत, एका वेगळ्याच बोलीत तो बोलू लागला, 'आणखी थोड बोला तुम्ही काय बोलताय ते मला समजतय, पण मला रशियन बोलता मात्र अगदी थोड येत फार वर्षांपूर्वी मी ही भाषा बोलत असे '

मीही मग सथ, प्रत्येक शब्द तोडून बोलू लागलो आम्ही दक्षिणेकडे चाललो आहोत, नुकतीच एक नदी पार केली वगैरे सांगितल आणखी काय बोलायच ते कळेना नतर सगळेच गप्प होते मला वाटल, भेट सपली मग लक्षात आल की, म्हाताऱ्याला आणखी चौकशी करायची होती ओठ हलत होते, पण रशियन शब्द सापडत नव्हते मोडक्यातोडक्या भाषेत सभाषण पुढ चालू झाल

' तुमच्याकडे उट नाहीत ?' – ' आम्ही उट बाळगायला फार गरीब आहोत '

' तुमच्याकड खेचरही नाहीत का ?' – ' नाही ना, आमच्याकडे खेचर सुद्धा नाहीत '

' आणि गाढव ?' – ' नाहीत गाढवही नाहीत

आमच्या उत्तरावरून आम्ही समाजाच्या अगदी तळाच्या थरातील माणस आहोत; अशी त्यान समजूत करून घेतली मग प्रवासाच्या इतर गोष्टी निघाल्या.

त्यात ल्हासाचा उल्लेख आला. त्याबरोबर त्यानं दक्षिणेकडे बोट दाखवल.

'फारच लांबचा प्रवास आहे तुम्ही तिथ पोचेपर्यंत सूर्याच्या अनेक परिक्रमा झालेल्या असतील.'

जो प्रश्न विचारावा अस सारख त्याला वाटत होत, तो त्यानं विचारलाच. तो ख्रिस्तिनाकड कुतुहलान पहात होता तिच्या रापलेल्या चेहऱ्याच्या मानानं तिचे उन्हान कळाहीन झालेले केस विचित्र दिसत होते. तिन आपल्या निळ्या डोळ्यानी त्या म्हाताऱ्याच्या नजरेला नजर भिडवली होती त्यान तिच वय विचारल, आमच्यापैकी कुणाशी नात असल्याची चौकशी केली तिला आम्ही कुठे नेत आहोत, याचीही चौकशी केली. मी अर्थातच आधीच्या टुकलीला दिलेल उत्तर देऊन टाकल

अशा आमच्या विचारगोष्टी सुमारे अर्धा तास चालू होत्या आपल्याला इतरापेक्षा वेगळी परकीय भाषा येते यान फुलून आलेला म्हातारा एकूण खुषीत होता

त्यान वळून आपल्या माणसाशी काही तरी बातचीत केली. त्यावर माना हलवून मडळी हसली आणि खेचरा–गाढवावर बांधलेल्या सामानाकडे गेली त्या बोचक्यांमधून त्यानी खाद्यपदार्थ काढले म्हातारबाबानी आम्हाला सुकी मासळी, आक्रोड, शिजवलेले बार्लीचे दाणे आणि कसलासा केक असा शिधा आपल्या हातान वाटला.

आम्ही कृतज्ञतापूर्वक वाकून त्याचे आभार मानले. मी मला आठवतील तेवढे आभारदर्शक वाक्प्रचार वापरले आमची भेट सपली. प्रवास सुखाचा होवो, अशी दोघानीही प्रार्थना केली त्यात पायाचा उल्लेख आवर्जून होता मगोलियात आमच्या वाट्याला आलेला हा प्रसग आमच्या मनावर कायमचा कोरला गेला त्याचबरोबर हेही मान्य केलं पाहिजे की, मगोलियात नतरही भेटलेली माणस, मग ती कोणत्याही थरातील असोत, अत्यत आदरणीय, दुसऱ्याबद्दल पूर्ण विश्वास बाळगणारी, उदार अत करणाची, पाहुणचाराची उत्तम जाण असणारी होती. आम्हाला मिळत गेलेली मदत ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणे, पण अत्यत मनापासून केलेली असे.

मगोलियात शिरल्याला आता पधरवडा झाला होता. प्रवासाच्या आमच्या पद्धतीत थोडा-फार बदल झाला होता. आता पुन्हा पकडल जाण्याची धास्ती उरली नव्हती त्यामुळ पहारा करण्याची गरज उरली नव्हती. सूर्योदयापूर्वीच चालायला सुरुवात करायची ती सध्याकाळी अधार पडेपर्यंत वाटचाल सतत चालू ठेवण ही नुसती गरज उरली नव्हती, तो आमच्या दिनचर्येचा अविभाज्य भाग झाला होता. दिवसाच्या कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी दुपारी

झळा मारायला लागल्या की, दोन तास सावली पाहून विश्राती घेऊ लागलो होतो

आमच्या या अचाट सुटका-प्रवासात काळ-वेळाच भान ठेवण ही अत्यत अडचणीची गोष्ट झाली होती ही अडचण मगोलियात फारच जाणवू लागली. सैबेरियात सुरुवातीच्या दिवसांत प्रयत्नपूर्वक दिवसाच मोजमाप ठेवण्यात यश आल होत. पुढे जसे दिवस जाऊ लागले तस हे भान सुटत गेल आम्हाला जरी तिथल्या नद्याची, खेड्याची, महत्त्वाच्या ठिकाणाची नाव कळली असती, तरी ती पुढच्या आयुष्यात लक्षात राहाण अशक्यप्राय गोष्ट होती तरीसुद्धा माझ्या अदाजाप्रमाणे, विरळ लोकवस्तीच्या 'आउटर' मगोलियातून 'इनर' मगोलियात यायला आम्हाला सहा ते आठ आठवडे लागले असावेत

एक गोष्ट मला नक्की आठवते गोबीच्या भयाण वाळवटात केलेला प्रवेश हा अगदीच अनपेक्षितपणे झाला नव्हता त्याची चुणुक आधी दोन वेळा मिळाली होती. वाळवटी पट्ट्यातून प्रवास सुरू झाला की वाटायच, सुरू झाल वाळवट पण दोन्ही वेळेला बऱ्यापैकी उचीच्या टेकड्याची राग आडवी आली दुसऱ्या रागेच्या आधारान एक रेताड ओढाही लागला होता त्याच्या सान्निध्यात एक रात्र मुक्कामही केला होता तिथे एकदा घसे ओले केले त्यानतर कित्येक दिवस पाण्याच टिपूसही आमच्या नजरेला दिसल नव्हत.

दुसऱ्या दिवशी सध्याकाळच्या सुमाराला आमच्या काटकोनांत एक काफीला वाट चालून गेलेला दिसला आम्ही त्या बाजूला पाहिल तर तिथ चार मोंगल शेकोटीवर एका लोखडी भांड्यात काही तरी उकळवत बसले होते चौघेही वयान तीस ते चाळीसच्या दरम्यान असावेत

नेहमीप्रमाणे अभिवादनाचा उपचार झाला, पण दुर्दैव म्हणजे आमच्या यजमानापैकी एकालाही रशियन भाषेचा गध नव्हता त्यानी आम्हाला आगो-टीच्या एका बाजूला बसण्यासाठी हातानी खुणावल आणि ज्वाळांच्यामधून ते आम्हाला निरखू लागले.

आम्हाला पूर्वी भेटलेल्यांपेक्षा ही मडळी निश्चितच गरीब दिसत होती. अगरखे यथास्थित रफू केलेले, तुकडे जोडलेले होते त्या चौघांकडे मिळून सामान वाहण्यासाठी एकच खेचर होतं आम्ही खाणाखुणा करून भेटीचा आनद व्यक्त करत असताना त्या लोखंडाच्या किटलीत पाण्याची वाढ करण्यात आली स्मिथच्या पाढुरक्या दाढीकडे पाहून हाच ह्यांचा म्होरक्या असणार, अस समजून त्यांच्या-तल्या मोठ्यान स्मिथकड आपल लक्ष वळवल,

स्मिथन धागा जुळवण्याचा बराच प्रयत्न केला आणि त्या ओघात ल्हास असा शब्द उच्चारला गेला त्याबरोबर त्या मोंगलानं विचार करून आम्ही कोणत्या दिशेला जाव त्या बाजूला अगुलीनिर्देश केला. मग आपल्या जाकिटा-

तून कसलस एक नळकांड काढल, त्यातून स्प्रिंगची मोजटेप काढावी तस एक रेशमी पट्टीच कोडाळ बाहेर काढल. सिनेमाच्या फिल्मवर जशी हारीन सुटी सुटी चित्र दिसतात तशी काहीतरी चित्र त्या पट्टीवर होती नतर बराच वेळ त्यान ती पट्टी अत्यत मनोभावे हाताळली आणि झटक्यात गुडाळून पुन्हा त्या नळकांड्यात सरकवली या सगळ्या प्रकाराचा आम्ही एवढाच अर्थ लावला की, आमचा प्रवास सुखाचा होवो, अशी त्यान प्रार्थना केली असावी स्मिथन खाली वाकून प्रार्थनेचा स्वीकार केला

त्याच्या म्होरक्यान मग काळ्या चहा-पावडरची एक वडी काढली त्यातला एक तुकडा मोडून त्या आधणात टाकला लांब दाडयाच्या लाकडी चमच्यान ते मिश्रण तो ढवळू लागला त्याच्या सुवासान आमच्या नाकपुड्या फुलून आल्या त्यानतर त्यानी एक भाड उघडल माझी कल्पना झाली, त्यात मद्य असावा; पण नतर कळल की, त्यात शिळ लोणी होत. त्यातल थोड त्या मिश्रणात मिसळल मग पुन्हा ढवळल

चहाच्या वाटपासाठी दोन भाडी काढली चहा वाटण्याच्या पद्धतीची आम्हाला गमत वाटली वयोवृद्धांना पहिला मान दोन्हीकडच्या वडिलधाऱ्याना आधी साहजिकच स्मिथचा नवर आधी लागला पालुकोचा नबर त्यानतर लगेच लागला त्यान भाड तोंडाला लावल. पहिला घोट घेतला आणि त्यावर त्यान जो चेहरा बनवला तो प्रेक्षणीय होता पालुकोन स्मिथकड पाहिल तर तो नाईलाजानच पण चहाच कौतुक करत होता. पालुकोलाही झक मारत कौतुक कराव लागल स्मिथन आब राखून आपला कप सपवला

मी आणि ख्रिस्तिनाची पाळी सगळ्यात शेवटची इथल्या लोकाच्या स्त्री-दाक्षिण्याविषयी मी तिची थट्टा करू लागलो तेव्हा ती त्यांचच समर्थन करत म्हणाली, आपण सगळ्यात लहान आहोत ना, म्हणून आपल्याला शेवटी देताहेत तो चहा पिताना सगळे हसून, थट्टा करत, बडबडत होतो आम्ही त्या चहाबद्दल काय काय बोलत होतो ते जर त्याना कळल असत, तर धमाल आली असती प्रत्यक्षात आमची वेळ आली तेव्हा आमची तोड कशी होतात ते पहायला सगळेजण चोरटेपणान उत्सुक होते तिरक्या डोळ्यांनी ते आमच्याकडे पहात होते चहा बऱ्यापैकी गरम होता चव आणि वास, अरारे—आमचे चेहरे अगदी निर्विकार ठेवून तो काढा इतराच्या नजरा चुकवत कसाबसा घशाखाली उतरवला

चहापत्तीचा वास त्या शिळ्या लोण्यान पार धाण करून टाकला होता. चहावर लोण्याचा चिकट तवग तरगत होता ख्रिस्तिनान तर ओकारीच काढायची शिल्लक ठेवली होती. तिची अवस्था पाहून मला हसू दाबता दाबता पुरेवाट झाली. एकदाचे त्या दिव्यातून आम्ही पार पडलो

त्या मोंगलाची शेवटची छोटीशी भेट म्हणून थोडे आक्रोड आणि थोडा तंबाखू नजर केला आम्ही उठून उभे राहिलो निरोप घेतला आणि दूर निघालो. पन्नास–साठ यार्ड जाऊन मागे वळून पाहिल तर ते चौघेही आमच्याकडे पाठ करून पुन्हा बसले तेवढ्या थोड्याशा अंतरात आम्ही एकमेकांच्या आयुष्यातून कायमचे नाहीसे झालो होतो.

आमच्या ल्हासाच्या बिकट वाटचालीसाठी त्यांनी विशेष प्रार्थना केली होती, याची मला कालांतराने तीव्र आठवण आली आम्ही आता भाजून काढणाऱ्या वैराण वाळवटात, गोबीच्या कुविख्यात वाळवटात प्रवेश करत होतो बरोबर अन्न तर नावालाच होत आणि पाण्याचा थेंबही नाही आमच्यापुढे कसली संकट वाढून ठेवली आहेत, याची कोणालाही कल्पना नव्हती असणार तरी कशी ?

□

गोबीच्या त्या भट्टीत, ऑगस्टच्या उन्हाळ्यात, उचसखल वाळवटी प्रदेशात पहिल्या दोन दिवसातच पुढच्या भीषण सकटाची चाहूल मला लागली पृथ्वी-गोलाच्या पूर्व कडेवरून येणाऱ्या पहिल्या सूर्यकिरणानी रात्रीची कडक थडी कुठल्या कुठे पळून जायची सूर्योदयाची किरण वाळूच्या ढिगाऱ्यावर पडून विचित्र सावल्या लाबवर धळीमध्ये पसरायच्या भीती चोरपावलानी आमच्याभोवती फेर धरू लागली आम्ही दोन प्रहरच्या कडाका सुरू होण्याआधी शक्य तितक अतर काटण्यासाठी भराभर पाय ओढत होतो. अधूनमधून आमच्यापैकी कोणी तरी जवळच्या टेकाडावर चढून दक्षिणेकडे नजर फेकायचा आणि दृष्टिपथात यायचा क्षितिजापर्यंत पसरलेला भीषण वैराण वाळवटी प्रदेश ! मध्यान्हीला आम्ही आमच्या काठ्या रुतवायचो त्यावर आमची जाकिट पाघरून जराशी सावली करायचो आणि विसावायचो आमच्या दारुण परिस्थितीची कल्पना सर्वांना आलेली होती; पण कोणी त्याबद्दल तोंडातून ब्रही काढत नव्हता कारण एकच होत. ख्रिस्तिना ! तिच्यासमोर विषय काढून तिच मनोधैर्य खचू द्यायच नाही, या निर्धारान प्रत्येक जण गप्प होता

हवेतील कोरडी उष्णता आमच्या अगातील आर्द्रता शोषून घेत होती पावलामध्ये वेड्या अडकविल्यासारखी शिथिलता येत होती प्रत्येक जण आपल्याच विचारात पाय ओढत राहायचा तोंडातून शब्द फुटायला ताकदच राहिली नव्हती एकापुढे एक यंत्राप्रमाणे दुसर पाऊल टाकायच एवढच शिल्लक राहल होत बहुतेक वेळा मीच आघाडीवर राहायचो कोलो आणि ख्रिस्तिना माझ्याबरोबरच असायची बाकीचे घोळक्याने मागे असायचे पहाटेच्या वेळी प्रयत्नपूर्वक त्यांना

मार्गी लावाव लागत असे. दुपारची विश्रांती कमी करण्याची कधीकधी सक्ती करावी लागत असे

मावळत्या प्रकाशात चालत असताना माझ्या मनात पुन्हा भीती डोकावली. परि मूलभूत, मन खच्ची करणारी शंका डोकावली ! या भीषण जळत्या वैराणात आमचा मृत्यू ओढवला तर—त्यापेक्षा आल्या वाटेनं पुन्हा परत गेलं तर—त्या हिरव्या, ओल्या सुंदर भूप्रदेशाकडे पुन्हा परत गेलं तर—पण नाही अतिशय कठोरपणे तो विचार मी आत गाडून टाकला

रात्री आम्ही धडपडत एका घळीपाशी मुक्काम केला वातावरण थंड झाल तारे डोकावून आमच्याकडे पाहात होते आमच्या खिळखिळ्या झालेल्या थकल्या शरीरामुळं आम्हाला पटकन झोप लागेल असं वाटलं; पण घशाला पडलेली कोरड कोणालाही झोपू देईना प्रत्येक जण कण्हत कसनुसा होत लोळत होता मधेच उठून वेड्यासारखा फेरी मारायचा आणि परतायचा सगळेच जागे असल्याच लक्षात आल आम्ही त्या थंड हवेचा फायदा घेत स्वत ला गोळा करून प्रवासाला सुरुवात केली बरं वाटत होत पहाटे मुक्काम केला दोन तास विश्रांती घेऊन पुन्हा दक्षिणेकडे कसलाही बदल नसलेल्या अथांत क्षितिजाकडे खुरडचाल सुरू झाली.

या एका प्रसंगानंतर आमच्या निशाचाली बंद झाल्या मॅकोन थांबवल्या त्या.

त्यानं मला सरळच विचारलं,' रात्री ताऱ्याच्या सहाय्यान तू आपला मार्ग ठरवू शकतोस काय ?' इतर सगळे माझ्या तोंडाकडे पाहू लागले

बराच वेळ विचार करून मी कबुली दिली. ' खात्रीपूर्वक सांगता येत नाही '

' आपल्यापैकी या पद्धतीची कुणाला माहिती आहे काय ?' त्यानं मुद्दा पुढ चालू केला कोणीच बोलल नाही

' याचा अर्थ आपण रात्रभर चाललो तरी एकाच वर्तुळात घोटाळत रहाण अशक्य नाही ' तो जड आवाजात बोलत होता

त्याच्या बोलण्याचा इतरांवर झालेला विस्मयचकित करणारा प्रभाव मला जाणवला मी विरोध करायचा प्रयत्न केला. असं दाखवून दिलं की, पहाटे सूर्य उगवताना आपली तोंड दक्षिणेकडेच होती म्हणजे आपली दिशा चुकलेली नाही मी हे असं म्हणत असताना माझ्या मनात मॅको म्हणतो तशी शक्यता दिसत होती तेव्हा काहीही असल, तरी शंकेच बी रुजल होत आधीच विकल, हळव्या झालेल्या मानसिक अवस्थेत, त्रास वाढेल असं काहीही करू नये असच वाटलं

त्यामुळं पहाटेच्या मंद प्रकाशात, जडशील वातावरणात पुन्हा मार्गक्रमण

सुरू झाल पश्चिमेकडूनच काय, पण कुठल्याही दिशेन हवा हलल्याचा भाससुद्धा होत नव्हता वातावरणातील अदृश्य धूलीकण आमच्या सर्वांगावर चिपकत होते. दाढचाची अवस्था मध्र नसलेल्या पोळ्यासारखी झाली होती तडकलेल्या ओठाच्या चिरांमध्ये धूळ जाऊन बसली होती भयानक उन्हामुळ आधीच लालवटलेल्या पापण्यावर धूळ बसून त्या एकजीव झाल्या होत्या तरीही पाय ओढतच होतो

अतिशय कडक नियंत्रण ठेवूनही जवळचा शेवटचा अन्नकण पाच दिवसात संपला चौफेर निर्जीव क्षितिज वाढत होत त्या वैराण रखरखीत जगामध्ये झगडणारे आठ मानवी ठिपके आणि मधूनच दिसणारा एखादा साप, एवढीच जीवसृष्टी होती. आम्ही कोणत्याही क्षणी आपली धडपड थांबवून, निपचित पडून, मरूनही जाऊ शकलो असतो ! सूर्य मावळेपर्यंत तात्पुरत्या तंबूच्या आश्रयान विश्रांतिकाळ वाढवण्याचा अनावर मोह होत होता. शरीरात ओलावा नावालाही शिल्लक नव्हता पायाची अवस्था तर अत्यंत केविलवाणी झाली होती झिजून छिद्र पडलेल्या आमच्या मोजड्यांच्या तळव्यांतून भट्टीतल्या वाळूचे कण आत शिरत आणि मरणाप्राय यातना होत शत्रूवरही असा प्रसग येऊ नये अस वाटायच !

सगळ्यांना विश्रांती आवरती घेऊन निघण्यासाठी हल्या हल्या करायला लागायच इथ तर काहीच नाही मागेही काही नाहीये तेव्हा काही असलच तर पुढच असेल नव्हे असणारच ! ख्रिस्तिना, कोलो मला ताबडतोब साथ द्यायचे. मात्र कुरकुरत इतरही उठायचे यंत्रमानवाप्रमाणे आमचा घोळका रखडायला लागायचा माना खाली घातलेल्या कसल्या तरी विचारात, कसल्या ते एक देवालाच ठाऊक ! अशा अवस्थेत एका पावलापुढ दुसर पाऊल ठेवत तासन तास चालायच बस्स एवढच !

सहाव्या दिवशी ख्रिस्तिना धडपडली गुडघ्यावर कोसळली ! तिची तिलाच शरम वाटली 'माफ कर रावीज कशी पडले ते कळलच नाही' ती मदतीशिवायच वाळूत उभी राहिली आणि माझ्याबरोबर पावल ढकलू लागली आश्चर्य म्हणजे त्याच दिवशी दुपारी मीही असाच गुडघ्यावर आदळलो मीच माझ्यावर चिडलो, हे अस काय झाल ? एका क्षणाला मी चालत होतो, दुसऱ्या क्षणाला नमाज पढताना बसतात तसा गुडघ्यावर होतो

मी उठलो माझ्यासाठी कुणीही आपला जो काही होता तो वेग कमी केला नव्हता मला वाटल उठून उभ व्हायला मला बराच वेळ लागला इतराचीही अवस्था माझ्यासारखीच होत असल्याच लक्षात आल सगळेच अधूनमधून ताकद संपल्यासारखे कोलमडायचे आपण कोलमोडलो आहोत हेही लक्षात यायला काही क्षण लागायचे पुन्हा कसेबसे उठायचे आणि मार्गक्रमण सुरू व्हायचे

कुणाचीही सपून जाण्याची इच्छा नव्हती. कार्यक्षमतेचे ताकदीचे शेवटचे कण संपत आल्याच्या खुणा अधिकाधिक भेडसावू लागल्या होत्या यमदूताने आपले हात पसरायला सुरुवात केली होती त्याच्या सावल्यानी डोळे अधारून येत होते. त्या खुणाना मान देण म्हणजे साक्षात मृत्यूला आमन्त्रण, कोणीही इतक्या सहज मरायला तयार नव्हत!

सातव्या दिवशीचा सूर्योदय नेहेमीप्रमाणे गुलाबी, सोनेरी किरणांनी फुलून आला कसलीही आशा न बाळगता कोलोन एक उचवटा चढायला सुरुवात केलेली आम्ही पहात होतो. सपाटीवर चालणही मुष्कील होत, तिथ चढ चढा-यचा म्हणजे काय हाल असतील याची कल्पना करा! रोज सकाळचा हा कार्य-क्रमच होता दूरवरच दिसेल एवढा उजेड झाला की कोणी तरी एकान टेकडा-वर चढायच आणि दक्षिणेकडे काही दिसतय का ते पहायच कोलो वर पोचला कपाळावर पजाच छप्पर करून लांबवर न्याहाळू लागला नेहमीप्रमाणेच वैतागान उडवलेले खादे आम्हाला पहायला मिळतील अस वाटल होत, पण कोलो खाली न उतरता उजव्या हातान खुणा करून काही तरी दाखवू लागला मीही वर गेलो थकलेल्या डोळचाना प्रथम नीट दिसेना डोळे चोळून पुन्हा निरखून पाहू लागलो खरच तिकडे काही तरी होत कसला तरी गडद डाग दिसत होता भुऱ्या रगाच्या वाळूवर वेगळा कळत होता सुमारे पाच मैला-वर असावा सकाळच्या धूसर प्रकाशात ते नक्की काय होत ते ओळखता येत नव्हत, पण काही तरी वेगळ आहे हे जाणवताच जीव उचबळून येऊ लागला

पालुको 'एखाद जनावर असेल काय?'

स्मिथ 'काय असेल ते असो; वाळूचा ढिगारा नक्की नाही काय आहे ते आपण शोधून काढू या!'

त्याच्याजवळ पोचायला जवळपास दोन तास लागले खरच ती झाड होती. अगदी खरीखुरी, हिरवीगार, जिवत, रसरसलेली झाड होती पाढऱ्या टेबलक्लॉथवर शाईचा डाग पडावा तसा त्या भगभगीत वाळूच्या पार्श्वभूमीवर तो झाडाचा पुजका दिसत होता

स्मिथ उत्साहान म्हणाला, 'जिथ झाड आहेत तिथ पाणी असलच पाहिजे!'

'ओएसिस!' कुणी तरी ओरडल 'ओएसिस' हा एकच शब्द सग-ळचाच्या तोंडातून घुमू लागला

ख्रिस्तिना कुजबुजली, 'ही तर देवाची करणी आहे त्यान आपल्याला वाचवलय!'

आम्हाला जर धावता आल असत तर आम्ही धावलोच असतो शेवटचा अर्धा मैल आमचे पाय जितक्या वेगान ओढता येतील तेवढया वेगान ओढल

होतो, धडपडत होतो आडवे होत होतो पाण्यासाठी हपापलो होतो जिभा कोरड्या पडून घशाला सूज आली होती झाड मोठी मोठी होत गेली झाड पामची होती त्यांच्या सावलीत अडाकृती खळगा दिसत होता त्याच्यात नक्कीच पाणी असणार होत शभरएक यार्ड आधी निश्चितपणे मळलेली काफिल्याची पूर्व-पश्चिम वाट दिसत होती झाडाच्या जवळच अत्यत विचित्र वाटणार अस भगारात्त गुदाम असल्यासारख दिसत होत बरीचशी टिनाची डबडी ढिगाऱ्हन पडली होती

सुमारे डझनभर किवा थोडी जास्त अशी ती झाड त्या तळ्याच्या दक्षिणे-कडे चद्रकोरीसारखी वाढली होती त्याची सावली दिवसाचा बराच काळ त्या जलाशयावर पडत असावी त्या निर्मळ थडगार जलाशयाचा काठ खडबडीत दगडानी वाधून काढल्यासारखा दिसत होता तो नवजीवनाची साथ पटवून देणारा हिरवागार परिसर साधारण अर्ध्या एकरात मावला असेल

झारोकडे वाडगा होता, पण त्यात पाणी काढून ते सर्वांना वाटत बसण्या-एवढा धीर होता कुणाला ? आम्ही हपापून पाण्याजवळ पालथे पडलो आणि जनावरांसारखे जिभेने लपक लपक करून जलपान करू लागलो अमृताची चव यापेक्षा वेगळी असेल अस वाटत नाही ! आमची तोड पाण्यात बुचकळून थोडा वेळ पडून राहिलो अगावर पाणी उडवून भाजून निघालेली शरीर थडावू लागलो पाणी पीत राहण्याचा मोह आवरण अशक्य होत. कोणी तरी वेळीच धोक्याचा इशारा दिला, अनशेपोटी एवढ पाणी पिण बर नव्हे ! आमच्या थैल्या पाण्यान थबथबून त्याच्या सहाय्यान आमची भेगा पडून विदीर्ण झालेली पावल हळुवारपणे धुतली त्या पाण्याच्या अस्तित्वान आणि स्पर्शान आमच्या चित्तवृत्ती नव्या उमेदीन फुलून आल्या स्वर्गसुखाची कल्पना यापेक्षा वेगळी असेल काय ? निराशेच्या, भीतीच्या भीषण अध कारातून नवजीवनाचा, आशेचा प्रकाश आमच्याभोवती उजळून निघाला आमच्या हसण्या-खिदळण्याला, गप्पांना नुसता ऊत आला कोणाला शका आली असती की आम्ही जलपानाऐवजी शँपेन झोकली आहे !

आमच्या सुदैवी नशिबान अजून आपल रूप नीट दाखवल नव्हत तळ्याच्या पलीकडे पूर्वेला वीसएक यार्डांवर अजूनही थोडी धुगधुगी असलेल्या शेकोटीचे अवशेष होते नुकताच कुठला तरी उटांचा काफिला इथे मुक्काम करून गेला असावा, असे त्याच्या पावलांच्या ताज्या ठश्यावरून सहज कळत होत बहुधा सूर्योदयाच्या पहिल्या किरणांबरोबर प्रवास सुरू केला असावा. काफिल्यात जी कुणी माणस होती, त्यानी मास खाल्लेल होत कारण त्यातली लहानमोठी हाड त्या जळक्या लाकूडफाट्याजवळ विखुरलेली होती हाडक, त्याना

चिकटलेले मासाचे कण ताजेच दिसत होते एक छोटं आणि एक मोठं जनावर मारलेलं असावं आम्ही हाडकं वाटून घेतली आणि नशिबावर खूष होऊन दातानी त्या हाडावर तुटून पडलो बिचारा बोळका पालुको ! त्यानं माझा सुरा मागून घेतला आणि इतराप्रमाणे मासाचे अवशेष कुरतडू लागला नळ्या फोडून त्यातला गरही आम्ही चोखून चोखून संपवला !

दुपारचे कडक उन्हाचे दोन-तीन तास आम्ही त्या पाण्याजवळच्या गारव्यात, सावलीत स्वस्थ पडून राहिलो सूर्य जरासा कलला, उन्हाची तिरीप डोळ्यांवर आली तशी उठून उभा राहिलो आणि त्याचबरोबर आजूबाजूच वाळवंट सभोवार भगभगू लागलं वाडगा घेऊन पुन्हा अमृतप्राशन केलं स्मिथही उठला आळोखे-पिळोखे दिले आणि तोही माझ्या सोबतीला आला हळूहळू सर्वच जागे झाले आणि इतस्तत बावरू लागले.

'तो कसला ढिगारा आहे ते मी पहाणार आहे' झारो पुटपुटला आम्ही सगळेच पहायला गेलो शहरी जीवनाच्या खुणा दर्शविणारा तो भगाराचा ढीग म्हणजे आजवर कधीही न सुटणारं कोडंच राहिलं आहे गोबीसारख्या वाळवटात त्या ढिगाचं अस्तित्व मती गुग करणारं होतं शभरएक पत्र्याच्या डबड्याचा प्रचंड ढीग होता कसली होती कुणास ठाऊक; पण इतक्या कोरड्याठाक हवामानातही ओळखू न येण्याइतकी गजली होती ती त्या ढिगाच्या खालून वाळूत रुतलेलं पाव इंची जाड तारेचं एक भेंडोळं पालुकोनं खेचून बाहेर काढलं. जाड ताराचे तुकडे बारीक तारेनं एकत्र बांधून ठेवले होते. हात लावताच त्या गजलेल्या बारीक तारांचा भुगा झाला. थैलीत थोडी वाळू घेऊन मूळ तार मी घासून पाहिली गजाचा थर त्या मानानं पातळ होता तार चागल्या अवस्थेत होती त्या तारेचं काय करायचं हे कुणालाच ठरवता येईना हा खजिना आहे हे कळत होतं तो माग सोडून जाणं वेडेपणाचं होतं, पण त्याचा उपयोग काय आणि कसा होईल हे काहीच उमगत नव्हतं शेवटी बऱ्याच चर्चेनंतर बरोबर वाहून नेता येईल अशा आकारात त्याचे तुकडे वळवायचं ठरलं.

त्यानंतर दिवसाचा उरलेला वेळ याच कामात घालवला चार फूट लांबीचे तुकडे तोडले त्याची टोकं 'ट' कारात वळवली आणि गळ्यात सहज अडकवता येतील अशी कडी तयार केली धातू अत्यंत टणक होता सहज तारेचं टोक दोन दगडाच्या फटीत धरायचं आणि कुऱ्हाडीच्या पालथ्या भागानं घण घालून टोक वळवायचं भलतंच अवघड काम ! प्रत्येकासाठी एकेक कडं झाल्यावर झारो आणि इतर एकदोघांनी दोन फुटी आकड्या तयार केल्या एक टोक धारदार आणि दुसरं टोक कमरपट्ट्याला अडकवण्यासाठी वाकवलेलं इतकं झालं तरी तार शिल्लक होती, पण आता फार झालं असं म्हणून उरलेली तार

टाकून दिली एवढ्या श्रमानंतर काही तरी सहकार्य केल्याचा आनंद सर्वांना मिळाला

एक अटळ प्रश्नचिन्ह आमच्या पुढं उभं होतं केव्हा निघायचं ? आमच्या दोन प्रश्नांना उत्तरच नव्हती ओएसिसमध्ये पाणी होतं पण अन्नाचा पत्ता नव्हता आणि पाणी बरोबर न्यायचं तर बरणी नव्हती मॅकोच म्हणणं असं की, इथंच थोडे दिवस राहिलो तर एखादा काफिला मुक्कामासाठी येईल, तेव्हा थोडासा अन्नपुरवठा होऊ शकेल माझं मन मला सांगत होतं की, निघालं पाहिजे मी म्हणालो, 'एका काफिल्याची थोडक्यात चुकामुक झाली आहे यानंतर कदाचित् कित्येक आठवडे कुणी इकडे फिरकणारसुद्धा नाही अन्नाची वाट पहात आपण इथंच खंगून जाऊ आणि प्रत्यक्षात कुणी येईल तेव्हा आपले मृत-देहच त्यांना पहायला मिळतील !' चमत्कारिक परिस्थितीत आम्ही सापडलो होतो काही तरी निर्णय घेणंच प्राप्त होतं इसपार या उसपार ! संध्याकाळी उशीरा निर्णय झाला पहाटेपूर्वीच निघायचं !

पहाट होताच आम्ही निघालो आणि अर्धा दिवस उलटेपर्यंत, मागं वळून पाहताना झाडांचा पुंजका दिसत राहिला क्षितिजावरून त्या आकृत्या नाहीशा झाल्या तेव्हा मी निश्वास टाकला !

त्यानंतरचे आमचे तीन दिवस तुलनेनं झपाट्यानं गेले चौथ्या दिवशी त्या जीवघेण्या झळा अचानक सुरू झाल्या सगळी ताकद शोषली जात होती ओए-सिसच्या आधीच्या प्रकाराची पुनरावृत्ती सुरू झाली अडखळणं, धडपडणं वारंवार होऊ लागलं. वेग मंदावला बोलणं कुजबुजण्यावर आलं मला आठवलं, मॅको म्हणाला होता, 'नरकातसुद्धा इथल्यापेक्षा कमी गरम असेल !'

पाचव्या दिवशी ख्रिस्तिना गुडघ्यावर कोसळली मी हळुवार तिच्याकडे वळून पाहिलं वाटलं, पूर्वीसारखीच पुन्हा उठून उभी राहील, पण नाही तिची हनुवटी छातीवर टेकली होती केशसंभारानं सगळं तोंड झाकलं गेलं होतं. कस-लीही हालचाल होत नव्हती मी आणखी जवळ गेलो ती कंबरेतनही मोडली आणि तोंडावर कोसळली ! त्याच क्षणाला आम्ही जवळ पोचलो आणि तिला उताणी केली. सगळं तोंड वाळूनं माखलं होतं बेशुद्ध पडली होती मी तिच्या अंगरख्याचा गळा मोकळा केला आणि तिला थोडीशी हलवत, हळुवार आवाजात तिला जागं करू लागलो स्मिथनं फुफेंकाचं छत्र तिच्यावर धरून सावली केली.

ती थोड्याच वेळात सावध झाली तिनं आमच्या रिंगण धरलेल्या उत्सुक चेहऱ्यांकडे पाहिलं ओठ विलग करून करूण हसली 'आता बरं वाटतंय मी बहुधा पडले असणार, काय झालं कुणास ठाऊक !'

'काही घाबरू नकोस !' मी तिला धीर देत म्हणालो, 'आपण इथंच थोडी विश्रांती घेऊ म्हणजे सगळ्यांनाच जरा बरं वाटेल !'

ती पुढं वाकली. माझ्या पालथ्या हातावर थोपटून म्हणाली, 'नाही, मी आता पडणार नाही!'

आम्ही तिथच थोडा वेळ बसलो ख्रिस्तिनान आपला पायाचा घोटा खाजवण्यासाठी हात ताणला माझी नजर सहजच तिकड वळली तिचा घोटा प्रचंड सुजला होता, तिच्या विजारीची तळटोक कातडीत रुतल्यासारखी झाली होती

'ख्रिस्तिना, तुला काही चावलय का?'

'नाही बुवा का?'

'तुझा पाय सुजलेला दिसतोय!'

तिन पाऊल जवळ ओढून वळवल म्हणाली, 'अरे, माझ्या तर हे लक्षातच आल नव्हत!'

त्यानतर आम्ही काही तास तसेच पडत-झडत चाललो ती आता जरा बरी वाटत होती थोड्या वेळान ती पुन्हा कोसळली, पण या वेळी तिला हाताचा आधारही घेता आला नाही धाडकन तोंडघशी पडली!

आम्ही सुलटी केली तिच्या नाका-तोंडात घुसलेली वाळू साफ केली पुन्हा सावली धरली तिला नाकान श्वासोच्छ्वास करताच येत नव्हता तोंडान अत्यत केविलवाणा श्वास चालू होता मी तिच्या घोट्याकडे पाहिल तर भयानक दृश्य दिसत होत घोटे अतोनात टर्रर सुजलेले होते विजारीच कापड फाटेल अस ताणल गेल होत मी सुरीन विजार खालून फाडली आणि पाहिल तर पार गुडघ्यापर्यंत पाणाळलेली सूज पसरली होती सूज मी बोटानी दाबून पाहिली आणि त्या बोटाच्या दबलेल्या खुणा नतर बरेच क्षण तशाच दिसत होत्या

ख्रिस्तिना जवळजवळ रात्रभर तरी बेशुद्धावस्थेत होती काही तरी फालतू कारण साॅगून आम्ही एकमेकाच समाधान करत होतो 'उष्माघाताचा बारीकसा झटका असणार!' मी म्हणालो; पण बोलताना माझ्या पोटात शिसाचा गोळा उठला होता मी मनोमन भ्यालो होतो

ती शुद्धीवर आली आणि बरीच ताजीतवानी दिसली 'मला कळतय् की तुम्हाला मी एक लोढण झालीय' ती बोलू लागली, 'काय होतय ते माझ मलाच कळत नाहीये पाय तर भलतेच लठ्ठ झालेयत!'

'ख्रिस्तिना, सुजेमुळ खूप दुखत का?'

छे छे अजिबात दुखत नाही मी इतकी अचाट चाललेय ना म्हणून सूज आली असणार, दुसर काय?'

त्या पाचव्या दिवशी अधार पडेपर्यंत आम्ही चालत राहिलो अधूनमधून पडझड चालूच होती; पण तिन माझ्या आणि कोलोच्या सोबतीन प्रवास चालू ठेवला होता सूर्यास्तानंतर आम्ही मुक्कामासाठी थाबलो आमच्यात बसून

ती अधूनमधून आपल्या पायांकडे पहात होती नी काहीच बोलत नव्हती आणि आम्हीही काही कळल नाही असं भासवत होतो

सहाव्या दिवशी सकाळचे दोन तास हवेत सुखद गारवा होता आणि वाळवटात चालण जितकं सुखाच वाटेल तेवढ वाटत होत, पण थोड्याच वेळात निरभ्र आकाशात सूर्यान आपला ज्ञोतप्रभाव दाखवायला सुरुवात केली·

ख्रिस्तिनाच्या कोपराला स्पर्श करून विचारल, 'या भगभगाटात तू चालू शकशील का ?'

'मला वाटत जमेल मला'

पण याचच मिनिटांनी ती पुन्हा मोडकळून तोंडावर कोसळली पुन्हा एकदा तिच्यावर सावली धरून डोळे उघडण्याची वाट पाहू लागलो अगदी लहान मुलासारखा श्वास चालू असल्यासारख वाटत होत

मी तिच्यापासून जरा दूर झालो बाकीचे माझ्याभोवती जमले मी म्हणालो, 'ती सर्वांगान सुजली आहे हे काय चाललय हे कुणी जाणू शकत का ?'

या असल्या लक्षणाचा अर्थ कुणालाच ठाऊक नव्हता· आम्ही पुन्हा तिच्याजवळ गेलो आणि वाट पहात थाबलो माझ्या टोपीन तिला वारा घालू लागलो

तिन पुन्हा एकदा डोळे उघडले म्हणाली, 'माझा तुम्हाला खूप त्रास होतो आहे ना ?' आम्ही नाकारार्थी माना हलवल्या ती क्षीण आवाजात पुढे म्हणाली, 'मला वाटत तुम्ही मला इथेच सोडून जाव !'

खूप त्रास होतो आहे ना ?' आम्ही नकारार्थी माना हलवल्या ती क्षीण आवाजात पुढे म्हणाली, 'मला वाटत तुम्ही मला इथेच सोडून जाव !'

आम्ही सर्वांनी एकाच वेळी निषेध नोंदवला. कोलो तिच्याजवळ ओणवा झाला 'अस काही तरी बोलू नकोस, वेड्यासारख करू नकोस पोरी, आम्ही तुला सोडून कुठेही जाणार नाही !' ती तशीच आणखी अर्धा तास पडून राहिली. उठायचा तिन केविलवाणा प्रयत्न केला, पण तो जमलाच नाही पुन्हा कोसळली !

मी कोलोला म्हणालो, 'आपण आधार देऊ या !' आम्ही तिला उचलून उभी केली 'तुम्ही धरून चाललात तर मी चालू शकेन !' ती म्हणाली

आश्चर्य म्हणजे तिला चालता येऊ लागल, मी आणि कोलोन तिचे वखोटे धरले होते दोनएक फर्लांगानतर ती पुन्हा पडते की काय अस वाटल तिला पुन्हा नीट आधार दिला. चाल पुढे सुरू झाली तिची मनाची उभारी फार मोठी होती कसलाही हुकार नव्हता, कण्हण नव्हत शक्यतो ताठ चालायचा ती प्रयत्न करत होती यानतर ती जेव्हा कोलमडली तेव्हा आम्हीही तिला साभाळू

शकलो नाही तिच्या मानसिक आणि शारीरिक ताकदीचा शेवटचा कण सपला होता आता कसलीही हालचाल करायला ती सपूर्ण असमर्थ होती सूर्य माथ्यावर आला तरी आम्ही तिच्याभोवती घोळका करून उभेच होतो. शेवटी मी आणि कोलोन एकमेकाकडे पाहिल दोघानी तिला झोळीसारख अर्धवट उचलल आणि पुन्हा चालायला सुरुवात केली त्या अवस्थेत मैलभर जाऊ शकलो. मग माझीही ताकद सपली तिला खाली ठेवल आणि श्वासासाठी मी झगडू लागलो

आम्ही तिथेच निवारा केला आणि त्या दिवसाचे सगळ्यात भडक उन्हाचे तीन तास आम्ही तिथच काढले ती निपचित, कसलीही हालचाल न होता तिथ पडून होती तिची ओंगळवाणी सूज आणखी पसरली होती. सूज पाण्यान पूर्ण बदबदली होती

सूर्य जरासा कलला आणि कोलोन तिला झोऱ्यात वर उचलली आणि चालायला सुरुवात केली. मी त्याच्याबरोबर आणि बाकीचे आसपासच होते. पाव मैलानतर त्यान तिला खाली ठेवली, मग पुन्हा उचलली एखाद्या लहान मुलाला उचलाव तस कोलोन तिला उचलल होत. तिच डोक कोलोच्या रुद खांद्या-वर विसावल होत अत्यत काळजीपूर्वक तिला तो वाहून नेत होता. त्या धिप्पाड नरपुगवान त्या कोकराला ज्या पद्धतीन कुशीत घेतल होत ते दृश्य मी आयुष्यात कधीही विसरणार नाही ! निदान चार तास तरी ही भयानक वाटचाल सुरू होती. ती त्याच्या गालाला स्पर्श करून हळूच म्हणाली, ‘ कोलो, मला आता जमि-नीवर ठेव ना, प्लीज मला आता नुसत पडून राहू दे ।’

मी आधार दिला आणि दोघानी तिला हळुवारपणे जमिनीवर ठेवली आम्ही भोवती गोळा झालो. तिच्या विलग झालेल्या ओठांमधून एक स्मितरेषा हळूच डोकावली आमच्या सगळ्याकडे तिन आळीपाळीन आपले स्वच्छ निळे डोळे फिरवले अतिशय शात दिसत होती तिन हळूच आपले डोळे मिटले

पालुको म्हणाला, ‘ पोरगी फार फार थकून गेलीय. गरीब बिचारी ! ’

अत्यत हताशपणे, आता पुढ काय करायच हे न कळल्यामुळ नुसतेच घोळका करून उभे होतो कोलोचे खादे अतिश्रमामुळ लोंबल्यासारखे दिसत होते. एक-मेकाकडे नजरा टाकत होतो, पण कुणीच काही बोलायच्या परिस्थितीत नव्हत. मी खाली ख्रिस्तिनाच्या उघड्या डोळ्याकडे पाहिल आणि क्षणात वाकून तिच्या छातीला कान लावला कसलाही ठोका ऐकू येत नव्हता माझा विश्वासच बसेना मी दुसरा कान लावला तरीही काही नाही ! मी मान वर करून तिच क्षीण मनगट हातात घेतल नाडीचा पत्ता नव्हता. सगळे माझ्याकडे अपेक्षेन पहात होते. मी तिचा हात सोडला मात्र, धप्पदिशी तो जमिनीवर पडला !

अमेरिकन स्मिथन काही बोलायचा प्रयत्न केला. मला उत्तर द्यायच होत; पण शब्दच फुटेना ओघळले फक्त अश्रू ! खारट थेंब माझ्या डोळ्यातून वाहू

लागले सगळे बांध फुटून मी प्रचंड हुंदके देऊ लागलो. इतरांनाही आपल्या भावनांना थोपवणं अशक्य होतं त्या दैवदुर्लक्षित भूमीवर आम्ही सात पुरुष धाय मोकलून मनसोक्त रडलो आम्हाला सगळ्या जगात जीव की प्राण असलेला एक कोवळा जीव आमच्यापासून हिरावून घेतला गेला होता ख्रिस्तिनाची ज्योत कायमची विझली !

अमेरिकन स्मिथनं प्रथम आवर घातला 'मित्रांनो, आपण आता कुणालाही दोष देत बसण्यात अर्थ नाही ती आपल्याबरोबर अत्यंत सुखात होती आपण आता तिचं दफन इतमामानं पार पाडू या ।'

जवळच एका घळीच्या तळाशी एक खड्डा खणला खणताना वाळूतले गोटे बाजूला काढून ठेवले तिला अलगद उचलून आत निजवली तिच्या छातीवर तिचा छोटासा क्रूस होता आमच्या टोप्या हातात घेऊन खड्ड्यासमोर उभे राहिलो शेवटची प्रार्थना म्हणायला कुणी पाद्री आमच्यात नव्हता प्रत्येकानं आपापल्या भाषेत आपल्या पद्धतीनं अत्यंत मनोभावे करुणा भाकली तिच्या आत्म्याला शांती लाभो अशी प्रार्थना केली स्मिथ प्रथमच इंग्लिशमध्ये बोलत होता थरथरत्या हातांनी आम्ही तिच्या पार्थिव देहावर वाळू लोटली आणि सगळा खड्डा झाकून टाकला तिच्या समाधीची जागा कळण्यासाठी बाजूला ठेवलेले गोटे नीट सभोवार रचले

कोलोन तिचीच काठी उचलून टोकाचा एक तुकडा तोडला जवळच्या एका चामड्याच्या वादीनं तो मोठ्या तुकड्याला बांधून क्रूस तयार केला आणि तिच्या थडग्यावर रोवून ठेवला आम्ही तिचा साश्रु नयनांनी शेवटचा निरोप घेतला आणि आमच्या मोकळ्या वाटेनं चालायला सुरुवात केली.

विचित्र गोष्ट अशी होती की, त्या पोरीशिवाय दुसरा कसलाही विचार डोक्यात रहात नव्हता चालणंही अत्यंत क्लेशदायक सवय झाली होती. त्या प्रक्रियेसाठी कसलाही विचार करण्याची गरज नव्हती तासनतास भणाणणाऱ्या उन्हामुळं मेंदू सडायची वेळ आली होती डोक्यात घण बसायचे, विचाराची शृंखला अचानक तुटायची; तरीही माझ्या लक्षात असं आलं की, ती अजूनही माझ्या मागोमाग येते आहे, या समजुतीनं मैलच्या मैल, पावलं न उचलता चालत होतो, पण केव्हा तरी अशी वेळ यायचीच की तिला पहाण्याकरता म्हणून मान मागं वळायची आणि तिचं नसलेपण सुरीसारखं घुसायचं, मन विव्हळायचं त्या दिवशीची रात्र अत्यंत त्रासदायक, तहानलेल्या अत्यंत विकल अवस्थेत काढली. ती अजूनही आपल्याबरोबर आहेच असंच मन सांगायचा प्रयत्न करत होतं आणि तिच्या मृत्यूची प्रत्येक ताजी जाणीव पुन्हा वेदनांचा कल्लोळ ...

जायचा।

ख्रिस्तिनाच्या आठवणीची धार कमी होण्यासाठी आणखी एक शोकान्त व्हावा लागला.

ओएसिसमधून निघाल्याच्या आठव्या दिवशी मॅको वाळूत तोंडघशी पडला. पडताना काठीचा आधार घेण्याचही भान त्याला उरलं नव्हत लाकडाचा ओंडका पडावा तसा पालथा पडला दोन्ही हात बाजूलाच राहिले आम्ही त्याच्याकडे पाहिल आणि त्याच ओळखीच्या ओंगळ खुणा दृष्टीला पडल्या मोजडीचा वरचा पोटरीचा भाग गुबगुबीत दिसत होता त्याला उताणा केला आणि थैलीन वारा घालायला सुरुवात केली लवकरच तो शुद्धीवर आला उठून उभा राहिला मान दोन्ही बाजूला झटकली आपली काठी उचलली आणि चालायला लागला चाल धड नव्हती पुन पुन कोसळत होता, पण दिशा पुढं जाण्याची होती पायावरची सूज क्षणोक्षणी वर चढत होती

पहिल्या आघातानंतर मॅकोन ख्रिस्तिनापेक्षा जास्त वेळ तग धरली नवव्या दिवशी दोन तासांच्या अवधीत निदान अर्धा डझन वेळा तरी तो कोसळला।

त्या रात्री त्याला फार शांत झोप लागली असावी अस वाटत होत दहाव्या दिवशी सकाळी नुसता जिवत होता अस नाही तर त्याची ताकद परत आल्यासारख वाटू लागल, पण ज्योत विझताना अधिक तेजान झळाळते तसला प्रकार होता। आमच्याबरोबरच तोही निघाला, पाय ओढतच, पण इतर कशाचाही आधार न घेता सुमारे अर्ध्या तासान पहिल्यादा ढासळला त्यानतर त्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ लागली न राहवून मी आणि कोलोन त्याला आधार दिला दुपारच्या विश्रांतीच्या वेळेपर्यंत त्याचा नुसताच लळालोंबा झाला होता। आमच्या खांद्यावरून एखाद्या झोळीसारखा फरफटत होता स्मिथ आणि पालुकोन आमचा भार हलका करून त्याला खाली बिसावल जाकिटाची सावली केली आणि त्याच्याभोवती बसून राहिलो तो निश्चेष्ट पडून होता फक्त त्याचे डोळे तो जिवत असल्याच सांगत होते

थोड्या वेळान त्यान डोळे मिटले मला वाटल तो संपला, पण नाही, श्वास चालू होता त्यान पुन्हा डोळे उघडले आणि लगेच पुन्हा न उघडण्यासाठी मिटले गेले संपल। कसलाही आचका नाही, झटका नाही आत्मा मुक्त होताना शरीरान कसलीही हालचाल केली नाही ख्रिस्तिनाप्रमाणच मॅकोजवळ शेवटचे म्हणून उच्चारायला शब्दच नव्हते।

चित्रगुप्ताच्या नोंदवहीतल एक खात बद झाल. त्याच पूर्ण नाव सिगमण्ड मॅकोवस्की, वय ३७, पोलडच्या लष्करातला माजी कॅप्टन पोलडमध्ये कुठ तरी त्याची पत्नी आहे तिच्या नवऱ्याच्या मनोधैर्याबद्दल, शौर्याबद्दल तिला कळवायची माझी इच्छा आहे आम्ही त्याच मानान दफन केल कोलोन पूर्वी-

सारखीच काठी तोडून क्रूस तयार करून, थडग्यावर रोवला मागल्याप्रमाणेच प्रार्थना म्हटल्या आणि त्याच्या कलेवराचा आम्ही निरोप घेतला !

मी दिवसांचा हिशेब ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतो अन्न-पाण्यावाचून माणूस किती काळ जिवत राहू शकतो याचा उल्लेख कुठे वाचला होता की काय हे आठवायचा प्रयत्न करत होतो उष्माघाताचा झटका कोणाला केव्हा येईल, ते सागता येत नव्हत केव्हा तरी निराशेचे काळोखे ढग मनावर अकस्मात दाटून यायचे आणि तीव्रतेन जाणवायच की आपण उरलेले सहाजण-सुद्धा सर्वनाशाकडे अटळपणे चाललो आहोत ! प्रत्येक निराशाजनक पहाटे हाच विचार उफाळायचा वाटायच, यानतर कोणाची पाळी ? सहा मानवी सांगाडे वाळू पिसल, पाय ओढत वाटचाल करत होते कुठल्या दिशेन ? कुणास ठाऊक ! वाळू अधिकच भुसभुशीत होऊ लागली आम्हाला पाय ओढूच द्यायचे नाहीत अस जणू त्या वाळून निर्धारान ठरवल होत कोणीही पडल, की काही झालच नाही असा देखावा करून उठून चालायला लागायचा. आता आम्ही उघडपणे पायांवर त्या ओंगळवाण्या सुजेच्या खुणा दिसतात की काय ते तपासू लागलो मृत्युघटेच्या खुणा निरखू लागलो

मृत्यूच्या छायेत वावरताना कधी नव्हे ते मनान एकमेकांच्या अत्यत जवळ आलो. आपण निराश झालोत हे दाखवायला कुणीही तयार नव्हत भीतीच, उच्चारही कुणी करत नव्हत एकच विचार मोठ्यान बोलला जात होता, तो म्हणजे जवळपास कुठ तरी पाणी असलच पाहिजे ! त्या एकाच आशेवर आम्ही जिवत होतो प्रत्येक घळीमध्ये सुंदर पाण्याचा ओहोळ वाहातोय अशी आम्ही कल्पना करायचो आणि ते मृगजळ ठरल तरी त्यानतर पुन्हा तशा अनेक पाण्यान भरलेल्या घळी होत्या आम्ही जिवत होतो ते त्या कल्पनारम्य पाण्यामुळ !

सबध वाळवटात जर इतर कुठली जीवसृष्टी आढळली असेल तर ते म्हणजे साप ! वाळूतल्या बिळात सर्वांग लपवून नुसती तोंड बाहेर ठेवून बघत असा-यचे. ते जिवत कसे रहात असतील हे एक आश्चर्यच होत. त्यांना आमची जराही भीती वाटत नव्हती आणि आम्हालाही त्यांना त्रास देण्याची इच्छा होत नव्हती !

## गोबीच्या वाळवटाचा शेवट

मॅकोच्या निधनानतर दोन दिवसात सगळ्यांची सहनशक्ती सपुष्टात आली होती जर काही दैवी क्रिया घडली तरच निभाव होता, एरवी सा सपतच आल होत आणि खरोखरच ती किमया घडली अकस्मात वाळून गेलेल्या तळ्याचा शोध लागला थोडस खणल्यावर चिखलयुक्त पाणी सापडल जीवा

तात्पुरता का होईना वाचवण्यासाठी ते पुरेसं होतं. तहान भागली, पण भुकेचं काय ?

स्मिथ म्हणाला, 'साप खाणं एवढाच उपाय दिसतोय मला. बरं, माणसानं साप खाणं ही काही फार अभूतपूर्व गोष्ट नाही. त्याचं वीष हे तोंडाजवळच्या एका पिशवीत असतं. तेवढं जर वेगळं केलं तर साप खायला काहीच हरकत नाही !'

सहाजिकच ही गोष्ट अमलात यायला फार वेळ लागला नाही. लगोलग दोन साप प्रयत्नपूर्वक पकडले आणि त्यांचा फन्ना उडाला ! वाळवंटाच्या पुढल्या प्रवासात आमचे जीव वाचवले ते या सापांनी !

किती दिवस सरले कुणास ठाऊक, पण एका सकाळी आमच्या आशा पल्लवित करणारा शोध लागला. दक्षिणेकडचा प्रदेश उंचावत गेला होता आणि सुमारे पन्नास मैलावर असलेल्या पर्वताचा तळ टेकड्यामध्ये विलीन झाला होता. ते दृश्य पहाताच आमच्या नसा आनंदानं फुगून तट्ट झाल्या.

आमचं आशियाच्या भूगोलाचं ज्ञान अगाध होतं. उंच पर्वत दिसताच तो हिमालय असावा. दिशेत थोडी चूक झाल्यामुळं तो थोडासा पूर्वेकडे राहिला असावा आणि तो हिमालय म्हणजेच आपण भारताच्या अगदी उंबरठ्यावर आहोत, असंच आम्हाला वाटायला लागलं होतं; पण आमचा मूर्खपणा जरा उशीरा लक्षात आला. हिमालय आणि आम्ही यात तिबेटचा अत्यंत किचकट डोंगराळ प्रदेश अस्ताव्यस्त पसरला होता.

त्या डोंगरापर्यंत पोचायला तरी आम्हाला दोन दिवस रखडावं लागलं. भुसभुशीत वाळू संपून घट्ट जमीन पायाला लागली, तेव्हा वाळवंट संपल्याची सुखद जाणीव झाली. त्या बारक्या खडकाळ डोंगरावर चढायला सुरुवात करण्याआधी चांगली दोन तास विश्रांती घेतली. पायातल्या मोजड्या काढून, वाळू काढून टाकली आणि चढणीवर पाऊल ठेवलं. गोबीचं भीषण वैराण वाळवंट अखेर आम्ही पार केलं होतं.

चढ सुरू झाला. चढणीच्या पलीकडे कुठे तरी पाणी असेल अशी वेडी आशा मनाला होती. पण निराशेशिवाय काहीच पदरात पडलं नाही. पलीकडे उतरलो तर नुसतीच अस्ताव्यस्त पसरलेल्या खडकांची दरी होती. तिथेच रात्र काढली. सकाळी पुन्हा दुसरी चढण सुरू. माथ्यावर पोचायला बरेच तास लागले. पलीकडे पुन्हा एक दरी. पूर्वेकडे दिसणारी पर्वताची रांग जास्तच उंच भासू लागली. दरीत वाळू पसरलेली दिसत होती. साप मिळण्याची आशा होती म्हणून अंधार पडण्याआधी दरीत उतरायची इच्छा होती.

आमचं नशीब बलवत्तर म्हणून त्या झऱ्याची आणि आमची चुकामूक झाली नाही. आम्ही सगळे उतरणीवरच होतो. आमच्या लक्षात आलंच नव्हतं

पण झारोन, काय वाटल कुणास ठाऊक, मात्र वळून पाहिल आणि आनदातिशयान आरोळी ठोकली, 'पाणी !' आम्ही सगळ्यांनीच माग वळून पाहिल खरच, एक गोलदार खडकाच्या बाजून करगळीएवढी धार चांदीसारखी लखलखत, पडत होती आम्ही सगळे धडपडत अधाशीपणे त्या जागेजवळ पोचलो हाताची बोट शिरतील एवढ्याच एका फटीतून ते निर्मळ, स्वच्छ थडगार पाण्याचे थेंब ओघळत होते ते जिथ पडत होत तिथून त्याला एक बारीकसा मार्ग करून दिला आणि आमच्या टिनपाट डबड्यात साठवायला सुरुवात केली. ते अमृततुल्य पाणी आम्ही अधाशासारख प्यालो त्या डबड्यान आम्हाला फार फार मदत केली होती. त्या वेळी दुपार होत होती आणि एकमतान अस ठरल की, आणखी एक दिवस या पाण्याच्या अवतीभवतीच काढायचा

दुसऱ्या दिवशी सकाळी तो डोंगर-उतार, गरमागरम दरी पार करून पुढच्या डोंगरचढणीवर येऊन ठेपलो होतो साधारण पधराएक मैलाची रपेट झाली असेल, माथ्यावरून पुन्हा दिशेचा अदाज घेतला अगदी समोर गेलो असतो तर प्रचड उची गाठावी लागली असती, तेव्हा थोडी दिशा बदलून अग्नेयेला दहा अश कोन साधून जरा कमी उचीचा प्रदेश पायांखाली घेतला सध्याकाळच्या सुमारास हृदय आनदान उचबळून आल ओएसिस सोडल्यावर इतक्या दिवसानतर प्रथमच वनस्पतींच दर्शन झाल होत खडकामध्ये खोचून बसविल्यासारखे टोकेरी गवताचे पुजके दिसू लागले

पण दमछाक करणारी रपेट दिवसामागून दिवस चालूच होती अन्नासाठी अजूनही सापांवरच अवलबून राहाव लागत होत पाहिला साप खाल्ल्यापासून जवळपास तीन आठवडे तेच आमच अन्न झाल होत तहानेची गरज मात्र मधून मधून भागत होती मधूनच लागणारे झुळझुळणारे झरे आमची तहान भागवत होते पाण्याशिवाय दिवस गेला अस होत नव्हत.

त्यानतर एका प्रसन्न सकाळी एक डोंगरमाथा गाठला आणि पलीकडे दरीत नजर टाकली आणि हृदय भरून आल हिरवगार गवत दरीत जिकडे तिकडे पसरल होत त्याहीपेक्षा चित्तथरारक गोष्ट तिथ होती. शभरएक मेंढर बारीक ठिपक्यासारखी इतस्तत चरत हिंडत होती आम्ही झपाट्यान उताराला लागलो व तो कळप पाच मैल दूर असेल नसेल तोच दोन काळी जातीचे लांबलचक, केसाळ धनगरी कुत्रे दिसले आम्हाला पहाताच कळपाला वळसा घालून लाव ढेंगा टाकत कळप आणि आम्ही याच्यामध्ये उभे राहून ते गुरगुरू लागले

झारोन आपल्याच भाषेत त्याना समजावल, 'काही घाबरू नका मेंढराना आम्ही काही करत नाही तुमचा मालक कुठाय ?'

कोलो तेवढ्यात गुरगुरला 'आयला, त्या मेंढरांच्या जरा जवळ जायला

मिळाल तर, तर या कुऱ्हाडीच्या एकाच फटक्या .'

'कोलो, अरे एवढा उतावीळ होऊ नकोस मालकानेच बहुधा आपल्याला अटकाव करण्यासाठी त्या कुत्र्याना पाठवल असाव' अस मी म्हणालो 'आपण या कळपापासून दूर जाऊ या कदाचित त्यामुळे ते कुत्रे आपल्याला मालकाची दिशा दाखवतीलही '

आम्ही दिशा बदलून कळपापासून दूर जाऊ लागलो त्या श्वानांनी आमच्याकडे नीट पाहिल त्यांच बहुधा समाधान झाल असाव त्यांनी तोंड फिरवली आणि दरीच्या समोरच्या उताराकडे भरधाव सुटले, त्यांच्या धावण्याच्या दिशेकडे माझी नजर गेली आणि आश्चर्याचा धक्काच बसला. तिकडे बोट दाखवून मी ओरडलो तिकडे धुराच वलय हळूच वर उठताना दिसत होत.

मार्विनको उत्साहान एकदम म्हणाला, 'दुपारच्या वेळी धूर याचा अर्थ तिथ काही तरी शिजतय '

खडकाच्या आडोशाला ती आगोटी पेटलेली होती त्या खडकाला लागूनच एकावर एक दगड रचून एका माणसाला पुरेल एवढा निवारा केलेला होता तिथ एक म्हातारा बसला होता त्याच्या बाजूलाच ते मघाचे कुत्रे ल्हा ल्हा करीत बसले होते तो कुत्र्याना उद्देशून काही तरी कुजबुजला त्याचा अर्थ समजून ते कुत्रे पुन्हा त्या कळपाकडे सुसाट गेले त्या आगोटीवर ठेवलेल्या बीडाच्या किटलीतून वाफ येत होती

स्मिथ ओणवा होऊनच पुढे गेला आणि त्यान अभिवादन केल तो म्हातारा हसतच उठला. खाली वाकून त्याला आणि नतर आम्हाला आळीपाळीन अभिवादन करता झाला

म्हाताऱ्याची गालफड बरीच उचावलेली होती पाढऱ्या दाढीच्या आजूबाजूला दिसणारी त्याची कातडी उन्हान करपून काळपट लाल झाली होती डोक्यावर शेळीच्या कातड्याची टोपी तिच्या कनाती पूर्वी भेटलेल्या मोंगलासारख्याच होत्या तशाच वर वळवलेल्या होत्या पायात घट्ट लोकरीचे छान शिवलेले बूट. त्याला जाडजूड चामड्याचे तळवेही होते गुडघ्यापर्यंत लोंबत असलेला त्याचा उघडा, मेंढराच्या कातड्याचा कोट, एका वळलेल्या लोकरीच्या दोरीन एकत्र ठेवला होता पाच फुटी दाडक्याचा आधार घेऊन तो उभा होता त्याच्या मैत्रीपूर्ण वागणुकीबद्दल शकाच नव्हती. अचानक आलेल्या पाहुण्यांमुळे त्याला झालेला आनद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

तो खूप उत्साहान बोलत होता पण एक–दोन मिनिटांतच त्याच्या लक्षात आल की, त्याचा एकही शब्द आम्हाला ढिम्मसुद्धा कळत नव्हता मी रशियन बोलायचा प्रय न केला त्यावर त्याचा चेहरा आमच्याइतकाच निर्विकार राहिला.

सभाषण होऊ शकत नाहीये, आपल्याला बाहेरच्या जगातली काही बातमी मिळत नाहीये, याच दुःख त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत. मला वाटत तो अस सागायचा प्रयत्न करत होता की त्यान आम्हाला खूप लावून पाहिल होत आणि आमच्यासाठी त्यान काही तरी अन्न शिजत ठेवल होत त्यान आम्हाला शेकोटी-भोवती बसायला विनवल आणि आमच्या येण्यामुळ थांबलेल त्याच भाड्यातल ढवळण पुन्हा सुरू झाल मी आडोशात सहज डोकावून पाहिल. आत फक्त एकाच माणसाला झोपता येईल एवढीच जागा होती आणि एकच छोटीशी चटई अथरली होती.

आपल्या मोठ्या लाकडी चमच्यान ते कढण ढवळता ढवळता त्यान पुन्हा सभाषण चालू करायचा प्रयत्न केला, पण उहू काहीच जमेना स्मिथन घसा साफ करून हाताच्या खुणाचा उपयोग करत आम्ही सगळे ल्हासाला जाणार आहोत अस सांगितल

त्यातला 'ल्हासाला' हा शब्द बरोबर पोचला होता स्मिथन ल्हासाचा पुनरुच्चार केला, त्याबरोबर त्या धनगरान आपल्या अगरख्याच्या आत हात घालून एक प्रार्थनाचक्र बाहेर काढल ते त्यान बरीच वर्ष जपून ठेवलेल असाव. त्यावर काही धार्मिक खुणा कोरलेल्या होत्या या चक्रान सूर्याकडे निर्देश करून, गोलगोल हात फिरवला, बरेच वळसे दिले

मी म्हणालो, 'आपल्याला ल्हासाला पोचायला किती दिवस लागतील ते सागायचा तो प्रयत्न करतोय.'

त्याचा हात तर पवनचक्रासारखा भिरभिरत होता च्यामारी, भलतच लाब दिसतय ल्हासा इथून

त्यान पुरवलेल्या माहितीबद्दल आम्ही त्याचे आभार मानले त्यान आपल्या खिशातून एक मिठाची थैली काढली आणि त्या कढणात घालता घालता आम्हाला त्या कढणात डोकावून बघायला सागू लागला आम्ही घोळका करून पाहू लागलो आत करड्या रगाच घट्टसर कढण उकळत होत त्यान पुन्हा ढवळल त्यातलं एक चमचाभर बाहेर काढल फुकर घातली, चाटून चव पाहिली आणि खूष होऊन जीभ ओठावरून फिरवली

त्यान आमच्याकडे पहात डोळे मिचकावले आणि मजेशीर मिटक्या मारल्या त्याचा गमत्या स्वभाव पाहून आम्हीही हास्यविनोद करून खेळकर वातावरणात भर घातली फार दिवसांनी असा मोकळेपणा लाभला होता.

त्याचे विदूषकी हावभाव चालूच होते काही तरी धार्मिक विधी केल्याच्या आविर्भावात त्याने खोपटातून कापडाची गुडाळलेली कसली तरी वस्तू आणली आणि एखादा गारुडी जस वातावरण निर्माण करतो, तस गूढ वातावरण करत, तो मधेच डोळे मिचकावत त्यात काय असेल ते ओळखायला आम्हाला उद्युक्त

करत होता शेवटी त्यानं त्यातून एक सुरेख कोरीव लाकडी वाडगा काढला. पाच इंच व्यास आणि तीन इंच खोलीचं भांडं होतं ते फारच सुंदर कारागिरी होती.

त्या वाडग्यात त्यानं ते कढण डावलीनं काढलं. तो वाडगा खाली कातड्यावर ठेवला आणि आतमध्ये जाऊन मातीचा खुजा घेऊन आला त्यामध्ये मेंढीचं दूध होतं त्यातलं थोडंसं त्या वाडग्यात घालून, शेजारीच बसलेल्या झारोकडे त्यानं तो वाडगा दिला

झारोनं त्यातलं चमचाभर चाखलं आणि आपल्या खास पद्धतीनं जीभ आणि ओठांची मजेशीर लपलप केली आणि वाडगा पुढच्याला देऊ लागला. म्हाताऱ्यानं खुणेनं सुचवलं ते सगळं एकट्यासाठी आहे झारोनं अत्यंत चवीनं पण झटक्यात ते संपवलं आणि तृप्त होत म्हणाला, 'आयला, भलतंच झकास आहे!'

त्यात बहुधा बार्ली आणि कसली तरी चरबी होती त्यात गोड, ताजं दूध मिळाल्यावर माझा वाटा मी मोठ्या आनंदानं मिटक्या मारीत संपवला. खरंच ते प्रकरण झकास होतं

सगळ्यांना पुन्हा एकवार वाटप करून मग त्या धनगरानं आपला वाटा संपवला नंतर ते किटलीवजा भांडं आगोटीवरून थंड होण्यासाठी खाली उतरवलं त्याला कडी नसल्यामुळे उतरवताना त्याला जरा त्रासच झाला त्या भांड्याला पूर्वी केव्हा तरी कडी असावी कारण त्यासाठी केलेली दोन भोकं दिसत होती त्यानंतर त्यानं जी वस्तू आम्हाला नजर केली, त्यामुळं तर आमच्या आनंदाला पारावार उरला नाही तंबाकू होता तो प्रत्येकाला दोन-तीन सिगारेटी तयार करता येतील एवढा त्यानं वाटला कागदाचे जे काही कपटे शिल्लक होते त्याच्या विड्या करून धूम्रपानाचा आनंद मनमुराद लुटला

आमच्या यजमानानं केलेल्या आमच्या स्वागतानं आम्ही अगदी गहिवरून गेलो होतो तोही आमच्याकडे कृतकृत्य नजरेनं पाहात होता तिथली थोडी साफसफाई करण्यासाठी आम्ही त्याला मदत करू लागलो, तर कशाला हात लावू देईना त्यानं पुन्हा आगोटी पेटवून आमच्यासाठी चहा तयार केला खास तिबेटी रसायन होतं या वेळी मात्र आम्हाला त्यात तरंगणाऱ्या चरबीच्या गुठळ्यांची मागच्यासारखी किळस आली नाही

त्यानं आमच्यावर केलेल्या उपकाराची थोडीशी परतफेड करावी म्हणून कोलोला म्हटलं की, आपण त्याला किटलीसाठी एक कडी करून देऊ या. सर्वांनाच ती कल्पना पसंत पडली लगेच कामाला लागलो आमच्याजवळच्या तारेचं एक कडं तोडून, वळवून त्याची कडी केली आणि किटलीला अडकवून दिली ते पाहून तो कमालीचा खूष झाला

त्याला आणखी कशा प्रकारे मदत करता येईल याचा विचार करू लागलो कुणी तरी सुचवल की, जळणासाठी लाकूड फाटा आणून देऊ या। झाल लगेच त्या कामगिरीवर निघालो तासभर खपून जळणासाठी लाकड गोळा केलीच, पण त्याचबरोबर कोलोन एक छोट झाडच्या झाडच त्याच्यासाठी आणून टाकल

धनगर आमच्या परतण्याची वाट पाहात होता तोपर्यन्त तो एका सुऱ्याला धार चढवत होता बाजूलाच ते दोन्ही कुत्रे होते आम्ही येताच आम्हाला बसायला सागून कुत्र्याना घेऊन तो बाहेर पडला

थोड्याच वेळात तो परतला येताना त्यान दोन शिंगांच्या मधल्या लोकरीला पकडून एक मेंढा खेचत आणला कुत्रे जिभल्या चाटीत अवतीभवती उड्या मारीत होतेच पाचच मिनिटात त्या मेंढयाचा खातमा झाला। अतिशय कुशलतेन ते काम उरकल होत कातड सोलण्यापासून तुकडे करीपर्यन्त ज्या सफाईन त्याचा हात चालत होता, ते पाहून आमची आम्हालाच लाज वाटली अर्धा मेंढा मीठ चोळून खोपटातून त्यान टागून ठेवला मुडक आणि इतर सटरफटर तुकडे कुत्र्यासाठी लाब फेकले

अर्धा मेंढा त्या शेकोटीवर खरपूस भाजला आणि त्या रात्री आम्ही पोट फुटेपर्यन्त खाल्ल आम्ही खुणा करून आजची रात तिथच काढायचा मानस दाखवला त्यानही आनदान समती दिली तो एकटाच त्या खोपटात झोपला बाकी सहा जण शेकोटीच्या उबेत गोलाकार झोपलो

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यान कुठून तरी बार्लीच्या वड्या काढल्या प्रत्येकी तीन याप्रमाणे त्या आमच्यात वाटल्या मग चहाचा कार्यक्रम झाला आणि झाल आदरातिथ्य कमी पडल म्हणून की काय, त्यान उरलेला मेंढा भाजला आणि आमच्यात वाटून दिला आणि वर दक्षिणा म्हणून तबाखूचही वाटप केल

मध्यान्ह टळताच आम्ही निघालो. निघताना त्याचा लाकूडफाटा पुन्हा भरून ठेवायला विसरलो नव्हतो त्याचे आभार कसे आणि कोणत्या शब्दात मानावे हे आम्हाला कळेचना पाठ थोपटत नुसतच हसून आम्ही त्याचा निरोप घेतला मला खात्री आहे त्याला सहा दिलदार मित्र लाभल्याच आश्वासन मिळाल होत

अखेरीस आम्ही खाली वाक-वाकून त्याचा निरोप घेतला, तिकडच्या पद्धतीप्रमाणे वाकताना, त्याच्या चेहऱ्यावर आमची नजर खिळलेली होती. अतिशय गहिवरून त्यानही प्रतिनिरोप घेतला आम्ही वळलो आणि तडक निघालो. थोड अतर गेल्यावर मी मागे वळून पाहिल, तेव्हा तो आमच्याकडे

पाठ करून बसला होता आणि बाजूला बसलेल्या कुत्र्याच्या पाठीवर हात फिरवत होता.

□

आता थोडा मागचा विचार करताना वाटल की आमची जेव्हा त्या धनगराशी भेट झाली, तेव्हा तिबेटमध्ये प्रवेश केला नव्हता, तर तिबेट आणि गोबी यांच्यामध्ये तिबेटच्या ईशान्येला चीनचा कान्सु प्रात आहे, त्यात कुठे तरी होतो त्यावेळी १९४१ च्या ऑक्टोबरचा सुमार असावा आणि त्याच्यानतर हिमालयापर्यंत पोचायला, म्हणजे सुमारे १०७० मैल–जवळजवळ तीन महिने जावे लागले थोडचा कमी-जास्त प्रमाणात, सरासरी दिवसाला वीस मैलाची चाल आम्ही ठेवली होती कधीकधी विश्रांतीचे सपूर्ण दिवस जायचे त्या भागातल्या तिबेटी आदरातिथ्यात आम्हाला नवा हुरूप मिळायचा ताजेतवाने होण्यासाठी एखादा दिवस पूर्ण विश्राती घ्यायचो तिबेटी खेडुतांच एकूणच आणि विशेषत प्रवाशांकरता केल जाणार आदरातिथ्य औरच होत! अत्यत दिलखुलास, मनमोकळ स्वागत ते करत असत. तेसुद्धा कसल्याही परतफेडीची अपेक्षा न करता त्याच्या या कृपेशिवाय आमचा प्रवास अशक्यप्राय झाला असता!

त्या धनगराचा निरोप घेतल्यानतर पाच दिवसांनी आम्हाला पुन्हा मनुष्य-वस्तीच दर्शन झाल सकाळी नेहमीप्रमाणे वाटचाल सुरू झाल्यावर सुमारे तासाभरान डाव्या हाताला दहाएक मैलांवर धुराची वलय वर उठलेली दिसली भुकेन पोटात कावळे कोकलत होतेच. अगात ऊबही पुरेशी आलेली नव्हती आम्ही त्या जागेचा शोध घ्यायच ठरवल. त्या उतारावर सुरुवातीला भुरट, कोरड गवत होत जसजसे खाली उतरू लागलो, तसतसा हिरवळीचा दाटपणा वाढू लागला मेंढचा चारायला योग्य जागा होती लांबवरची धुराची वलय अधिक स्पष्ट दिसू लागली केवळ एखादी झोपडी नसून बडी वसाहत असावी अशी चिन्ह दिसू लागली

आम्ही खेडचात पोचलो तेव्हा मध्यान्ह टळून गेली होती. हिरव्यागार टेकडाच्या कुशीत खुराडचांसारखी दहाएक घर विसावली होती २०×१२ फुटांचं एकएक घरट असाव सपाट पण थोड तिरक छप्पर. छप्पर उडू नये म्हणून त्यावर धोंडे ठेवलेले होते घराच्या आजूबाजूला हिरवळीवर बरीच मेंढरं चरत होती आम्ही पूर्वपश्चिम वाटेन खाली उतरत होतो उतरताना मुद्दाम थांबून इकडे तिकडे पहात होतो उद्देश एकच–आमच्या आगमनाची तिथल्या खेडुतांना

पुरेशी पूर्वसूचना मिळाली आमच स्वागत कुठल्या पद्धतीच आणि कितीसं होईल याची काहीच कल्पना नव्हती

आणखी जवळ गेल्यावर तिथ लहान मुल खेळत असल्याच दिसल कोंबड्या-शेळ्याही तिथच वावरत होत्या आणि फक्त प्राणिसंग्रहालयात पाहिलेला एक प्राणी 'याक' तिथ मोकळ्यावर मौजूद होता जोड्या-जोड्यांनी आम्ही पहिल्या घराजवळ पोहोचलो तिथ चाललेल्या एका प्रकाराकडे आम्ही कुतूहलान पहात राहिलो एक मनुष्य दांडग्या 'याक' ला तिथच असलेल्या दुचाकी गाड्याला जुपण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता त्यान आम्हाला बरच आधी पाहिल होत, पण आम्ही पोहोचायच्या आत हातातल काम पूर करण्याचा त्याचा इरादा होता; पण त्या याकला आमचा वास आलेला होता आणि आमच्या अंगाच्या दुर्गंधीमुळ तो बिथरलो होता कुठल्याही परिस्थितीत गाड्याला जुपून घ्यायच नाही, यासाठी त्याची प्रचड धडपड चालू होती दरीत वाहणाऱ्या वाऱ्यान त्याच्या अगावरची सुदर लांबसडक सोनेरी केसाची झूल भुरभुरत होती सहा-सात पोर तिथ जवळच उभी राहून आमच्याकडे कुतूहलान पाहात होती सगळ्यात मोठा दहा वर्षांचा असेल!

एकाएकी त्या खेडुतान तो जुपणीचा प्रयत्न सोडून दिला तो याक उसळी घेऊन दूर पळाला त्या खेडुतान मान वळवून आमच्याकड पाहिल. आम्ही खाली वाकून अभिवादन केल वाकताना त्याच्या तरुण तरतरीत सपाट चेहऱ्यावर आमची नजर खिळलेली होती त्यान तसाच प्रतिसाद दिला मी आणि कोलो पुढ झालो कोलोची भरदार शरीरयष्टी, त्याची लांबलचक दाढी आणि अमाप वाढलेले केस, यामुळ ती पोर खूष झाली होती मी काही बोललो तो खेडूतही काही बोलला आणि एकच लक्षात आल की, एकमेकाना बोली भाषेन समजून घेण अशक्य आहे त्याला काय वाटल कोणास ठाऊक, तो वळला आणि त्यान मागोमाग येण्याची आम्हाला खूण केली सगळ्या वस्तीला आमची बातमी देण्यासाठी पोर पळत पळत तिकडे विखुरली

घराच्या ओळीत साधारण मध्यावरच्या एका घरासमोर तो थाबला बाकीच्या घरासारखच ते घर दिसत होत थोड मोठ आणि घरासमोर देवडीसारखा थोडासा भाग होता

'मजेशीर दिसतय एकूण प्रकरण!' स्मिथ

'तो बहुधा गाव प्रमुखाला बोलवायला गेला असणार.' झारो

आम्हाला फार वाट पाहावी लागली नाही, कारण आमचीच वाट पाहात दारामागे उभा असल्यासारखा एक इसम बाहेर आला पन्नाशीचा असावा. अगावर केसाळ जाकिटासह इतर पोशाख तिकडच्या भागातला नेहमीचाच होता.

अभिवादनाचा कार्यक्रम झाल्यावर तिथल्याच बोलीत तो बोलू लागला काही कळल नसल्याच दाखवून मी सावकाश रशियनमध्ये बोलू लागलो त्यांचा चेहरा एकदम फुलला आणि माझ्याकड तो अतिशय कौतुकान पाहू लागला

'तुमच मी स्वागत करतो! आता आपल्याला नीट संभाषण करता येईल!' तो रशियनमध्ये म्हणाला

आम्ही चकीतच झालो तो खूपच सफाईन रशियन बोलत होता मी माझ्या मनाला बजावल की, रशियापासून इतक्या दूर दक्षिणेला भेटलेल्या या रशियन माणसापासून कसलाही धोका पोहोचण्याची शक्यता नाही आगे बढो!

माझ्या प्रत्युत्तराची वाट पाहून त्यानच पुन्हा सुरुवात केली 'मी सरकॅशियन आहे गेल्या कित्येक वर्षांत रशियन बोलणार कुणीच मला भेटल नव्हत!'

'सर्कॅशियन, फारच आश्चर्यकारक आहे!' पण मी पुढे फारस बो शकत नव्हतो कारण तो ज्या कॉकेशस प्रांतातून आला होता त्या भागाची मला काहीच फारशी माहिती नव्हती

त्याला किती बोलू आणि काय काय विचारू अस झाल होत 'तुम्ही यात्रेला निघालात काय?' 'बुद्ध धर्म स्वीकारलेले रशियन फार थोडे आहेत तुम्ही गोबीच्या वाळवटातून चालत आलात की काय?' त्यान प्रश्नांची सरबत्तीच लावली

'होय, आम्ही चालतच आलो'

बाप रे! भलतच भयानक आहे ते वाळवट मी स्वत त्यात मरायचाच बाकी राहिलो होतो!'

त्याला आणखी काही विचारावस वाटत होत, पण आपण यजमान आहोत, या गोष्टीची आठवण होताच, त्यानं आमची माफी मागितली आणि आत-घरात येण्याची विनती केली आम्ही घोळक्यानच आत शिरलो आत एक बाई तीन-चार पोरांना हाकलत मागच्या बाजूला, बहुधा स्वैपाकघराकडे घेऊन जाताना दिसली ती त्याची बायको असावी

अर्ध्या तासाच्या आत चहा आणि ओटचे पानगे यांनी आमचा पाहुणचार सुरू झाला अन्नब्रह्माच दर्शन होताच आमची बोलणी थांबली आणि समोरच्या पदार्थांचा समाचार घेण्यात आम्ही मग्न झालो आमच्या यजमानान मोठ्या आदरान तंबाखू आणि चिलीम फिरवली आणि थोड्याच वेळाच सगळ घर निळसर धुरान भरून गेल

चिलीम ओढता ओढता तो म्हणाला, 'अच्छा, म्हणजे तुम्ही मंडळी आता ल्हासाला जाणार तर!' काही तरी बोलायच म्हणून तो बोलत होता आम्ही बुद्ध असून खरच यात्रेला चाललोत यावर त्याचा विश्वास नसावा अस वाटत होत

'एक गोष्ट नीट लक्षात ठेवा या भागातल्या रात्री, विशेषत डोंगर-माथ्यावरच्या रात्री—भयानक थंड असतात ! योग्य त्या निवाऱ्याशिवाय झोपायचा प्रयत्न करू नका रात्री शेकोटी पेटवण्याचा आळस करू नका पुरेसं झाकून घेतल्याशिवाय या पर्वतात रात्री निजलात, तर सकाळी फक्त प्रेत झालेले असाल ! तुम्ही ल्हासाला जाताना पुढच्या टप्प्यापर्यन्त इथून सहज सापडेल अशी वाट आहे आजची रात्र तुम्ही सगळे इथ राहा. उद्या सकाळी कसं जायचं ते मी तुम्हाला सांगेन प्रवासात रात्रीच्या सुमाराला खेडं लागेल; तर तिथंच मुक्काम करा तुम्हाला तिथं जेवण आणि रात्रीपुरता आडोसा नक्की मिळेल. कोणीही एक पैसाही मागणार नाही !'

'आमची अडचण अशी आहे' स्मिथन तोंड उघडलं, 'की, आम्हाला कोणालाही इथली भाषा येत नाही !'

यजमान हसून म्हणाला, 'त्यान काहीही बिघडत नाही कुठल्याही तिबेटाला तुम्ही खाली वाकून नमस्कार केलात, तर तोही तुम्हाला तसाच प्रतिसाद देईल आणि तुमचा मित्र म्हणून ताबडतोब स्वीकार होईल !'

संध्याकाळी जरा लवकरच मटण पार्टीचा कार्यक्रम झाला आम्ही आल्या—आल्याच त्या सरकॅशियन यजमानाच्या मुलांनी मेंढरु मारून ठेवलं होतं मीठ लावलेलं, सुरेख भाजलेलं मांस आम्ही पाहुण्याला न शोभेल अशा अधाशीपणेच चापलं ! भोजनानंतर सहा—सात गावकरी आमच्यात सामील झाले. प्रत्येकान आपल्याला अतिशय प्रिय असलेलं एक एक सुरेख लाकडी भांडं आणलं होतं 'अन्नपूर्णं' न तिबेटी पद्धतीचा चहा केला होता सर्वजण त्या भांड्यातून अत्यंत चवीनं फुर फुर करून चहा प्यायले चहा झाल्या धूम्र-पानाचाही झकास कार्यक्रम झाला आमच्या यजमानाला आमचं संभाषण त्याच्या गावकऱ्यांना भाषांतरित करून सांगणं हा एक उद्योगच झाला ! बाह्य जगाची इतर माहिती, एकापेक्षा जास्त भाषांच ज्ञान, यामुळ सरकॅशियन यजमानाला त्या गावकऱ्यात फार मानाचं स्थान असलेलं कळत होतं आणि ते स्थान तोही मोठ्या रुबाबान सांभाळत होता

आम्हाला निरोप देऊन रात्री सर्व मंडळी अत्यंत समाधानान आपापल्या घरकुलाकडे परतली काहीच न घडणाऱ्या त्यांच्या त्या छोट्याशा जगात आम्ही फार आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण निर्माण केलं यात शंकाच नाही !

त्या रात्री आम्ही आमच्या सुटकेच्या दिवसानंतर प्रथमच छपराखाली झोपलो ! संपूर्ण सुरक्षिततेच्या जाणिवेन आम्हाला अत्यंत शांत, सुखाची झोप लागली होती आमची गात्र खूप शिथिल झाली होती सूर्योदयामुळ नेहमीप्रमाणे जाग आली, पण शरीर आळसावलेलं होतं यजमानानही दिवस चांगला उजाडेपर्यंत आमच्या झोपेत व्यत्यय आणला नाही.

पाठ करून बसला होता आणि बाजूला बसलेल्या कुत्र्याच्या पाठीवर हात फिरवत होता

¤

आता थोडा मागचा विचार करताना वाटलं की आमची जेव्हा त्या धनगराशी भेट झाली, तेव्हा तिबेटमध्ये प्रवेश केला नव्हता, तर तिबेट आणि गोबी यांच्यामध्ये तिबेटच्या ईशान्येला चीनचा कान्सु प्रांत आहे, त्यात कुठे तरी होतो त्यावेळी १९४१ च्या ऑक्टोबरचा सुमार असावा आणि त्याच्यानंतर हिमालयापर्यंत पोचायला, म्हणजे सुमारे १०७० मैल–जवळजवळ तीन महिने जावे लागले थोड्या कमी-जास्त प्रमाणात, सरासरी दिवसाला वीस मैलाची चाल आम्ही ठेवली होती कधीकधी विश्रांतीचे संपूर्ण दिवस जायचे त्या भागातल्या तिबेटी आदरातिथ्यात आम्हाला नवा हुरूप मिळायचा ताजेतवाने होण्यासाठी एखादा दिवस पूर्ण विश्रांती घ्यायचो तिबेटी खेडुतांचं एकूणच आणि विशेषत प्रवाशाकरता केलं जाणारं आदरातिथ्य औरच होतं ! अत्यंत दिलखुलास, मनमोकळं स्वागत ते करत असत तेसुद्धा कसल्याही परतफेडीची अपेक्षा न करता त्यांच्या या कृपेशिवाय आमचा प्रवास अशक्यप्राय झाला असता !

त्या धनगराचा निरोप घेतल्यानंतर पाच दिवसानी आम्हाला पुन्हा मनुष्य-वस्तीचं दर्शन झालं सकाळी नेहमीप्रमाणे वाटचाल सुरू झाल्यावर सुमारे तासाभरान डाव्या हाताला दहाएक मैलांवर धुराची वलयं वर उठलेली दिसली भुकेनं पोटात कावळे कोकलत होतेच अंगात ऊबही पुरेशी आलेली नव्हती. आम्ही त्या जागेचा शोध घ्यायचं ठरवलं. त्या उताराबर सुरुवातीला भुरट, कोरडं गवत होतं जसजसे खाली उतरू लागलो, तसतसा हिरवळीचा दाटपणा वाढू लागला मेंढ्या चारायला योग्य जागा होती लांबवरची धुराची वलयं अधिक स्पष्ट दिसू लागली केवळ एखादी झोपडी नसून बडी वसाहत असावी अशी चिन्हं दिसू लागली

आम्ही खेड्यात पोचलो तेव्हा मध्यान्ह टळून गेली होती हिरव्यागार टेकडाच्या कुशीत खुराड्यासारखी दहाएक घर विसावली होती २०×१२ फुटाचं एकएक घरटं असावं सपाट पण थोडं तिरकं छप्पर. छप्पर उडू नये म्हणून त्यावर धोंडे ठेवलेले होते घराच्या आजूबाजूला हिरवळीवर बरीच मेंढरं चरत होती आम्ही पूर्वपश्चिम वाटेनं खाली उतरत होतो उतरताना मुद्दाम थांबून इकडे तिकडे पहात होतो उद्देश एकच–आमच्या आगमनाची तिथल्या खेडुतांना

पुरेशी पूर्वसूचना मिळावी आमच स्वागत कुठल्या पद्धतीच आणि कितीसं होईल याची काहीच कल्पना नव्हती

आणखी जवळ गेल्यावर तिथ लहान मुल खेळत असल्याच दिसल. कोंबड्या–शेळ्याही तिथच वावरत होत्या आणि फक्त प्राणिसंग्रहालयात पाहिलेला एक प्राणी 'याक' तिथ मोकळ्यावर मौजूद होता जोड्या–जोड्यानी आम्ही पहिल्या घराजवळ पोहोचलो तिथ चाललेल्या एका प्रकाराकडे आम्ही कुतूहलान पहात राहिलो एक मनुष्य दांडग्या 'याक' ला तिथच असलेल्या दुचाकी गाड्याला जुपण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता त्यान आम्हाला बरच आधी पाहिल होत, पण आम्ही पोहोचायच्या आत हातातल काम पूर करण्याचा त्याचा इरादा होता; पण त्या याकला आमचा वास आलेला होता आणि आमच्या अगाच्या दुर्गंधीमुळ तो बिथरलॉ होता कुठल्याही परिस्थितीत गाड्याला जुपून घ्यायच नाही, यासाठी त्याची प्रचड धडपड चालू होती दरीत वाहणाऱ्या वाऱ्यान त्याच्या अगावरची सुदर लाबसडक सोनेरी केसाची झूल भुरभुरत होती सहा–सात पोर तिथ जवळच उभी राहून आमच्याकडे कुतूहलान पाहात होती सगळ्यात मोठा दहा वर्षांचा असेल।

एकाएकी त्या खेडुतान तो जुपणीचा प्रयत्न सोडून दिला तो याक उसळी घेऊन दूर पळाला त्या खेडुतान मान वळवून आमच्याकड पाहिल आम्ही खाली वाकून अभिवादन केल वाकताना त्याच्या तरुण तरतरीत सपाट चेहऱ्यावर आमची नजर खिळलेली होती त्यान तसाच प्रतिसाद दिला मी आणि कोलो पुढ झालो. कोलोची भरदार शरीरयष्टी, त्याची लांबलचक दाढी आणि अमाप वाढलेले केस, यामुळ ती पोर खूष झाली होती मी काही बोललो तो खेडूतही काही बोलला आणि एकच लक्षात आल की एकमेकाना बोली भाषेन समजून घेण अशक्य आहे त्याला काय वाटल कोणास ठाऊक, तो वळला आणि त्यान मागोमाग येण्याची आम्हाला खूण केली सगळ्या वस्तीला आमची बातमी देण्यासाठी पोर पळत पळत तिकडे विखुरली

घराच्या ओळीत साधारण मध्यावरच्या एका घरासमोर तो थाबला बाकीच्या घरासारखच ते घर दिसत होत थोड मोठ आणि घरासमोर देवडीसारखा थोडासा भाग होता

'मजेशीर दिसतय एकूण प्रकरण।' स्मिथ

'तो बहुधा गाव प्रमुखाला बोलवायला गेला असणार.' झारो

आम्हाला फार वाट पाहावी लागली नाही, कारण आमचीच वाट पाहात दारामागे उभा असल्यासारखा एक इसम बाहेर आला पन्नाशीचा असावा अगावर केसाळ जाकिटासह इतर पोशाख तिकडच्या भागातला नेहमीचाच होता.

अभिवादनाचा कार्यक्रम झाल्यावर तिथल्याच बोलीत तो बोलू लागला काही कळल नसल्याच दाखवून मी सावकाश रशियनमध्ये बोलू लागलो त्यांचा चेहरा एकदम फुलला आणि माझ्याकड तो अतिशय कौतुकान पाहू लागला

'तुमच मी स्वागत करतो! आता आपल्याला नीट संभाषण करता येईल!' तो रशियनमध्ये म्हणाला

आम्ही चकीतच झालो तो खूपच सफाईन रशियन बोलत होता मी माझ्या मनाला बजावल की, रशियापासून इतक्या दूर दक्षिणेला भेटलेल्या या रशियन माणसापासून कसलाही धोका पोहोचण्याची शक्यता नाही आगे बढो!

माझ्या प्रत्युत्तराची वाट पाहून त्यानच पुन्हा सुरुवात केली 'मी सरकॅशियन आहे गेल्या कित्येक वर्षांत रशियन बोलणार कुणीच मला भेटल नव्हत!'

'सर्कॅशियन, फारच आश्चर्यकारक आहे!' पण मी पुढे फारस बो॰ शकत नव्हतो कारण तो ज्या कॉकेशस प्रातातून आला होता त्या भागाची मला काहीच फारशी माहिती नव्हती.

त्याला किती बोलू आणि काय काय विचारू अस झाल होत 'तुम्ही यात्रेला निघालात काय?' 'बुद्ध धर्म स्वीकारलेले रशियन फार थोडे आहेत. तुम्ही गोबीच्या वाळवटातून चालत आलात की काय?' त्यान प्रश्नाची सरबत्तीच लावली

'होय, आम्ही चालतच आलो'

बाप रे! भलतच भयानक आहे ते वाळवट मी स्वत त्यात मरायचाच बाकी 'राहिलो होतो!'

त्याला आणखी काही विचारावस वाटत होत, पण आपण यजमान आहोत, या गोष्टीची आठवण होताच, त्यान आमची माफी मागितली आणि आत-घरात येण्याची विनती केली आम्ही घोळक्यानच आत शिरलो आत एक बाई तीन-चार पोरांना हाकलत मागच्या बाजूला, बहुधा स्वैंपाकघराकडे घेऊन जाताना दिसली ती त्याची बायको असावी

अर्ध्या तासाच्या आत चहा आणि ओटचे पानगे यांनी आमचा पाहुणचार सुरू झाला अन्नब्रह्माच दर्शन होताच आमची बोलणी थांबली आणि समोरच्या पदार्थांचा समाचार घेण्यात आम्ही मग्न झालो आमच्या यजमानान मोठ्या आदरान तबाखू आणि चिलीम फिरवली आणि थोड्याच वेळात सगळ घर निळसर धुरान भरून गेल

चिलीम ओढता ओढता तो म्हणाला, 'अच्छा, म्हणजे तुम्ही मडळी आता ल्हासाला जाणार तर!' काही तरी बोलायच म्हणून तो बोलत होता आम्ही बुद्ध असून खरच यात्रेला चाललोत यावर त्याचा विश्वास नसावा अस वाटत होत

'एक गोष्ट नीट लक्षात ठेवा या भागातल्या रात्री, विशेषत डोंगर-माथ्यावरच्या रात्री—भयानक थंड असतात ! योग्य त्या निवाऱ्याशिवाय झोपायचा प्रयत्न करू नका. रात्री शेकोटी पेटवण्याचा आळस करू नका पुरेसं झाकून घेतल्याशिवाय या पर्वतात रात्री निजलात, तर सकाळी फक्त प्रेत झालेले असाल ! तुम्ही ल्हासाला जाताना पुढच्या टप्प्यापर्यन्त इथून सहज सापडेल अशी वाट आहे आजची रात्र तुम्ही सगळे इथं राहा. उद्या सकाळी कसं जायचं ते मी तुम्हाला सांगेन प्रवासात रात्रीच्या सुमाराला खेडं लागलं; तर तिथंच मुक्काम करा तुम्हाला तिथं जेवण आणि रात्रीपुरता आडोसा नक्की मिळेल. कोणीही एक पैसाही मागणार नाही !'

'आमची अडचण अशी आहे' स्मिथनं तोंड उघडलं, 'की, आम्हाला कोणालाही इथली भाषा येत नाही !'

यजमान हसून म्हणाला, 'त्यानं काहीही बिघडत नाही कुठल्याही तिबेटाला तुम्ही खाली वाकून नमस्कार केलात, तर तोही तुम्हाला तसाच प्रतिसाद देईल आणि तुमचा मित्र म्हणून ताबडतोब स्वीकार होईल !'

सध्याकाळी जरा लवकरच मटण पार्टीचा कार्यक्रम झाला आम्ही आल्या—आल्याच त्या सरकॅशियन यजमानाच्या मुलांनी मेंढरू मारून ठेवलं होतं मीठ लावलेलं, सुरेख भाजलेलं मांस आम्ही पाहुण्याला न शोभेल अशा अधाशीपणेच चापलं ! भोजनानंतर सहा—सात गावकरी आमच्यात सामील झाले प्रत्येकानं आपल्याला अतिशय प्रिय असलेलं एक एक सुरेख लाकडी भांडं आणलं होतं 'अन्नपूर्णे' नं तिबेटी पद्धतीचा चहा केला होता सर्वजण त्या वाडग्यातून अत्यंत चवीनं फुर फुर करून चहा प्यायले चहा झाल्या धूम्र-पानाचाही झकास कार्यक्रम झाला आमच्या यजमानाला आमचं संभाषण त्याच्या गावकऱ्यांना भाषांतरित करून सांगणं हा एक उद्योगच झाला ! बाह्य जगाची इतर माहिती, एकापेक्षा जास्त भाषांचं ज्ञान, यामुळं सरकॅशियन यजमानाला त्या गावकऱ्यात फार मानाचं स्थान असलेलं कळत होतं आणि ते स्थान तोही मोठ्या रुबाबानं सांभाळत होता

आम्हाला विदा करून रात्री सर्व मंडळी अत्यंत समाधानानं आपापल्या घरकुलाकडे परतली काहीच न घडणाऱ्या त्यांच्या त्या छोट्याशा जगात आम्ही फार आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण निर्माण केलं यात शंकाच नाही !

त्या रात्री आम्ही आमच्या सुटकेच्या दिवसानंतर प्रथमच छपराखाली झोपलो ! संपूर्ण सुरक्षिततेच्या जाणिवेनं आम्हाला अत्यंत शांत, सुखाची झोप लागली होती आमची गात्रं खूप शिथिल झाली होती सूर्योदयामुळं नेहमीप्रमाणे जाग आली, पण शरीर आळसावलेलं होतं यजमानानंही दिवस चांगला उजाडे-पर्यंत आमच्या झोपेत व्यत्यय आणला नाही.

आमची जाग, दाराआडून डोकावणाऱ्या पोरांनी बाहेर जाहीर केली. यजमान खादीचे काही रुमाल घेऊन आला आणि त्यानं आमच्या प्रातर्विधीचा; आंघोळीचा बंदोबस्त केला.

'अरेच्या, हे तर हॉटेलसेवेच्या वरताण झालं!' झारो विनोदानं म्हणाला, 'आता आम्हाला प्रसाधनगृह दाखवा बरं कुठंय ते!'

यजमानही आमच्या हास्यविनोदात सामील झाला. 'दाखवतो ना! गावाच्या टोकाला आहे सुरेख निर्मळ वहातं पाणी आहे!'

आम्ही सहाहीजण त्या झुळझुळ झऱ्यावर गेलो. हवेतील थंडाई कमी झाली नव्हती. आम्ही वरचे कपडे काढून सुरेख ओंबळून घेतले. जाकीट वगैरे धुवायचा विचार होता, पण ती वाळेपर्यंत थांबायचं म्हणजे उशीर झाला असता.

त्यानंतर मटण, ओटच्या वड्या, चहा यांची फेर झाली आणि निघायची वेळ झाली.

यजमान गहिवरुन म्हणाला, 'परत जाताना याच वाटेनं आलात तर हे घर विसरू नका. तुमचेच आहे याची खात्री असू द्या.'

स्मिथ 'आम्ही तुमचे अत्यंत आभारी आहोत.'

मी 'तुमच्या पत्नीनं आमच्यासाठी इतकं केलंय की त्याचे उतराई आम्ही कसे होऊ? आमच्यासाठी तुम्ही तिचे आभार मानाल का?'

तो 'नाही, आभार मानणार नाही! कारण तिला ते समजणार नाही. त्याऐवजी ती खूष होईल असं काही तरी मी तिच्याशी बोलेन. तुम्ही निश्चिंत राहा!'

त्यानं वळून तिच्याशी थोडं हितगुज केलं. त्याबरोबर तिला खुदकन हसू लोटलं. ती आत पळाली आणि बाहेर येताना मोठ्या वाडग्यात ओटच्या वड्या आणल्या. आपल्या नवऱ्याच्या हातात देत हळूच काही तरी त्याला म्हणाली.

'ती म्हणतेय, या वड्या तुम्ही घेऊन जाव्या' तो म्हणाला. त्याबरोबरच एक मेंढीचं केसाळ कातडं त्यानं आम्हाला भेट म्हणून दिलं. म्हणाला, 'त्याचा उपयोग जोडे करायला किंवा आहेत ते दुरुस्त करायला होईल.' आम्ही प्रत्यक्षात त्याचा उपयोग पुढे हिमालयातील थंडी निवारण्यासाठी पंजे झाकले जातील अशा पजोड्यासाठी केला!'

तो आमच्याबरोबर खेड्याबाहेर वाट दाखविण्यासाठी आला. आमच्या संपूर्ण प्रवासात इतकी व्यावस्थित मार्गदर्शक माहिती प्रथमच मिळत होती. 'वाटेतल्या बऱ्याचशा पाऊलवाटा सापडणं फार सोपं नाही!' तो सांगत होता, 'आपली नजर पाऊलखुणांवर न ठेवता समोर डोंगरखुणावर ठेवा म्हणजे वाट सापडायला सोपं जाईल!'

त्यानं वाटेतल्या मार्गदर्शक, दिशादर्शक खुणा नीट समजावून सांगितल्या. चार दिवसाच्या अंतरावर मुकुटाकार डोंगर दिसेल. त्या मुकुटाच्या उत्तरे-

कडच्या दोन टोकांना जोडणाऱ्या खोगिरासारख्या भागाकडे जाणारी दिशा धरा. तिथून टोकेरी पेरूच्या आकाराचा डोंगरमाथा दिसेल त्या दिशेनं चला हा माथा अतराबाबत तुमची फसवणूक करील तिथ पोहोचायला सुमारे दोन आठवडे लागतील !

त्याच्या पुढच्या खुणा मात्र फार नीटपणे तो सांगू शकत नव्हता, पण त्याच्या अदाजान वाटेत पूर्वेला ल्हासाकडे जाणारा रस्ता आणि नैऋत्येकडे हिमालयाच्या तळटेकड्याकडे जाणारा रस्ता याचा तिठा लागेल आम्ही तिथच त्याचा निरोप घेतला पायात घोटाळणाऱ्या पोराचा घोळकाही मागे वळला जाताना त्यान मगोलियन पद्धतीत न बसणार अभिवादन केल चक्क हात हलवून निरोप घेतला !

मार्चिनकोनं आमच्या सगळ्याच्याच मनातला विचार बोलून दाखवला, 'ही मडळी आपल्याला नतमस्तक व्हायला लावतात. याच्या वागण्यान, ज्या नरपशूनी माणुसकी या शब्दाची वाट लावली आहे, अशा घृणास्पद माणसाच्या आठवणी पुसून टाकायला फार मदत होते.'

आमच्याजवळ असलेल्या प्रत्येकी तीन तीन ओट वड्या तीन दिवसपर्यंत अस्पर्शित ठेवल्या होत्या त्यानतरसुद्धा अत्यत कठोर नियत्रणाखाली त्याच सेवन करू लागलो वाट त्या मानान सोपी होती चौथ्या दिवशी 'मुकुटाच्या' पायथ्याशी आम्ही मुक्काम केला दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच चढायला सुरुवात केली चढ अवघड नव्हता, तरी खोगीरभाग पार करायला दोन दिवस लागले

खऱ्या अर्थान भोजन झाल्याला एक आठवडा उलटला आणि एक दिवस तिबेटी लोकांची दोन घर दिसली आजूबाजूला चक्क रानटी कुरणात मेंढर होतीच हवेतला गारवा थोडा ओसरला होता गमत म्हणजे आजूबाजूला चक्क रानटी गुलाबांचे, पिवळ्या, लाल–पाढऱ्या गुलाबांचे ताटवे मन वेधून घेत होते

आधीच्या यजमानसारखच पण थोड लहान आणि सामानही जरा कमीच असलेल घर होतं, पण आदरातिथ्यात मात्र जराही कमतरता नव्हती. दोन वेळा खच्चून मांसाहार झाला दुधाचाही आग्रह झाला रात्री मुक्कामालाही ठेवून घेतल दुसऱ्या पहाटे निरोप द्यायला सर्व कुटुब प्रेमान हजर होत

## हिमालयावर

सरकॅशियन यजमानान सांगितलेल्या सर्व ढोबळ खुणा आम्ही पार केल्या शेवटचा पेरूसारखा डोंगरही पार केला आणि पलीकडचा प्रदेश त्यामानान वाटचालीला कमी त्रासदायक दिसू लागला.

आठवड्यावर आठवडे यात्रा चालू होती ऑक्टोबर सरून नोव्हेंबर चालू झाला दिवस थडावू लागला रात्री तर गोठवणाऱ्या जाणवू लागल्या. वाळवट

नव्हे पण प्रदेश वैराण, कुरणांचा मागमूस नाही त्यामुळ मेंढ्याचे कळपही नाहीत. चार-चार दिवस अन्नावाचून जाऊ लागले अत्यत कुद, धुकेरी वातावरणातल्या सकाळी अत्यत अनुत्साही जाऊ लागल्या शरीराच्या हालचालीत अत्यत आळ-सावलेपणा येऊ लागला वाटेत लागणाऱ्या क्वचित खेड्यात रेमटून खायला मिळे, पण वाट सुधारली की, पुन्हा फाके पडत ताजा भाजीपाला दिसायचा सुद्धा नाही; त्यामुळे रक्तपितीचा त्रास जाणवायचा ! सुदैवान एकाचीही प्रकृती धोकादायक अवस्थेत पोचली नाही आणि पदयात्रा चालूच राहिली वाटेत फुसाटत जाणाऱ्या नद्या ओलाडल्या प्रथम दर्शनी बिकट वाटणारे डोंगरमाथे सहज सोपे झाले आणि याउलट किरकोळ वाटणाऱ्या टेकड्यानी दम काढला !

याच प्रवासात आम्हाला आमच्याजवळच्या ताराच्या वळचाचा उपयोग समजला तो सुद्धा गरजेपोटी एके ठिकाणी आमचा मार्ग एका दुभगलेल्या टेकडीन रोखला तो प्रचड दरीतला खड्डा ओलाडायचा तर थोडासा वळसा घालायला हवा होता आणि तिकडे तर गिर्यारोहकाची डोकेदुखी ठरते असा खडकाचा लोंबकळ-णारा टोकेरी सुळका होता त्याच्यावर चढण्यासाठी त्या ताराचा उपयोग कर-ण्याची कल्पना सुचली तीन-चार वळी एकात एक अडकवून दहा फुटाचा तारखड तयार केला आणि कोलोला त्याची उची वापरायला लावून त्या सुळक्याला प्रयत्नपूर्वक तो तारखडाचा गळ अडकवला आणि त्याची ताकद अजमावून हळूहळू एकेक जण त्या सुळक्यावर चढला आणि अडचणीतून आमचा मार्ग फत्ते केला !

वाटेत कसलही वैशिष्ट्य लक्षात न येणारी अशी अनेक खेडी, आम्हाला लागली वस्ती कशीही असली तरी आदरातिथ्य मात्र नवरी होत !

शेवटी एकदाचा ल्हासाला जाणाऱ्या रस्त्याचा तिठा लागला नैर्ऋत्येकडे जाणारी वाट भारताकडे जाणार याबद्दल आमच्या मनात शका उरली नाही ल्हासाच्या दिशेन, म्हणजे आम्हाला जी वाटत होती, त्या दिशेन एक मोठा तांडा दूरवरून जाताना दिसला एवढ्या मोठ्या जमावाच दर्शन आम्हाला प्रथमच होत होत

या प्रदेशात उच-सखलपणाबरोबर मोठमोठी सरोवर असल्याचही आमच्या लक्षात आल असच एक प्रचड सरोवर आम्हाला लागल त्याच्या काठावर सरत्या नोव्हेंबरची एक रात्र काढली शेकोटी पेटवली होती, पण तेवढ्यान जाणाऱ्या येणाऱ्या गारव्याचा प्रतिकार होऊ शकत नव्हता त्यानतर काही दिवस बऱ्याच सपाटीच्या प्रदेशात वाटचाल झाली एका खेड्यात फक्त एकच जेवण घेतल आणि रात्री मुक्काम करायला नकार दिल्यावर आम्हाला शिधा बांधून देण्यात आला आमचा प्रवास सुरेख चालला होता आमच नीतिधैर्य वेग-

ळ्याच पातळीवर पोचल होत

त्या मोठ्या सरोवरानतर तीन–चार दिवसांनी एका बोडक्या खडकाच्या दरीत आम्ही मुक्कम केला एका छोट्याशा गुहेचा आश्रय घेतला. जे काय होत ते सपवल आणि ऊब येण्यासाठी एकमेकाल बिलगून बसलो त्या रात्री आणखी एक शोकातिका साकार होणार आहे याची सुतराम कल्पना आम्हाला नव्हती !

नेहमीप्रमाणेच आम्ही झोपलो कुणाला तरी अर्धवट स्वप्नात जाग यायची आणि तो शेकोटी फुलवायचा दुसऱ्या दिवसाची पहाट होण्याच्या सुमारास झारो जागा झाला आणि बाहेर चक्कर मारून आला तो परतला तेव्हा मीही जागा होऊन कोपर टेकून हाताच्या पजावर डोक टेकून इकडेतिकडे पाहात होतो तो जवळ येत म्हणाला, 'अजून धुक आहे आणि थडीही फार आहे, तरी आपण निघू या !' अस म्हणत एकेकाला ओलांडत प्रत्येकाला तो उठवू लागला माझ्या पलीकडे पालुको होता कोलो आणि स्मिथ याच्यामध्ये मार्चिनको घुसडून पडला होता मी उठून उभा राहिलो हातपाय झाडून आळस झटकत होतो एकूण हालचाल सुरू झाली होती कोलोन उगाचच मला त्याचा हत्तीधक्का देऊन गमत केली

तेवढ्यात झारोचा जरा कडक आवाज आला, 'मार्चिनको ऊठ !' पुढच्या हाकेत जरा काळजी डोकावली 'मार्चिनको ऊठ ना किती वेळ लोळतोयस !' झारो मार्चिनकोच्या खाद्याला धरून हलवत होता

मी झटकन गुडघ्यावर होऊन मार्चिनकोला हलवू लागलो तो अत्यत विश्रात पडल्यासारखा दिसत होता एक हात कपाळावर होता. मी तो हात धरून हलवायचा प्रयत्न केला तो आपला डोळे मिटून निपचित होता मी नाडी तपासली छातीला कान लावला पापण्या उचकटून बुबुळ पाहिली. सगळ्या तपासण्या एकापाठोपाठ झपाट्याने उरकल्या आणि त्या खुणाचा विश्वास बसणार नाही असा सदेश माझ्या अगावरून शहारत गेला अगात थोडी उष्णता होती; पण बाकी सगळ स्तब्ध !

मी उठून उभा राहिलो माझ मलाच आश्चर्य वाटेल इतक्या हळुवार आवाजात मी पुटपुटलो, 'मार्चिनको गेला !' सगळ्याच्यापर्यंत हे पोचल की नाही याची खात्री न पटून मी पुन्हा म्हणालो, 'मार्चिनको मेलाय !'

कोणी तरी उसळून म्हणाल, 'हॅट, कस शक्य आहे हे ? त्याला काहीही झालेल नव्हत काही तासांपूर्वीच तर मी त्याच्याशी बोललो होतो, तेव्हा तर झकास होता कसलीही कुरकुर नव्हती कसलही. .'

'तो मेलाय, खरच !' मी.

स्मिथ त्या प्रेताजवळ बसला त्यान चाचपणी केली आणि शांतपणे मार्चिनकोचे दोन्ही हात छातीवर एकत्र जुळवून ठेवले आणि म्हणाला, 'रावीज म्हणतो ते खरय !'

पालुकोन आपली टोपी डोक्यावरून खाली खेचली आणि आपल्याच छातीपुढ क्रूसाची खूण फिरवली.

अकॅरिअस मार्चिनकोवास अठ्ठावीस एकोणतीस वर्षांचा तरुण, रशियन लोकानी पकडल नसत तर कदाचित लिथुआनियात यशस्वी वास्तुशिल्पी म्हणून नाव काढल असत त्यान आपल आयुष्य जगण्याची धडपड थांबवली होती ! आम्ही अवाक् झालो होतो आम्हाला काही कळेचना ! त्याला मृत्यू कसा आला असावा हे आम्हाला कळण्यापलीकडच होत कदाचित आम्हाला वाटत होत त्यापेक्षा तो फार जास्त थकून गेला होता त्याच्या हृदयाला कसलाही ताण यापुढ झेपला नसता मीच काय, इतरही सगळे या प्रकारामुळ अगतिक झाले मार्चिनको आपल्याच विचारात गढलेला क्वचितच केव्हा हास्यविनोद तोही थोडासा तिरकस करणारा, ज्याला फक्त ख्रिस्तिनानच थोडस खेळकर बनवल होत, [illegible] असा हा मार्चिनको आमच्यातून कायमचा गेला !

त्या खडकाळ भूमीत त्याला पुरायला खड्डा खणणही दुरापास्त झाल होत दोन खडकाच्या एका फटीत आम्ही त्याला ठेवल आणि लहान मोठ्या दगडगिट्टयानी ते प्रेत झाकून टाकल कोलोन नेहमीप्रमाण क्रूस करून त्यावर रोवून टाकला. सर्वांनी आपापल्या परीन देवाची करुणा भाकली आणि अत्यत जड अंतःकरणान आणि पावलानी आम्ही पाचजण तिथून निघालो !

प्रदेश पुन्हा पालटला आमच्या मनाची आणि कष्टाची कसोटी पहाणारा पहाडी प्रदेश पुन्हा सुरू झाला अवघड दरडी चढून जाण्यासाठी आमच्याजवळच्या तारखडाचा उपयोग आम्हाला चागलाच होत होता दिवसअखेरीला कुठली तरी वस्ती शोधण्याचा आमचा प्रयत्न असे, पण बरेच वेळा अधार पडल्यावरसुद्धा मनुष्यवस्तीचा मागमूसही दिसायचा नाही !

एके दिवशी एका उच्च शिखरावरून पूर्वेकडे नजर गेली असता अनेक मैल दूर अतरावर सूर्याच्या परावर्तित किरणांनी घराची छपर चकाकताना दिसली आम्ही मनोमन समाधान मानल की फार दूरवरून का होईना आम्हाला ल्हासा शहराच दर्शन घडल !

थडीचा जोर वाढू लागला रात्री तर असह्य होऊ लागल्या हिमालयाच्या तळटेकड्यावर हिमभरे ढग वाहाताना दिसू लागले एका रात्री एका बुद्धकामध्ये [illegible] मुक्काम केला दुसऱ्या दिवशी बराच वेळ खपून पजाड्या

तयार केल्या

एके दिवशी स्वच्छ प्रकाशात हिमालयाच्या हिममाथ्याच दर्शन घडल ते शिखर अत्यत फसव्या रीतीन जवळ वाटत होत आम्ही त्या पर्वतापासून फारच लांब होतो, असे अत्यत त्रासदायक प्रवासानतर लक्षात आल

हिवाळ्यान आम्हाला चागलच ग्रासलच होत रात्रीच तपमान निश्चितच शून्याच्या खाली जात होत मधूनच बर्फुलांचा जोरदार पाऊस व्हायचा सोबतीला बर्फाळ डोंगरावरून येणारे थडगार वारे असायचेच. अर्थात सैबेरियातील थडीच्या कडाक्याची सर नव्हती; परतु आमच्यासारख्या अर्धपोटी, सतत नऊ महिन्यांच्या वाटचालीनतर अर्धमेले झालेल्याना जेरीला आणायला एवढी थडी पुरेशी होती

फेब्रुवारीमध्ये आम्ही शेवटच्या खेड्याला भेट दिली आठ–नऊ घराच बुद्रुक ! दरीच्या तळापासून डोंगरउतारावर साधारण दोनशे फुटावर वसलेल होत त्या खेड्यापर्यंत पोहोचायला आम्हाला दोन दिवसाची मजल करावी लागली होती. दरीच्या पलीकडे हिवाळ्यातल्या दुपारच्या धुकट वातावरणात वर ढगापर्यंत पोचलेली पर्वताची राग दिसत होती या घरांच एक वैशिष्ट्य होत ही घर दुमजली होती तिबेटमध्ये आम्ही अशी घर पाहिली नव्हती कशाला ! सैबेरिया सोडल्यापासूनच अशी दुमजली घर आम्हाला दिसली नव्हती त्या खेड्यापर्यंतच दोनशे फूट अतर चढून जाताना आमच्या नाकी नऊ आले ! पालुको तर फारच थकलेला दिसत होता घोट्याला एका टोकेरी दगडामुळ झालेल्या दुखापतीमुळ तो थोडा लगडत होता

आमच्या खाणाखुणावरून त्या तिबेटी मडळींना आम्ही कुठल्या दिशेन आलोत आणि कुणीकडे जायचय हे कळल आणि आमच्या मूर्ख धाडसामुळ ते अचबित झाले त्यांनी आमचा नेहमीप्रमाणे मटण, चहा ओटच्या वड्या यानी पाहुणचार केला पालुकोला कसल तरी मेणमलम पायाला लावण्यासाठी दिल आजूबाजूच्या घरातील सगळी मडळी आम्हाला पाहायला आली असे कुणी पाहुणे येण ही अत्यत आश्चर्याची, अघटित गोष्ट होती. सगळेजण खाली वाकवाकून, खुणा करून एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. आमच वास्तव्य हा त्याना चर्चेसाठी नक्कीच फार दिवस पुरणारा विषय होता

आम्ही जेव्हा त्या डोंगरी वस्तीचा निरोप घेतला तेव्हा आमच्या थैल्या शिध्यान भरल्या होत्या त्यात खरपूस भाजलेली अर्धी मेंढीसुद्धा होती ! या वेळपर्यंत आमच्याजवळचा शिधा एकाच थैलीत ठेवून, ती आलटून-पालटून खांद्यावर वाहात होतो, पण या पुढच्या प्रवासात नजर पोहोचणार नाही अशा खोल दरीत समजा त्या थैलीचा वाहक गडप झाला तर सगळ्याची पचाईत होईल, हा धोका ओळखून आम्ही अन्न-पुरवठ्याच समान वाटप करून वेगवेगळ्या थैल्यांतून वाहू लागलो

त्या दिवशी शेकोटीभोवती बसून किती वेळ कुणास ठाऊक, पण आम्ही आमच्या सध्याच्या परिस्थितीची, अजून किती जायचय, याची चर्चा करत बसलो होतो हळहळू संभाषण थडावत गेल आणि आजूबाजूच्या अक्राळ-विक्राळ पर्वता-मधली जडशील भयानक शातता अगावर येऊ लागली मला स्वतःची आणि इतर सोबत्याची कीव येऊ लागली मनात विचारांचा प्रचड झगडा चालू होता. हजारो मैल हृदय विदीर्ण करणार अतर माग टाकल्यावर शेवटचा टप्पा जीव-घेणा ठरू नये या एका विचाराशी प्रचड झगडा द्यावा लागत होता रात्रीच्या वेळी हा विचार खायला उठायचा माझी खात्री आहे, इतरांचीही परिस्थिती वेगळी नसणार ! दुसऱ्या दिवसाची सकाळ दिसली की, हे सगळे विचार माग टाकून शरीराची आणि मनाची साफसफाई करून पुढचा मार्ग आक्रमत असू पूर्वी कधी नव्हे एवढी पुढ चालत राहण्याची आच लागली होती 'चला निघू या !' अस कुणी तरी म्हणताच पुढ जाण्याच वेड जाग होऊन नव्या जोमान वाटचाल सुरू व्हायची

आमचा नियत्रित आहार एकभुक्त राहूनसुद्धा दोन आठवडेच पुरला अशा उत्तुग पर्वताच्या चढणीमध्ये आणि तितकाच पायांचा थरकाप उडवणाऱ्या उरतणीच्या चालीसाठी हा आहार अत्यत अपुरा होता, तरी पण त्यातला शेवटचा कण असेपर्यंत आपण भूकबळी होणार नाही असा विश्वास वाटत होता अनेक वेळा आम्ही अधार पडायच्या वेळेला डोगरमाथ्यावर अडकून पडत असू सैबेरि-यात शिकलेला धडा इथ उपयोगी पडत असे बर्फातच खणून गुहा करायची आणि त्यात रात्र जागून काढायची !

या प्रवासात गिर्यारोहणाचे अनेक धडे स्वाध्याय—पद्धतीनं शिकायला मिळाले मी पोलडमध्ये पूर्वी तस थोडस गिर्यारोहण शिकलो होतो, पण हिमालयातल्या गिर्यारोहणाला त्याचा काहीच उपयोग नव्हता त्या वेळी आमच्याकडे खिळेदार बूट, मार्गदर्शक आणि इतर आधुनिक सोयी उपलब्ध होत्या उन्हाळ्यातला एक करमणुकीचा कार्यक्रम म्हणून करत होतो इथ आमच्याजवळ काय होतं ? जीर्ण झालेल्या मोजड्या आणि अगावर लक्तरलेली जुन्या कातड्याची वल्कल ! इथ म्हणजे जीव तोडून हाताच्या नखाचा वापर करून एखादा चढ चढावा आणि वर गेल्यावर लक्षात याव की, पुढचा मार्ग एखाद्या सरळ उभ्या तुटलेल्या कड्यान रोखला आहे ! पुन्हा मांजरासारख लटकून, हाता-पायाना आकडी येण्याची परिस्थिती असतानासुद्धा माग फिराव लागे आणि मग दुसरी वाट शोधण्यापासून तयारी !

या परिस्थितीत वेग अतिशय मदावला होता आमच्याजवळ गिर्यारोहणो-पयोगी सामान काय होत, तर चामड्याची वादी ! आखूडपणामुळ तिचा फारसा

उपयोग नव्हता नंतर कुऱ्हाड हे सर्वांत उपयोगी आयुध, मोठा सुरा, तारखडाची वळी आणि थोडेसे लांब खिळे बस, एवढच !

आम्ही एकाडे चढत असू, निश्चित रचनेन झारो वजनान सगळ्यात हलका ! तो पुढ असायचा कुऱ्हाड वर खोचून भक्कमपणाचा अदाज घ्यायचा आमच्यासाठी वाट तयार करून वर जायचा नंतर माझा नबर पाठोपाठ कोलो, स्मिथ आणि पालुको आमच्यातल्या दोघा वयोवृद्धाना शक्यतो त्रास कमी होईल असा आमचा प्रयत्न असे, पण ते दोघे दाद देत नसत निदान उतारावर तरी पुढ रहाण्याचा त्याचा आग्रह असे.

एक गोष्ट विसरलो आमच्याबरोबर काठ्याही होत्या त्यांचा उपयोग बर्फाने झाकल्या गेलेल्या खाचखळग्याची चाचपणी करण्यासाठी होत असे झारो हा कुठल्याही गटात अव्वल गिर्यारोहक म्हणून सहज वावरू शकला असता या कलेत त्यान चागलच प्राविण्य मिळवल होत डोक्यावर आडवे येणार सुळके पार करण्यासाठी आम्ही एक क्लृप्ती लढवली होती दोन बाजूना गोळेदार आणि मध्ये बारीक साधारण डबेलसारखा एक दगड बाळगला होता त्याला तारखड बाधायचा आणि वरच्या सुळक्यावर फेकायचा केव्हा तरी तो वर कुठे तरी अडकायचा की मग कोलो त्याला लोंबकाळून त्याची ताकद अजमावायचा. मग झारो एखाद्या धाडसी वीरासारखा वर चढायला सुरुवात करायचा तो चढत असताना आमचे प्राण कठाशी आलेले असायचे. कारण जराशी चूक म्हणजे मृत्यूशी गाठ ! वर चढल्यावर कधीकधी अस लक्षात यायच की ज्याच्या आधारावर आमचा गळ अडकलेला असे तो इतका फुसका असायचा की ते पाहून जिवाचा थरकाप उडत असे !

एखाद्या उघाडीच्या दिवशी सूर्यकिरण परावर्तित होऊन तो उजेड डोळ्याना सहन व्हायचा नाही चमत्कारिक ताण पडायचा. एकीकडे कडक उन्हाची तिरीप आणि त्याच वेळी कडाक्याची थडी ! थोबाडाच रक्षण करण्यासाठी आम्ही कातड्याच्या माकडटोप्या तयार केल्या डोळ्यासाठी बारीक फटी ठेवल्या. त्या टोप्या म्हणजे एक नमुनाच होत्या ! उगाच आपल तोड झाकल जाईल एवढाच त्याचा आकार होता; पण आपल काम मात्र त्यानी चोख बजावल. एक वेगळाच त्रास त्यातून व्हायचा श्वासोच्छ्वासाबरोबर बाहेर येणारा दमटपणा थडीमुळ पाणसर होऊन ओघाळायचा आणि पुन्हा बाहेरच्या थडीमुळच नाका–तोंडाभोवती गोठून कडक व्हायचा तो असा जमलेला थोबाडावरचा बर्फ काढायचा म्हणजे एक कामच होऊन बसल हातावर पजोड्या होत्या हात शक्यतो जाकिटाखाली, नाही तर काखेत झाकून ठेवायचा प्रयत्न करायचो, पण कडा चढायची वेळ आली की त्या काकडलेल्या बोटावरची पजोडी केवळ वादीमुळ

टिकून राहायची

तोंडांवरचे चित्रविचित्र बुरखे, त्याच्या लोंबणाऱ्या कनाती यामुळे कान झाकले जाऊन एकमेकाचं बोलणंही नीट ऐकायला यायचं नाही

चिडचिड वाढू लागली मरणप्राय थकवा आला होता भुकेनं जीव कासावीस व्हायचा माझ्या सगळ्या नाड्या तर एखाद्या पियानोच्या तारांसारख्या टणक झाल्या होत्या ।

□

१९४२ मार्चच्या अखेरीस आमच्या ध्यानात आलं की, भारताची अभयभूमी फार दूर नसावी आमच्या समोर मार्गात, उत्तुंग पर्वताची शिखरं आडवी होती इतकी उंच शिखरं या आधी आम्हाला कधीच दिसली नव्हती आम्ही एकमेकाला दिलासा देत होतो शेवटचा निकराचा एक प्रयत्न केला की आपण भारतात पोहोचू, त्या सुसंस्कृत देशात आपल्याला आसरा मिळेल, शारीरिक आणि मानसिक निवांतपणा नक्की लाभेल जमेल तेवढा धीर आम्ही एकमेकांना देत होतो मला स्वत ला मनोमन भीती वाटायला लागली होती की, या खड्या पर्वतावरच आपला शेवट होणार ! रात्री झोपताना ही आपली काळरात्र तर ठरणार नाही ना, अशी भीती सतत भेडसावयाची जवळपास चार हजार मैलाच्या भीषण प्रवासाचा शेवट जवळ आल्याची जाणीव होताच, ही भीती जास्तच उफाळून येऊ लागली

एका रात्री आम्ही आमच्याजवळचा जळणाचा शेवटचा साठा शेकोटीसाठी वापरला त्याच वेळी अन्नाचा शेवटचा कणही संपला ! मध्यरात्रीपूर्वी दोन तास खपून आमची आयुधं नीट तपासली, मोजड्या दुरुस्त केल्या ती रात्र अत्यंत अस्वस्थ तळमळत काढली उजाडताच झारोनं कोलोकडून कुऱ्हाड घेतली कमरेला दोर बांधला आणि आम्ही मार्गस्थ झालो प्रवास सुरू झाल्यानं माझ्या मनावरचा ताण थोडासा कमी झाला

हवामानानं आमच्यावर त्या दिवशी कृपा केली होती गार वारे वाहत होते, पण तळपत्या उन्हामुळं भुसभुशीत बर्फाचं वितळायची आणि खालच्या अतिगारपणामुळं त्यांचं घट्ट बर्फात रूपांतर व्हायचं कुऱ्हाड खोचायला त्यामुळं थोडं सोपं जायचं नेहमीपेक्षा जास्त सहज समर्थपणे आम्ही त्या दिवशी चढत होतो झारो आपली पकड, आपलं पाऊल दोन-दोनदा तपासून मगच पुढं चढत होता त्याच्या बुरख्यातून श्वासोच्छ्वासामुळं वाफेचे ढग त्याच्या चेहऱ्याभोवती फिरताना दिसत होते

तिसऱ्या दिवशी आम्ही शिखरावर पोहोचलो आणि लक्षात आलं की,

पलीकडे तसंच आणखी एक शिखर आहे रात्री पडणाऱ्या भयानक स्वप्नाचाच तो भाग असावा, असं वाटायला लागलं त्या पर्वताच्या दक्षिण उतारावरून खाली जायला दोन दिवस लागले ! चढण्यापेक्षा पर्वत उतरणं हे अधिक अवघड असल्याचं सारखं जाणवत असे खाली दरीमध्ये पोहोचताच बर्फाची गुहा करून चार तास विश्रांती घेतली कारण एक अवघड दिव्य समोर उभं होतं !

हे पुढचं पर्वतारोहण हा आमच्या आयुष्यातला सगळ्यात निर्घृण अनुभव होता ती रांग ओलांडायला एका दरीमागून दुसरी दरी अशा अनेक दऱ्या ओलांडायला आम्हाला सहा दिवस लागले आता मात्र आम्ही इतके गळून गेलो होतो की, उघडपणे आपली निराशा बोलून दाखवू लागलो. लवकरच आपला अंत होणार, ही चिंता प्रत्येकजण बोलून दाखवू लागला एखादं प्रचंड हिमवादळ, की आम्ही सगळे खलास झालो असतो !

दोन दिवस गेले चढणं पुढं चालूच होतं एका ठिकाणी वर चढताना माझा सुरा बर्फात खुपसून त्याच्या आधारानं वर चढायचा प्रयत्न करत होतो. सुरा नीट खुपसला जात नव्हता, म्हणून पायांनं नीट आधार तयार करून थोडासा विसावलो बोटामधे येत असलेली आकडी जरा घालवली आणि सुरा खुपसण्यासाठी पुन्हा प्रयत्न करू लागलो अचानक सुरा सुटला. सपकन माझ्या डोक्यावरून मागं उडाला आणि क्षणार्धात नाहीसा झाला ! कसलाही मागमूस न ठेवता. माझ्या पोटात गोळा उठला. माझ्या जिवाचा तुकडाच तुटल्यासारखं झालं एक अनमोल वस्तू गायब झाली होती !

तिसऱ्या दिवशी माथा जवळ दिसू लागला चढण सोपी वाटत होती, पण तीसुद्धा पार करू की नाही, याची शंका वाटत होती थंडी हाडं फोडायला उत्सुक होती धुक्याचा दाट पडदा आमच्या आजूबाजूला पसरायचा, उचलला जायचा, पुन्हा पसरायचा, असा प्रकार सतत चालू होता. अति उंचीमुळे आमची उरलीसुरली ताकदही शोषली जात होती प्रचंड जीवघेणी ग्लानी घेरू पाहत होती त्यातून एकेक पाऊल उचलायचं म्हणजे दिव्य होतं वाटायचं की, एका जागी बसावं आणि कर्माला दोष देत त्या जागीच संपून जावं. इतके आम्ही हवालदिल झालो होतो मला तर फुटू पाहणाऱ्या फुफ्फुसामध्ये भरायला हवाच आत घेता येत नव्हती. हृदयाचे ठोके छाताडावर आतून एखाद्या घणासारखे ऐकू येत होते आमच्यापैकी कुणीही, मनात आणलं असतं तर, सगळे प्रयत्न सोडून देऊन शांत निपचित पडून, डोळे मिटून, हात पसरून उभ्या असलेल्या मृत्यूच्या कुशीत केव्हाही आनंदानं जाऊ शकला असता, पण कुणाची ना कुणाची हाल-चाल, धडपड चालू असलेली दिसत होती त्यामुळे जगण्याची ऊर्मी कायम रहात होती त्यातच शारीरिक छळाने कळस गाठला नाकातून रक्त वाहू लागलं— नाकात पिशव्याच्या कापडाचे बोळे कोंबून रक्तप्रवाह थांबवण्याचे प्रयत्न चालू

होते नाक बद म्हणजे फक्त तोंडानच श्वास घ्यायला हवा! ते तर फारच भयकर होऊ लागल शेवटी बोळे काढून टाकले त्याबरोबर रक्ताची धार दाढीमधे ओघळू लागली आणि तिथच गोठू लागली

ती रात्र आम्हाला त्या माथ्यावर काढावी लागणार अशी लक्षण दिसू लागली दिसू शकतय् तोवर तो माथा पार करून पलीकडे, उतरायच्या प्रय त्नाला लागलो चढताना उभे कडे टाळण्यासाठी डावी-उजवीकडे, आडव-तिडव सरकाव लागत होत प्रत्यक्ष माथा केव्हा गाठला ते कळलच नाही! एका क्षणाला अचानक अस लक्षात आल की, पुढ असलेला झारो माझ्यापेक्षा खालच्या पातळीवर आहे पुन्हा आम्ही थोडे चढलो आणि लक्षात आल की, आता चढापेक्षा उतार जास्त आहे याचा अर्थ उतरड सुरू झाली होती!

बर्फात रात्र काढण अगदी जिवावर यायच. एका सपाट रुद कातळा-वर बर्फ घसरून थर जमला होता आम्ही इतके थकलो होतो की, उभ्यान-सुद्धा झोपायची तयारी होती! बर्फात झोप, तीसुद्धा शेकोटीशिवाय म्हणजे साक्षात मृत्यूला आमत्रण ती रात्र आम्ही आयुष्यात कधी विसरणार नाही! एकमेकाला बिलगून, हातानी कवळून उभ्यानच रात्र काढली! बर्फ उकरून थोडासा आडोसा केला होता इतकच डोळ्यावर सारखी झापड येत होती बोटानी पापण्या उचलून डोळे जागे ठेवावे लागत होते कोलो तर तीन वेळा छातीवर हनुवटी ठेवून घोरू लागला त्याला ढुश्या देऊन जाग कराव लागत होत प्रत्येक-जण दुसऱ्याचा पाठीराखा झाला होता कोणी डोळे मिटतय का, याकडे स्वत चे डोळे ताणून लक्ष ठेवाव लागत होत. मधूनच त्या एकमेकाला धरलेल्या अवस्थेत, पाय मोकळे करण्यासाठी रिंगण-फेर धरत होतो त्या रिंगणफेरीतही मी स्वप्नामध्ये पोहू लागलो, त्याबरोबर स्मिथन मला थोपटून, माझी दाढी ओढून मला शुद्धीवर आणल थोड्या वेळान पहाटेच्या पहिल्या प्रहरात येणारा थडीचा कडाका आणि नखशिखान्त पसरणारा गळाठा अगभर पसरला!

'चला, हलू या!' कोणी तरी म्हणाल, 'जरा खालच्या पातळीवर जाऊ म्हणजे थोडासा श्वास तरी घेता येईल!'

पालुको अत्यत हताशपणे म्हणाला, 'अशी रात्र जर पुन्हा आली, तर आपण काही शिल्लक रहात नाही!'

पूर्वेकड जरास फटफटल आणि लगेच आम्ही मार्गस्थ झालो पालुको सर्वांत पुढ आणि झारो माझ्याबरोबर पिछाडीला आपण फत्ते होऊ की नाही, याबद्दल मी अजूनही साशक होतो दुपारच्या सुमाराला एका अत्यत भयानक जागी आम्ही पोहोचलो एक फुटावरच आमच्यापुढ प्रचड कडा तुटलेला दिसला हृदयाचे ठोकेच चुकले! एकेक इच माग माग सरकत धोक्यापासून दूर झालो

दुसरा मार्ग शोधून काढायचा प्रयत्न सुरू झाला तोही सापडला अशीच आणखी एक रात्र उभ्याउभ्याच काढली आणि मग दुसऱ्या दिवशी थोडी उतरड उतरल्यावर खालची दरी स्पष्ट दिसू लागली

दुपारी आम्हाला एक गुहा सापडली. आत कुणीच नव्हत, पण तोंडाशी वाळक्या झुडुपांचा एक ढीग होता दैव आमच्या बाजूला असल्याचा हा पुरावाच होता ! नशीब उघडल म्हणजे किती उघडत याचा आणखी एक पुरावा तिथ मिळाला गुहेत छताला खुटी ठोकलेली होती आणि त्याला कातड्यात बांधलेल एक बोचक होत त्यात बकऱ्याची एक टाग होती अर्धवट भाजलेली, धुरकटलेली. भुकेन पोटात डोंब उसळलेला असताना जादा चोखदळपणा करण्याइतके आम्ही मूर्ख नव्हतो ! शेकोटी पेटवून ती टांग आणखी भाजायच ठरवल शेकोटी पेटवायला बरेच प्रयास करावे लागले मास भाजल जात असताना, शेजारी बसून आम्ही आमच्या अगावरच बर्फ कित्येक आठवड्यांनतर वितळवल सुऱ्याशिवाय नुसत्या कुऱ्हाडीन तुकडे करण जिकिरीच होत, पण तेही केल अर्धी टाग सपवून उरलेली दुसऱ्या सकाळकरता राखून ठेवली बोळक्या पालुकोला नेहमी-प्रमाणे भलतेच प्रयास पडत होते, वेळ लागत होता, पण थोड्या प्रमाणात का होईना आमच्या भुकेची धार आम्ही बोथट केली

त्यातल्या त्यात आरामात झोप काढली, जागे झालो तेव्हा उजाडून दोन-एक तास तरी झाले असतील. शेकोटीन केव्हाच राम म्हटल होतं आम्ही घाईघाईन उरलेल मांस सपवल आणि तडक निघालो !

अजून किती प्रवास शिल्लक राहिला आहे याबद्दल अदाज करण निष्फळ आहे, हे आम्हाला कळत होतं उत्तुग शिखर-पर्वतामधून अजूनही आमची सुटका झालेली नव्हती गुहेतून निघाल्यावर दोन दिवसाच्या टप्प्यावर असलेल तुलनेन कमी उचीच शिखर पार केल्यावर, आम्ही भारताकडील तळटेकड्यात प्रवेश करू अस कुणी सागितल असत, तर त्यावर विश्वास ठेवण कठीण गेल असत त्या चढणीबद्दल फार तपशील आठवत नाही, पण एवढ आठवत की, दोन दिवसांच्या चढणीन चढावर आत्तापर्यंत होणारा मळमळण्याचा त्रास जाणवला नाही माथा ओलांडून आम्ही पलीकडे उतरू लागलो तेव्हा सूर्य चांगलाच लकाकत होता आणि हवामान कमालीच होत दक्षिणेकडे भराभर स्वच्छ ठेंगण्या होत गेलेल्या डोंगरांच्या रागा दिसू लागल्या मला मनोमन खात्री पटली की आपल्यासमोर पसरलेला प्रदेश हा भारतच आहे !

आमच्या हिमालयातील भटकतीमध्ये माणूस, कुत्रे, शेळ्या, मेढ्या आणि यक यापलीकडे कुठलाही प्राणी आम्हाला दिसला नाही अतिउच डोगराच्या या शेवटच्या उतरणीवर असताना कोलोन आमच लक्ष दोन हालचाल करणाऱ्या काळ्या ठिपक्यांकडे वेधल ते पाहून सगळ्यात्र कुतूहल जागृत झाल आमच्या-

पासून खाली सुमारे पाव मैलावर त्या आकृत्या दिसत होत्या ते काही तरी प्राणी असावेत अस जाणवल आणि त्याबरोबर आठवण झाली ती भुकेची ! आम्ही त्याच्यापर्यन्त पोहचेस्तोवर ते तिथे राहतील याची खात्री नव्हती वाटेत चढ-उतारामुळ ते मधूनच दृष्टीआड होत होते, पण एका छोटया घळीपाशी आम्ही थावलो, तेव्हा आमच्यापासून बारा फूट खाली शभरएक यार्डावर ते प्राणी तिथेच होते.

दोन गोष्टी चटकन ध्यानात आल्या त्यांचा आकार प्रचड होता आणि आपल्या मागच्या पायावर ते चालत होते जवळजवळ दोन तास जीव मुठीत धरून आम्ही तिथे खिळून बसलो होतो त्यामुळे ते चित्र माझ्या अगदी पक्क लक्षात आहे आम्हाला जे काही दृश्य दिसल त्यावर प्रथम विश्वासच बसत नव्हता कुणीतरी सुचवल की, खाली उतरून जवळ जाऊन नीट पाहू या !

झारो म्हणाला, 'ते आपल्याला सहज खाऊ शकतील एवढे मोठे आहेत !' माणसाच्या आगमनामुळ पळून न जाणाऱ्या प्राण्यांबद्दल आम्हाला कसलाच भरवसा वाटेना

सैन्यात उची, अतर यावद्दल अदाज बाधण्याच शिक्षण मिळाल होत, त्याच्या आधारान त्या प्राण्याच्या उचीचा अदाज बाधू लागलो आठ फुटापेक्षा त्यातल कुणीही कमी उचीच नव्हत स्त्री-पुरुषामध्ये साधारणत असतो तेवढा फरक दोधाच्या उचीत होता आमच्या उतरणीच्या मार्गावरच एक सपाट घडवचीसारख्या भागावर त्यांचा विहार चालू होता आम्ही विचार केला की, अधिक काळ थाबलो, तर तेच कटाळून निघून जातील आणि आमचा मार्ग मोकळा होईल त्यानी आम्हाला पाहिल होत हे नक्की आणि आमची त्याना यत्किंचितही भीती वाटत नव्हती हेही तितकच खर !

स्मिथला खात्री वाटत होती की, थोडयाच वेळात ते प्राण्यासारखे चार पायावर चालू लागतील, पण शेवटपर्यन्त ते द्विपादच राहिले !

त्यांचे चेहरे नीट कळत नव्हते डोक्याचा आकार चौकोनी वाटत होता. कान असलेच तर अगदी चिकटून असावेत कारण बर्फाच्या पार्श्वभूमीवर दिसत असलेल्या कडाकृतिमध्ये कसलाही भाग पुढ आलेला दिसत नव्हता त्याचे अत्यत दणकट खांदे छातीपर्यन्त उतरलेले होते हात चांगले लांब, आजानुबाहू होते मागच्या बाजूने डोक्याचा भाग अगदी सपाट, एखाद्या प्रशियन माणसासारखा दिसत होता पालुकोन पुस्ती जोडली

या प्रकारचा प्राणी आमच्या वाचण्या-पहाण्यात अगदी प्राणिसग्रहालयात-सुद्धा आलेला नाही, यावर आमच एकमत झाल लाब अतरावरून नुसते जाताना दिसले असते तर कुणी प्रचड अस्वल किंवा ओरँग उटँग्या जातीच

माकड आहे, असं समजून आम्ही फारसं लक्ष दिलं नसतं. त्यांचा रंग रंगलेल्या लोखंडासारखा तांबूस दिसत होता. अंगावरच्या केसांचे दोन भाग स्पष्ट कळत होते. अंगालगत अगदी घट्ट विणीचे तांबूस लोकरीसारखे केस होते आणि त्यात मधून मधून लांबलचक सरळ केस किंचित लोंबत होते उन्हामुळे त्यांचा रंग किंचित राखाडी भासत होता

खडकावर पाय सोडून आम्ही तासभर त्यांच्याकडे पाहात होतो. काही नाही, नुसते खाली मान घालून बरोबर इकडे तिकडे हिंडत होते मधूनच एखाद्या वेळी एखाद छान दृश्य पाहिल्यासारखं चौफेर नजर टाकत होते. क्वचित केव्हा तरी ते आमच्या दिशेनं मान वळवून पाहात, पण आमच्यामध्ये त्यांना जराही रस नव्हता !

झारो उठून उभा राहिला 'इथून हलण्याचं त्यांच्या मनात येईपर्यन्त थांबायचं, तर सबंध दिवस वाया जाईल मी त्यांना पिटाळायचा प्रयत्न करतो.' झारो त्यांना मूकाभिनयासह हातवारे करून निवारू लागला. मधूनच आरडाओरडाही करत होता त्या प्राण्यांनी ढुंकूनही पाहिलं नाही झारोनं आजूबाजूला चाचपून बर्फाचे खडे गोळा केले आणि त्यांच्या दिशेनं फेकायला सुरुवात केली, पण एकही खडा त्यांच्यापर्यन्त पोहोचेना. एक खडा सगळ्यात जवळ म्हणजे वीसएक फुटावर पडला थोडीशी बर्फुल उधळली, पण तेवढच त्यांनी ते पाहिलंच असलं तरी त्याची दखल मात्र मुळीच घेतली नाही झारो मात्र धापा टाकीत स्वस्थ झाला

आम्ही आणखी तासभर वाट पाहिली पण आहेत तिथंच थांबण्याचा त्यांचा निर्धार दिसत होता. मला तर वाटायला लागलं की, ते सुचवत होते की हिंमत असेल तर पुढे या !

झारो म्हणाला, 'मला वाटतं ते आपल्याला हसतायत !'

स्मिथ उभा राहिला व म्हणाला, 'त्यांच्या डोक्यात आपलं निरीक्षण करायचं आलं तर पंचाईत होईल सुरक्षित आहोत तोवर इथून हलू या !'

आम्ही त्या खडकाला वळसा घालून, त्यांच्यापासून पूर्णपणे दूर अंतरावरून खाली उतरू लागलो ती जोडगोळी तशीच हात हलवत, झुलत राहिली. ते काय प्रकरण होतं ? बरीच वर्षं मला कोडंच राहिलं होतं, पण त्यानंतर मी हिमालयाच्या अनेक सफरींबद्दल वाचलं त्यात बऱ्याच ठिकाणी किळसवाण्या हिममानवाविषयी लिहिलं होतं मी पाहिलेले प्राणी त्या वर्णनाशी तंतोतंत जुळणारे होते त्या वाचनानंतर माझी खात्री झाली की, आमची वाट अडविणारे प्राणी म्हणजे हिममानवच होते !

आम्हाला वाट बदलायला लावून त्या यतींनी आमच्यावर दुर्दैवाचा शेवटचा घाला घातला !

आम्ही निघालो तेव्हा मध्यान्ह टळून गेली होती सगळ छान सुरळीत चालल होत रिकाम्या पोटी होतो तरीसुद्धा उत्साह चागला होता रात्र निवार-ण्याकरता अत्यत आदर्श अशी एक गुहाही आम्हाला सापडली दुसरा दिवसही, मन उल्हसित करील अशा सुदर एप्रिलच्या पहाटेन सुरू केला धुक झपाट्यान विरत गेल

प्रवास सुरू झाला आणि सुमारे दोन तासानी ती घटना घडली एका उताराच्या वरच्या अगाला मी आणि झारो तारखडाच एक टोक आमच्या कंबरेला सैलसर गुडाळून उभे होतो आदल्या दिवशी पाहिलेल्या त्या विचित्र प्राण्याविषयी झारोन काही तरी वात्रट टीका केली, त्यावर मी हसत उभा होतो. उतार थोडासाच दिसत होता आणि तारखड ताठ घट्ट धरावा असा कुठलाही धोका नव्हता पालुको उलटा हात-पाय टेकून मागे मागे घसरत चालला होता हाताशी सैलसर तारखड होता त्याच्याच मागोमाग म्हणजे तसे पुढचे पण उलट उतराव लागत असल्यामुळ माग स्मिथ आणि कोलो होते तिघाच्याही हाताशी तारखड होता

पालुकोला उताराच्या शेवटपर्यंत पोहोचलेला मी पाहिला मी झारोकडे पाहिल आणि त्याच क्षणी तारखडाला हिसका बसून ताठ झाला आणि दुसऱ्याच क्षणाला पुन्हा सैल पडलेला दिसला त्याच वेळी काही तरी अद्भूत दिसाव, तशी भितीन फोडलेली किंकाळी ऐकू आली झारो आणि मी एकाच वेळी खाली पाहू लागलो आणि त्या भयानक सत्याची जाण यायला आम्हाला एक दोन क्षण लागलेच तिथ खाली स्मिथ होता, कोलो होता, पण पालुको अतर्धान पावला होता !

मूर्खासारखे आम्ही दोघे तिथ उभ राहून त्याला हाका घालू लागलो इतर दोघे पालुकोकडे पाठ असल्यामुळ काय झाल ते न कळून तसेच थबकले आमच्या पहिल्याच हाकेला ते थाबून आमच्याकडे पाहात राहिले !

'परत वर या,' मी ओरडलोच, 'तसेच वर या पालुकोला काही तरी झालय !'

ते दोघे कसेबसे सावरत घसरत पुन्हा वर आमच्यापर्यन्त पोहोचले माझ्या कंबरेला सुट टोक बाधल मी म्हणालो, 'मी खाली घसरत जाऊन पाहून येतो काय झालय ते !'

मी वरून दिसणाऱ्या उताराच्या टोकापर्यन्त पोहोचलो पुढचा भाग घसरत गेल्यासारखा भासत होता झारोन तारखडाला आधार दिला आणि पालुको जसा माग पहाण्याकरता वळला तसा मी वळलो आणि माझी बोबडीच वळली डोंगरउतारान 'आ' वासला होता चांगल्या वीस यार्ड जाडीच्या कुऱ्हाडीन भगदाड पाडाव तसा तो डोंगर दुभगला होता तो भाग वरून दिसण शक्य

नव्हत  ती घळ, खड्डा, दरी काय म्हणायच असेल  ते म्हणा, पण त्याचा तळ दिसत नव्हता इतक ते खोल होत  तारखडाला जखडून लोंबकाळून मी उगाचच हाका मारू लागलो, 'पालुको-पालुको !' माझ कपाळ थंड घामान डबडबल

मी वळलो, माझ्या जीवाचा एवढा थरकाप उडाला होता की, वर पोहोचलो तरी माझी तारखडावरची मगरमिठी सैल व्हायला तयार नव्हती !

सगळ्यांचा एकच कल्ला सुरू झाला  मला तो दिसला का ? मी कशासाठी ओरडत होतो ?  तो आहे कुठे ?

मला दिसलेल भयाण दृश्य मी त्याना सांगितल आणि पालुकोची नाव-निशाणी कुठेच दिसत नसल्याचही सांगितल

'आपल्याला त्याला शोधलच पाहिजे,' —कोलो-

'तो आपल्याला  कधीच  सापडू शकणार  नाही !' मी म्हणालो, 'तो आपल्यातून गेलाय !'

या प्रकारावर विश्वास ठेवण्याची कुणाचीच तयारी  नव्हती माझीही नव्हती महाप्रयासान आम्ही एक कड्याच टोक शोधून काढल तिथून आम्हाला ते विवर दिसत होत  डोक गरगरवणारी ती दरी पाहून त्याना  अदाज आला-आम्ही एक ठिकरी त्या दरीत भिरकावली तिच्या आवाजावरून खोलीचा अदाज येईल अशी कल्पना, पण छे ! कसलाच आवाज नाही  जरा मोठासा धोंडाही टाकून पाहिता अगदी जिवाचे कान करून आवाज ऐकायचा प्रयत्न केला, पण साध खुट्टसुद्धा नाही !

आम्ही त्या जागी बराच वेळ ताटकळत राहिलो  काय कराव तेच कळत नव्हत घात इतक्या अचानक आणि परिपूर्ण होता की  आम्ही दिग्मूढ होऊन गेलो होतो एका मिनिटापूर्वी होता आणि दुसऱ्या मिनिटाला कोणी तरी हिसडा मारून पळवाव तसा तो गेलेला होता ! दतविहीन, तरीही अत्यत  मजबूत बांध्याचा, सैनिकी पेशा रक्तात पुरेपूर मुरलेला पालुको कधी मरू शकेल, अस वाटलच नव्हत  अजरामरत्वाचा पट्टा घेऊन आल्यासारखा वाटायचा तो !

स्मिथ अत्यत व्यथित होऊन वैतागून म्हणाला, 'छे, इतकी प्रचड मजल मारली, इतके हाल  सहन  केले, ते  इतक  भिकार  मरण येण्यासाठी ?' मला वाटत, आमच्या कुणाहीपेक्षा पालुकोचा मृत्यू स्मिथला फार जाणवला आमच्यात दोन वयोवृद्धांची  ती  जोडगोळी झाली होती

कोलोन आपली थैली शिवणीवर मुद्दाम  फाडली  आम्ही  बधीर  होऊन पाहात होतो त्या थैलीच्या कोपऱ्यात एक दगड त्यान बांधला  आणि ती थैली वरच्या आकाशात भिरकावली  त्यातला दगड उडून  गर्तेत गेला  आणि थैली तरगत खाली जाऊ लागली  जणू ती पालुकोच्या अगावर प्रेतवस्त्र म्हणून पडणार होती  कोलोन  आपल नेहमीच धार्मिक कृत्य केल  काठीचे तुकडे करून त्याचा

क्रूस तयार केला आणि त्या खोल विवराच्या वरच्या काठावर खोचून ठेवला

पुन्हा उतरायला सुरुवात केली. उतरताना पालुकी जिथून पडला तो भाग नजरेसमोर ठेवायचा प्रयत्न करीत होतो न जाणो, अचानक निदान त्याच्या प्रेताचा तरी पत्ता लागेल ! पण आम्हाला त्या विवराच्या तळापर्यंत पोचताच आल नाही आणि साहजिकच पालुकीचाही ठावठिकाणा लागला नाही !

यानतर थंडीचा कडका कमी होत होत थोडे कोमट दिवस गेले मागे वळून पाहताना आम्ही पार केलेल्या नगाधिराजाच असीम भव्य सौंदर्य नजरेत भरत होत आम्हाला आता तातडीन काही तरी खायला हव होत इतके महाभयकर कष्ट केल्यानतर आता जराही चालण्याची इच्छा होत नव्हती एके दिवशी आम्हाला काही केसाळ बोकड दिसले आम्हाला पाहाताच ते सुसाट पळाले, उगाच घाबरले आमच्या अगात किडा, मुगीलाही मारण्याची ताकद शिल्लक नव्हती, तर बोकड कुठला मारणार ? प्रदेश अजूनही डोंगराळच होता, पण आता झाडी दिसू लागली झाडामध्ये पक्षी होते खाली नद्या, ओढे, नालेही दिसू लागले

## भारत

अन्नाचा शेवटचा कण पोटात गेल्याला आठ दिवस होऊन गेले होते. एका सकाळी, स्वच्छ सूर्यप्रकाशात पूर्वेच्या बाजूला खूप दूरवर एक मेंढयाचा कळप, बरोबर एक मेंढपाळ आणि रखवाली कुत्रे दिसले. पण ते इतके दूर होते की, आम्हाला त्याचा काही उपयोग नव्हता. त्या दृश्यान आमच्या आशा पल्लवीत झाल्या—लवकरच आमची कुणाशी तरी गाठ पडणार आणि आम्हाला उचलून नेल जाणार हो उचलूनच, दुसर काहीही शक्य नव्हत !

आमचे अगदी हाडाचे सापळे झाले होते; तरी एक प्रकारची मन शाती मिळत होती पकडलं जाण्याचा धोका पूर्णपणे टळल्याची खात्री वाटली

आणि मग पश्चिमेकडून ते आले सैनिकाचा एक गट येत होता थोडे जवळ आल्यावर एक एन सी ओ आणि जवान असल्याच लक्षात आल हात हलवून त्यांच लक्ष वेधाव अस वाटत होत; पण मी तसाच स्तब्ध राहिलो फार छान तयारीचे तगडे परिपूर्ण सैनिक दिसत होते माझ्या डोळचांत अश्रूनी दाटी केली आणि ते मनमोकळेपणान ओघळू लागले

एन सी ओ जवळ येताच स्मिथ पुढ झाला त्याच्याशी हस्तादोलन करीत म्हणाला, ‘ तुम्हाला पाहून आम्हाला कमालीचा आनद झालाय ! ’

सगळ्या हालअपेष्टांतून मुक्तता झाली आहे, ही गोष्ट डोक्यात शिरायला जरा जडच जात होत मी माझ्या काठीवर भार टाकला डोळे मिचमिचून सगळी परिस्थिती पहायचा प्रयत्न करू लागलो अतिशय तापामुळ गलितगात्र

व्हाव, तशी माझी अवस्था झाली होती गुडघे कापू लागले न कोलमडण्यासाठी फार प्रयत्न करावे लागत होते झारोचीही तीच अवस्था होती कोलोन आपल्या एका हातान त्याला आधार दिला होता आजूबाजूचा प्रदेश दुपारच्या उन्हात नाचतोय की काय, अस वाटण्याइतकी दृष्टी धूसर झाली होती फक्त पाच यार्डांवर असलेले ते टिपटाप अर्ध्या शर्ट–चड्डीवाले सैनिक दृष्टीसमोर लाटासारखे हेलकावू लागले

माझी हनुवटी छातीवर लुळी होऊन पडली कानावर स्मिथच बोलण पडत होत तो बोलत असलेल इंग्रजी मला काही कळत नव्हत पण उतावीळपणा स्पष्ट कळत होता थोड्या वेळानं तो आमच्याजवळ आला आणि म्हणाला, ‘मित्र हो, आपण अत्यत सुरक्षित आहोत ’ आमच्या चेहऱ्यावर काहीच भाव दिसेनात, तेव्हा तो सावकाश रशियनमध्ये म्हणाला, ‘आपण अगदी सुरक्षित आहोत !’

झारोन आरोळीच ठोकली मला धक्काच बसला तो आनदान उड्या मारू लागला खिकाळू लागला हातवारे करीत नाचू लागला समोरच्या सैनिकाचे मुके घेण्याच्या तयारीन तो त्याच्याकडे सरकू लागला तेव्हा त्याला आवरण्यासाठी स्मिथला बराच त्रास पडला

‘झारो, भाग फीर ! हो मागे ! मी त्यांना सांगितलय की, आमची गलिच्छ अग उवानी बदबदली आहेत !’

झारो स्मिथच्या विळख्यात राहूनच धुसमुसळत प्रचड हसू लागला स्मिथला घेऊन त्याने पोलका नाच सुरू केला दोघेही हसत होते आणि त्याच वेळी रडतही होते मी सुद्धा त्या नाचात केव्हा सामील झालो कळलच नाही आम्ही चौघेही हर्षोन्माद झाल्यासारखे खिदळू लागलो नाचू लागलो जमिनीवरील धूळ पायानी उधळत होतो एकमेकांना मिठ्या मारत होतो नाना तऱ्हांनी आमचा आनद व्यक्त करत होतो त्यात उरलीसुरली सगळी शक्ती सपली आणि एकेकजण भुईसपाट होऊन लोळू लागला !

कोलो पडल्या–पडल्याच धुदकीमध्ये अमेरिकन शब्द पुटपुटू लागला ‘आपण वाचलो, आपण सुरक्षित आहोत !’

स्मिथ म्हणाला, ‘आपल्याला आता जगता येईल !’

मी त्यावर विचार करू लागलो किती सुखद विचार होता ! एक वर्षभर सतत पायचाल हालअपेष्टा, असीम दुःख, एवढ भोगल्यावर पुन्हा एकदा माणसासारख जगता येणार, या विचारान मन मोहरून निघाल

स्मिथकडूनच कळल की, ब्रिटीश सैन्यातील एक छोटा गट टेहळणीसाठी हिंडत होता जर आम्ही फार थकलो नसू तर तिथून आठ–दहा मैलांवर त्याचा ट्रक थाबलेला आहे तिथपर्यंत चालत जाऊ म्हणजे मुख्य ठाण्यापर्यंत

आपल्याला जाता येईल, आम्ही सांगितलं की, इतके दूर चालत आलोत ते एवढ्याशा अंतरानं काय होणार आहे, मुख्य ठाण्यावर अन्न-पाण्याची अधिक चांगली सोय होईल

त्यांनी मग त्यांच्या पाठपिशव्यातून सतरंज्या काढून आमच्यासाठी सावली केली तिथे एक तासभर आम्ही विश्रांती घेतली माझं डोकं ठणकायला लागलं होतं तेवढ्यात कोणी तरी सिगरेटचं पाकीट पुढं केलं प्रत्यक्ष भुकेपेक्षा भरपूर धूर छातीत कोंडायची भयंकर इच्छा झाली होती काडयाच्या पेटीसारखी सामान्य वस्तू, पण ती हाताळताना काय गुदगुल्या होत होत्या म्हणून सांगू. प्रत्यक्ष धूम्रपान म्हणजे तर स्वर्गसुखच होतं आणखी कोणी तरी मुरवलेल्या पीचचा डबा काढला आम्ही बोटं बुडवून त्यातल्या फोडी सुर्रर्र करीत तोंडात घोळवत खाल्ल्या. सैनिकी बाटल्यामधून पाणीही प्यायलो

ट्रकपर्यंतचा दहा मैलाचा प्रवास, त्या जंगली डोंगरी प्रदेशातून पूर्ण करायला सुमारे पाच तास तरी लागले आम्ही बरोबर असल्यामुळे सैनिकांनी आपली तालबद्ध चाल हळू केली होती मी आणि झारो जोडीनं, जणू काही आम्हीही सैनिकच असल्याच्या थाटात पावलं टाकत होतो

झारो खुषीत होता म्हणाला, 'हे तर वीरांचंच आगमन, आता फक्त आपल्यापुढं एक बॅण्ड वाजायला पाहिजे !'

एवढ्या खडतर प्रवासाचा शेवट इतका गोड होत होता की, त्याची मुद्दाम पावती देण्याची गरज वाटत नव्हती ट्रकमधला खाच-खळग्याच्या रस्त्यावरचा प्रवास तर आम्ही शाळेतल्या पोरांसारखा उत्साहानं केला ब्रिटीश अधिकाऱ्यांनी आमचा पूर्ण ताबा घेतला होता. हे करा ते करू नका आमची सर्वतोपरीनं काळजी घेतली जात होती आम्ही नक्की कुठे आहोत याचा पत्ता लागत नव्हता आणि त्याची जरूरही वाटत नव्हती. कारण आपण नक्की भारतातच आहोत, एवढी गोष्ट दिलासा द्यायला पुरेशी होती.

स्मिथशी बोलत असलेला गोरा ब्रिटीश अधिकारी काय तरणाबांड, स्वच्छ दिसत होता ! स्मिथकडून हकीकत समजावून घेताना मान हलवत होता, मधेच आमच्याकडे पाहात होता, प्रश्न विचारत होता स्मिथ थोड्या वेळानं म्हणाला, 'आता कुठे त्याचा विश्वास बसतोय तो म्हणतो, आपल्याला इतर सैनिकां-पासून थोडं दूर ठेवावं लागेल. आपल्या सर्व तऱ्हेच्या साफसफाईची तो व्यवस्था करणार आहे काळजी करायचं काहीच कारण नाही'

त्या रात्री आणि दुसऱ्या दिवशी सकाळी न्याहारीला लष्करी पद्धतीचे सुंदर पदार्थ मिळाले. चहा, बीफ, बेकन वगैरेची रेलचेल होती.

आमची साफसफाई हा एक समारंभच झाला अंगावरचे सगळे कपडे-कपडे कसले ते, कातड्याच्या चिंधोट्या ओरबडून काढल्या मग वस्तऱ्याने नखशिखांत

केसाच सफाचट मुडण केल आमचे कपडे, रात्री झोपायला वापरलेल्या सतरज्या चादरी, वस्तरून काढलेल्या केसाच बोचक अस एकत्र रचल आणि त्यावर थोड घासलेट ओतून दिल पेटवून ! असा मस्त भडका उडाला सगळ भस्मीभूत होऊ लागल.

कोलो म्हणाला, ' त्या साल्या उवा, लिखा पटकन मरायच्या नाहीत, माझ्या रक्तावर मजेत वाढल्या आहेत ! '

आही एकमेकाकडे पाहू लागलो आणि सगळ्यानाच एकदम हसू कोसळल प्रथमच आम्ही एकमेकाला ख-या अर्थाने पाहात होतो चेहरेपट्टी, अगलट नीट न्याहाळत होतो एक वर्षापेक्षा जास्त काल, चार हजार मैलांच्या दुर्दम्य रपेटीत हालअपेष्टांत, एकमेकाच्या सुख-दु खात भागीदार असलेले आम्ही, एकमेकांना डोळे भरून पहात होतो एकमेकाच दिसण्याबद्दल कौतुक करू लागलो आम्ही चौघेही तिथ बराच वेळ मुक्त नग्न अवस्थेत हसत–खिदळत बसून होतो मग खसखसून आघोळीचा कार्यक्रम झाला सगळे ओरखडे, पायाच्या भेगा नीट धुतल्या मग सुरेख मऊ सुती अतर्वस्त्र, अर्ध्या चड्डया, बुशशर्ट, कॅनव्हासचे बूट देण्यात आले सगळ्यात कडी म्हणजे ऑस्ट्रेलियन पद्धतीच्या लोकरी हॅटसुद्धा दिल्या आम्ही सुसस्कृत जगात प्रवेश करायला सज्ज झालो

आम्हाला कुठे तरी पश्चिमेकडे गाडीतून नेण्यात आल आम्ही एका प्रचड लष्करी ठाण्यात प्रवेश करतो आहोत एवढ जाणवल, पण नीट पहाता नाही आल कारण आत शिरताच आम्हाला आजारी लोकाच्या बराकीत नेण्यात आल आमची वाट पाहात तिथ डॉक्टर थाबलेलाच होता चाळिशीचा असावा चष्म्या-आडून अत्यत काळजीयुक्त डोळ्यानी आमची तपासणी करत होता स्मिथला काटेकोर प्रश्न विचारत होता तो स्मिथला म्हणाला, ' तुम्हा सर्वांची अतिशय काळजी घ्यायला हवी आहे तब्बेतीत सुधारणा व्हायला बराच वेळ लागणार आहे ' प्रचड शारीरिक, त्याहीपेक्षा मानसिक दौर्बल्य आम्हाला आल होत. त्यातून बाहेर पडण्यासाठी वेळ लागणार होता

आम्ही तिथे काही दिवस राहिलो आमच्यावर औषधोपचाराचा मारा चालू होता सुदर खाण मिळत होत फळाचा तर नुसता वर्षाव होत होता. कोलोन आपल्या असामान्य आहारान तिथल्या सेवकवर्गाच थोडस मनोरजन केल धूम्रपान मनसोक्त करण्याची पूर्ण मुभा होती असे आम्ही लोळत, गप्पा मारत, झोपत दिवस काढले

इथून आमची स्मिथबरोबर थोड्या काळासाठी ताटातूट झाली त्याला अमेरिकन अधिकाऱ्याच्या भेटीसाठी नेणार होते आणि आम्हाला कलकत्त्याला जाताना तो म्हणाला, ' काहीही झाल तरी मी तुम्हाला कलकत्त्याला भेटीनच ! '

जाताना आम्ही हात मिळवले काय बोलायच ते सुचेचना ! तो म्हणाला,

'डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे या प्रवासाच्या ताणातून पूर्णपणे मुक्त होण्या-आधीच काही तरी प्रचंड आजार येणार आहे, पण घाबरण्याच कारण नाही मोठ्या हॉस्पिटलमध्ये गेल्यावर सर्व प्रकारची काळजी घेतली जाईल!'

तो जाताना स्वप्नातून हळूच अस्पष्ट होत अदृश्य व्हाव तसा भासला झारो म्हणाला, 'अरे, आपल्याला तो कलकत्याला भेटणार आहे' जणू काही भारत म्हणजे एक छोटासा देश आहे आणि कलकत्ता म्हणजे जरा पलीकडच्या कोपऱ्यावरचा गुत्ता आहे, अशा थाटात तो म्हणाला. आम्ही अगदी दुबळे झालो होतो. कसलाही कस अंगात नव्हता गेल वर्षभर घट्ट पकडून ठेवलेली सहनशक्ती संपूर्णपणे विलयाला गेली होती आम्हाला वाटत होत त्यापेक्षा आम्ही फार आजारी होतो

कलकत्याचा प्रवास आता नीट आठवत नाही अत्यंत कंटाळवाणा आणि वेळखाऊ प्रवास होता, एवढच आठवत आम्ही सतत धूम्रपान करत होतो आमच्या मनाची अवस्था अतिशय विचित्र झाली होती कलकत्यामधून बसन आम्हाला नेत असताना रातकिड्यांसारखे आम्ही ताजे होतो आजूबाजूच्या इमारतीकडे डोकावून डोकावून बघत होतो एकमेकाला दाखवत होतो. या अमाप उत्साहामुळ आमची सुधारणा होऊ लागली अस आम्हाला उगाचच वाटत होत हॉस्पिटलमध्ये पोहोचताच तडक प्राथमिक तपासणीसाठी नेण्यात आल भाषेचा प्रश्न पुन्हा उभा राहिला आम्ही एकमेकात थोड रशियन, थोड फ्रेंच, पोलिश, जर्मन बोलत होतो; पण इंग्रजीचा शब्दही येत नव्हता शेवटी एक दुभाष्या आला त्याला फ्रेंच येत होत त्याना आमच्या बालपणापासूनचा इतिहास हवा होता अगदी ताप गोवर, कांजिण्या वगैरेसुद्धा झारोच्या मदतीन आम्ही सर्व माहिती दिली मग आम्हाला समोरासमोरच्या तीन कॉटावर झोपवण्यात आल

दुसऱ्या दिवशी सकाळी, मला आठवत त्याप्रमाणे एक नर्स आपला मज-बूत बदामी रंगाचा हात माझ्या फिकट निस्तेज गोऱ्या हाताजवळ ठेवून गप्पा मारायचा प्रयत्न करत होती मी थोडस स्मित केल मग न्याहारी केली त्यानंतर मी पुन्हा झोपलो झोपलो कसला, प्रचंड अंधार, तळ नसलेल्या विस्मृतीच्या गर्तेत कोसळलो आणि या अवस्थेमध्ये मी जवळजवळ महिनाभर होतो अस मला नंतर समजल केव्हा तरी स्मिथ आला होता आणि त्यान ही माहिती मला पुरवली

मला झोपेच्या गोळ्याची औषध देऊन माझ्यावर दिवस–रात्र पहारा ठेवला होता थोड्याच वेळात झारो आणि कोलोही त्याच अवस्थेत गेले होते मी रात्रीच्या वेळी वेड्यासारखा किंचाळत असे झोपेत पुन्हा पुन्हा रशियना-पासून पळायचा प्रयत्न करत होतो वाळवंट, डोंगर-दऱ्यातून प्रवास करत होतो.

रोज माझा पाव अर्धा खाऊन अर्धा लपवून ठेवत होतो हॉस्पिटलमधला सेवक हळूच तो तुकडा–माझा खजिना-काढून द्यायचे आणि संपूर्ण पाढराशुभ्र नवा पाव आणून द्यायचे आणि सागायचे, ' काही काळजी करू नकोस. खूप पाव आहेत आमच्याकडे !' त्या सागण्याचा माझ्यावर कसलाही असर होत नव्हता. मी आपला पळून जाताना उपयोगी पडावा म्हणून पाव लपवतच राहिलो.

दहा दिवसानी वेडाने परिसीमा गाठली त्यानतर मी थोडा शांत झालो. कडबा झाला होता माझा मी अत्यत धोक्याच्या पातळीवर होतो झारो आणि कोलोसुद्धा फार वेगळ्या अवस्थेत नव्हते

पण डॉक्टराच्या म्हणण्याप्रमाणे माझ्या ' पराक्रमापुढे ' दुसरे दोघे फिकेच होते सभ्रमावस्थेच्या दुसऱ्या रात्री तो प्रकार घडला मी वाचवलेला पाव लपवण्याच्या जागेतून बाहेर काढला माझी गादी, चादर, उशा सगळ गुडाळल सगळ गाठोड खाद्यावर घेतल आणि निघालो. माझ पहारेकरी आश्चर्याने बघतच राहिले ! कारण अशा विकल अवस्थेत माझ्या अगात एवढी ताकद आहे, याच्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता मी तसाच धडपडत, हेलपाटत दाराकडे निघालो मी गादी गुडाळेपर्यंत नर्सन डॉक्टरना आणल होत ते म्हणाले, ' अडवू नका, काय करतो ते पाहू या !' दारापर्यंत गेल्यावर मात्र दोन सेवक, डॉक्टर आणि नर्स अशा चौघानी मला अडवल. त्याबरोबर मी बिस्तरा खाली टाकला आणि त्याच्याशी आरडाओरड करत झटापट करू लागलो. मला पकडून पुन्हा गादीवर निजवण्यासाठी ह्या चौघानाही फार प्रयत्न करावे लागले मला मात्र या प्रकाराची कसलीही आठवण नाही !

हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यावर तब्बल चार आठवड्यांनतर एका स्वच्छ सुदर सकाळी मी खऱ्या अर्थानं जागा झालो फार छान सुदर झोपेतून उठावं तसा उठलो. मात्र ती छान एक महिन्याची रात्र होती यावर माझा विश्वासच बसेना !

आम्हाला स्मिथ भेटायला आला होता त्यान छान टिपटॉप हलक्या रगाचा सूट परिधान केला होता तोही आमच्या अवस्थेस जाऊन आला होता; पण फक्त एका आठवड्यात तो सावरला होता खर तर तो दोन दिवसापूर्वीच आला होता, पण मी त्याला ओळखल्याच कसलही लक्षण नव्हत तो आम्ही कसे दिवस काढले याविषयी डॉक्टराशी बोलला होता

' आता तुम्ही सगळेच झकास बरे होत आहात ' झारो आणि कोलोसुद्धा आपल्या कॉटवर बसून प्रसन्न मुद्रेन हसत होते.

त्यानतर काही दिवस त्या हॉस्पिटलमध्ये आम्ही अतिशय लाडके झालो होतो, आमची कथा साऱ्या हॉस्पिटलभर झाली होती आणि साहजिकच सेवक, इतर रुग्ण आम्हाला कुतूहलान पहायला येऊ लागले. प्रेमळ भेट म्हणून सिगरेट,

चॉकलेटस, थोडी चिल्लर याचा वर्षाव होऊ लागला

स्मिथ पुन्हा भेटायला आला त्यान एक चादीची सिगरेट केस आणि थोडे पैसे दिले

'यानतर काय करायच ठरवल आहेस तू रावीज ?'

मी त्याला सागितल की, 'माझ्यापुढ एकच मार्ग मोकळा होता, तो म्हणजे पुन्हा पोलीश सैन्यात दाखल व्हायच !'

'नक्की एवढच करायच ठरवलयस ?'

'हो तेवढच मी करू शकतो'

'ठीक आहे. युद्ध सपल्यावर आपण पुन्हा भेटू कुठ भेटायच ?'

'अर्थातच वॉर्सामध्ये !' अस म्हणून मी त्याला माझा वॉर्सामधला पत्ता लिहून दिला.

नतर केव्हा तरी एका दुभाष्याला घेऊन एक ब्रिटीश अधिकारी आला आणि माझी चौकशी केली गेली पोलड, तिथले लोक, याच्याबद्दल मी दिलेल्या माहितीवरून मी खरोखरीच पोलीश आहे याबद्दल त्याची खात्री पटली पुन्हा एकदा रशियन लोक, त्यांच्या तुरुगछावण्या आणि अजब प्रवास याची उजळणी झाली

दुसऱ्या दिवशी दुभाषा एकटाच आला येताना छोटीशी भेट म्हणून अर्धा डझन हातरुमाल आणि हस्तीदती सिगरेट-होल्डर दिला मध्यपूर्वेत लढत असलेल्या पोलीश सैन्यामध्ये माझी पाठवणी करण्यासाठी ब्रिटिशांनी व्यवस्था केली असल्याचही त्यान सागितल

मी निघालो त्याच्या आदल्या रात्री मी, झारो आणि कोलोन तिथल्या कॅन्टीनमध्ये निरोपाची मेजवानी साजरी केली

शेवटच्या दिवशी मी निघायच्या वेळी स्मिथ भेटायला आला त्यान एक छोटीशी बॅग आणली होती. माझ्या वस्तू ठेवायला झारो आणि कोलो याच्यापासून दूर जाताना कमीत कमी विरहवेदना व्हाव्या अस मी ठरवत होतो.

मी दाराकड निघालो स्मिथ पुढ आणि दोघेजण माझ्या मागून येत होते. त्यानी आपल्या जागीच थांबाव अस मला वाटत होत; पण ते येत राहिले. दारापाशी पोचताच मी माग वळलो त्याबरोबर कोलो अधीरपणे धावत आला आणि मला बिलगला पाठोपाठ झारोही आलाच आमच्या तिघाच्याही डोळ्यातून विरहाश्रू भराभर ओघळू लागले त्यांच्यापासून मोठ्या कष्टान सुटका करून घ्यावी लागली निघालो स्मिथ पुढं होता तोही हातरुमालान डोळे पुसत, नाक साफ करत होता

माझ्याबरोबर तो बसन कलकत्ता शहरात आला आणि कुठ तरी उतरला निरोप घेताना म्हणाला, 'रावीज, स्वत. काळजी घे देव तुला मदत करो !'

बस प्रवासीछावणीकड निघाली. तिथून मला मध्यपूर्वेकडे जाण्यासाठी बोटीची व्यवस्था झाली होती. स्मिथ गेला त्या दिशेकडे मी वळून बघितलं आणि प्रचंड एकाकीपणान मला घेरलं. आयुष्यात माझ्याबरोबर मित्र नाही कोणीच नाही. मी उध्वस्त झालो होतो माणूस म्हणून शक्य तेवढा एकाकी झालो होतो !

---

स्लावोमिर रॅविझ दुसऱ्या महायुद्धात मध्यपूर्वेत लढला त्यानंतर त्याला इंग्लंडला पाठविण्यात आलं युद्ध संपलं तेव्हा वैमानिकदलात तो शिक्षण घेत होता नंतर तो इंग्लंडमध्येच राहिला इंग्लिश मुलीशी लग्न केलं. त्यांना आता दोन मुलगे, तीन मुली आणि चार नातवंड एवढा परिवार आहे. रोनाल्ड डाउनिंग नावाच्या वार्ताहरानं या अद्भुत प्रवासाचा शोध लावला. या प्रवासातील इतर साथीदारांचा मात्र पुढं काहीच पत्ता लागला नाही !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५९
वा. क्र. २७७०९.
२४।११।
(स्थान प्रत)

REFBK-0024401